

# मुलांचे लोकमान्य

रु. १॥

न. चिं. केळकर

# मुलांचे लोकमान्य

लेखक
नरसिंह चिंतामण केळकर

★

सुरुचि-साहित्य प्रकाशन

१९५० ] [ किंमत १॥ रु

# अनुक्रमणिका

33225


| क्रमांक | प्रकरणाचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | जीवन–वृत्तांत ... ... ... | १ |
| २ | टिळक संपादक झाले ... ... ... | ९ |
| ३ | कर्तृत्वकालाचे तीन विभाग ... ... ... | १९ |
| ४ | राजद्रोहाचा दुसरा खटला ... ... ... | २८ |
| ५ | हिंदवी असंतोषाचे जनक ... ... ... | ३३ |
| ६ | लो० टिळकांच्या यशाचें मर्म ... ... | ३९ |
| ७ | लो० टिळकांसंबंधीं दोन महत्त्वाचीं पत्रें ... | ४८ |
| ८ | टिळक व बडे देशी लोक ... ... ... | ५४ |
| ९ | लो० टिळकांचा राजकीय पक्षोपन्यास ... ... | ७२ |
| १० | राजकारणाचे मार्ग व अत्याचार ... ... | ८४ |
| ११ | लो० टिळकांचा तह–परिषदेस अर्ज ... ... | ९२ |
| १२ | लो० टिळकांचें अमर राजकीय तत्त्वज्ञान ... | ९९ |
| १३ | विद्यार्थ्यांस उपदेश ... ... ... | १०४ |



मुद्रक : **भगवान पंढरीनाथ सोमण,**
मॉडर्न प्रिंटिंग प्रेस, ३९१ नारायण पेठ, पुणें २.

प्रकाशक : **य. ग. वझे,** आणि **द. वा. विंझे,**
'सुरुचि–साहित्य' प्रकाशन, ३९१ नारायण पेठ, पुणें २.



[ या पुस्तकाचे यापुढील आवृत्त्या, भाषांतर, रूपांतर, उतारे वगैरेंचे सर्व हक्क श्री. **काशिनाथ नरसिंह केळकर,** यांजकडे आहेत. ]

# संग्राहकाचे चार शब्द

ती. न. चिं. केळकर यांनीं दोन हजार पृष्ठांचें संपूर्ण टिळक-चरित्र लिहि-ल्याला वीस वर्षें झालीं. सदर ग्रंथाची आवृत्तीहि वारंवार निघूं शकत नाहीं. याकरितां शाळा–कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां टिळकांचें एखादें लहानसें चरित्र लिहावें असा त्यांचा मानस होता. तो अर्थात् सिद्धीस गेला नाहीं. तथापि, टिळक-चरित्राशिवाय वेळोवेळीं व्याख्यानें किंवा निबंधरूपानें पुढें पंचवीस वर्षांत त्यांचेकडूनच इतकें वाङ्मय निर्माण झालें कीं त्यांतूनच हें छोटें टिळकचरित्र सहज निर्माण होऊं शकलें.

या पुस्तकांत सर्व लेख तात्यासाहेबांच्याच हातचे आहेत. फक्त या पुस्तकाच्या उद्देशानुसार त्यांचा क्रम व रचना माझी इतकेंच. त्यामुळें कोणाहि विद्यार्थ्याला थोड्या वेळांत हें पुस्तक वाचून लो॰ टिळकांच्या चरित्राचें मर्महि उत्तम समजेल असा भरंवसा आहे.

‘ सुरुचि-साहित्य ’तर्फे हें पुस्तक प्रकाशित होत आहे याबद्दल आनंद वाटतो.

का. न. केळकर

10 Howley Place
Maida Vale W.2
London 13/3/19

My dear Tatya

Enclosed please find a typed copy of the report of our work. It is not all intended for publication. Tell to Gokhale accordingly. I have not written him separately this week. In Baba's letter you will find my views about appeal.

With compliments to Gokhale, Bhat, Khadilkar, Karandikar & others I am

Yours aff.
B. G. Tilak

# मुलांचे लोकमान्य

## १. जीवन–वृत्तांत

### [ १ ]

लो० टिळकांचा जन्म सन १८५६ च्या जुलै महिन्याच्या २३ व्या तारखेस रत्नागिरी येथें सदोबा गोरे यांचे घरीं झाला. हा दिवस हिंदु पंचांगाप्रमाणें शके १७७८ आषाढ कृष्ण ६ सोमवार असा येतो. नक्की जन्मवेळ सूर्योदयानंतर सुमारें दोन घटका होती. टिळकांच्या कुंडलीवरून त्यांचें जन्मलग्न कर्क असून, फल-ज्योतिष मताप्रमाणें रवि स्वगृहीं आणि नवमस्थानीं चंद्र व गुरु यांची युति, असे दोन भाग्यदर्शक योग त्यांच्या जन्मकाळीं होते. टिळक सन १९२० च्या ऑगस्टच्या पहिल्या तारखेस मृत्यु पावले. म्हणजे त्यांना चौसष्ट वर्षे आणि आठ दिवस इतका आयुर्दाय लाभला. ऐन उमेदींत टिळकांना असें वाटे कीं, आपण आपल्या बरोबरीच्या इतर कित्येक मित्रांप्रमाणें अल्पायुषी होणार नाहीं कशावरून ? परंतु त्यांचें भाग्य, किंवा त्यांचें म्हणण्यापेक्षां त्यांच्या देशाचें भाग्य, म्हणून त्यांना सुमारें ६४ वर्षांपर्यंत आयुष्य लाभलें. आश्चर्य हें कीं त्यांच्या आयुष्यांतील खऱ्या कर्तृत्वाचा व यशाचा काल म्हटला म्हणजे त्यांच्या ऐन उमेदीच्या पुढचाच होय !

टिळकांचें जन्मस्थान रत्नागिरी. हें लहानसें शहर महाराष्ट्रालगतच्या कोंकणाचें केंद्र होय. हा कोंकण भाग अत्यंत दरिद्री असा समजला जातो. परंतु ईश्वर एक ठिकाणचें उणें दुसऱ्या ठिकाणीं भरून काढीत असतो. त्याप्रमाणें या दरिद्री कोकणाला त्यानें बुद्धिमत्तेची विशेष देणगी दिली आहे, अशी जनतेची सामान्य समजूत आहे. बुद्धिवान् मुलें कोकणांतून निघून वरघाटीं यावीं व त्यांनीं भाग्याला चढावें अशीं उदाहरणें गेल्या २–३ शतकांतलीं बरींच दाखवितां येतील. टिळकांचें उदाहरण त्यांपैकींच होय. सन १९२३ सालीं रत्नागिरी येथें प्रांतिक परिषद भरली. तिजमध्यें

टिळकांच्या जन्मस्थानाचें स्मारक करण्यासंबंधाचा एक ठराव पुढें आला. तो मांडतांना रा. न. चिं. केळकर यांनीं टिळकांच्या अंगचे गुण व कोंकण प्रांताचे गुण यांचा मेळ विनोदबुद्धीनें घालण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा उल्लेख या ठिकाणीं केला असतां तो अनुचित होणार नाहीं. रा. केळकर म्हणाले,

" रत्नागिरीच्या जन्मभूमीपासून टिळकांनीं कोंकणच्या विशिष्ट लक्षणांपैकीं प्रत्येकाचा थोडा थोडा स्वीकार केलेला आहे. मी जुन्या पद्धतीचा कवि असतों तर असें वर्णन केलें असतें—कोंकणांतील तांबुस व स्निग्ध मातीच्या तेजाचें अनुकरण टिळकांच्या डोळ्यांनीं केलें. समुद्रापासून त्यांनीं खोल स्वभाव व सर्वसंग्राहकपणा घेतला होता. समुद्राच्या बाहेर जितकी सृष्टि तिच्याहून समुद्राच्या उदरांत अधिक सृष्टि असते असें म्हणतात, या न्यायानें टिळकांचेंहि अर्ध्याहून कमी असेंच राजकीय अंतरंग प्रगट होत असे. त्यांचें सर्व अंतरग कोणींच जाणलें नाहीं. कोंकणच्या सह्याद्रि पर्वतापासून टिळकांनीं आपल्या आकांक्षांचा उत्तुंगपणा घेतला होता. कोंकणी खडकाळ कातळापासून त्यांना निश्चयी मनाचा कठोरपणा मिळाला होता. खडक फुटेल पण टिळकांचा निश्चय ढळणार नाहीं, याचा अनुभव सर्वांसच असे. कोंकणच्या किंचित् पित्तकर पण एकंदरीनें निरोगी अशा हवेचें अनुकरण त्यांच्या स्वभावानें केलें होतें. नारळाप्रमाणें त्यांच्या अंतरंगांतील गुणग्राहकतेचें व कृपेचें मधुर जल त्यांच्याशीं निष्ठापूर्वक वादाची टक्कर खेळणारासच अधिक मिळे; वरवर लोभाच्या किंवा हांजीहांजीखोरपणाच्या तोंडदेखल्या गोष्टी बोलणारास प्रसादसमर्पणाच्या बाबतींत ते टणकच होते. फणसाप्रमाणें त्यांची रीतभात वरून खडबडीत होती. ' पॉलिश्ड जंटलमन् ' म्हणजे ' रंधून साफ केलेला किंवा घासल्यागुसल्यानें अंगावर विकारवशतेची लवहि न उगवणारा महाशिष्ट ' ही संज्ञा त्यांना त्यांचा वेश व भाषा पाहून, कोणासच देतां आली नसती. पण काटेरी फणसांत जसे रसाळ गरे असतात तशीच त्यांच्या पोटांत शिरणाराला सरळ युक्तिवाद व प्रेमळ भावना हीं सांपडत असत. शेवटीं एकच अस्सल कोंकणी पदार्थ सांगावयाचा राहिला, व तें विहिरीवरचें रहाटगाडगें ! कोंकणांत मी आलों म्हणजे निजून उठण्याच्या वेळीं रहाटगाडग्याचा करकरणारा पण

उत्साहवर्धक आवाज ऐकतों. तेव्हां वाटतें कीं, कोकणी जनतारूपी राजपुरुषाला निद्रेंतून कवनाच्या हाकेनें जागें करणारा हा कोणी पिढीजाद भाट, चारण किंवा शाहीर असावा! रहाटगाडगें म्हटलें म्हणजे त्याचे पोहरेमोधे कधीं धड नसावयाचे. त्यांतल्या निम्म्याच पाण्याचा उपयोग व्हावा, निम्मे सांडावें, अशी स्थिति हटकून असावयाची. त्याप्रमाणें लो० टिळकांच्या सर्व-संग्रहांतील मंडळींत रहाटाच्या मडक्यांप्रमाणें कोणांत कांहीं न्यून तर कोणांत कांहीं न्यून असे; पण त्यांनीं त्या सर्वांना आपल्या राजकीय वळणाच्या वळलेल्या जोरकस दोरावर बांधून, त्यांच्याकडून ओंजळ ओंजळ पाणी काय मिळेल तें घेऊन, त्यांतूनच राष्ट्रीय चळवळीचा अखंड जलप्रवाह निर्माण केला व देशकार्याचा मळा शिंपून घेतला. तात्पर्य, टिळकांनीं जन्मभूमीपासून घेण्यासारख्या अनेक गोष्टी घेतल्या; पण उलट तिला कीर्तीचा मोबदला भरपूर परत दिला. यामुळें रत्नागिरीकरांचें ऋण कमी न होतां वाढलेंच आहे, व तें ऋण अंशतः तरी फिटावें म्हणूनच त्यांनीं ही स्मारकाची योजना केली आहे."

## टिळकांचें घराणें

टिळकांच्या घराण्याचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यापैकीं चिखलगांव हें होय. काप दापोलीच्या दक्षिणेस सुमारें ८ मैलांवर हा गांव आहे. टिळक घराण्याची या गांवची वसति अनेक पिढ्यांची होती. घराण्याची कुलदेवता 'लक्ष्मीकेशव' नांवाची आहे. टिळकांच्या पणज्यापासून त्यांच्या घराण्याचा इतिहास उपलब्ध होतो. त्याचें नांव केशव असेंच होतें. या घराण्याकडे चिखलगांवची खोती पूर्वापार असे. परंतु खोतीचें उत्पन्न किंवा घरची शेती यावर वाढत्या कुटुंबाचा निर्वाह होणें शक्य नव्हतें. टिळकांच्या पणजाचा जन्म १७७८ सालीं म्हणजे पेशवाई बुडण्याच्या पूर्वी ४० वर्षें झाला. यामुळें "घोड्यावर बसण्यांत वस्ताद, निशाण मारण्यांत पटाईत, पोहण्यांत सराईत आणि स्वयंपाकांत तरबेज" असें त्यांचें जें वर्णन आहे तें त्या काळाला स्वाभाविक असेंच होतें. या केशवरावांनीं आपल्या विद्येच्या व उद्योगाच्या बळावर अंजनवेल तालुक्याची मामलत मिळविली. पण पुढें पेशवाई बुडाल्यावर ते चिखल-

गांवीं येऊन स्नानसंध्या करीत राहिले. त्यांना सन १८०२ सालीं रामचंद्र नांवाचा मुलगा झाला. हा बाळ गंगाधर टिळकांचा आजा. त्याला विद्या फारशी आली नाहीं. रामचंद्राला सन १८२० सालीं पहिला मुलगा गंगाधर हा झाला. हे टिळकांचे वडील. सन १८३७ सालीं गंगाधरपंतांची आई (म्हणजे टिळकांची आजी) पुण्याहून नाशकास जात असतां वाटेंत महामारीचे वाख्यानें मृत्यु पावली. त्यामुळें रामचंद्रपंत हे वैतागून उत्तर हिंदुस्थानांत चित्रकूट येथें पेशव्यांचें घराणें होतें तिकडे निघून गेले. कांहीं वर्षे पेशव्यांकडे कोठी–कामगार या नात्यानें राहून मग ते काशीस गेले. तेथें एकदम संन्यास घेण्याचाच त्यांचा विचार होता. परंतु त्या वेळीं बंडाची धामधूम असल्यानें, म्हणजे संन्याशाचा जीव धोक्यांत पडण्याचा संभव म्हणून, त्यांनीं तो बेत तेव्हां रहित केला, पण कांहीं वर्षांनीं तो तडीस नेलाच. १८७२ सालीं त्यांनीं काशी येथेंच समाधी घेतली.

टिळकांच्या वडलांच्या बाळपणींच त्यांचें घराणें गरीब स्थितीला आलें होतें. म्हणून गंगाधरपंतांना लहाणपणीं स्वावलंबन स्वीकारून विद्या करणें प्राप्त झालें. प्रथम दामोळ येथील शाळेंत त्यांनीं कांहीं शिक्षण घेतलें; पण तेथें इंग्रजी शिकण्याची सोय नव्हती म्हणून ते पुण्यास आले. तेथें केशवराव भवाळकर यांनीं चालविलेल्या व त्या काळीं नामांकित असलेल्या इंग्रजी शाळेंत त्यांनीं पुढील अभ्यासास सुरवात केली. पण वडील काशीयात्रेला निघून गेल्यामुळें कुटुंबाचा सर्व भार गंगाधरपंतांवर पडला; म्हणून त्यांनीं इंग्रजी शिक्षण सोडून देऊन कोंकणांत शाळाखात्यांत शिक्षकाची नोकरी धरली. यानंतर त्यांचें लग्न झालें. त्यांच्या बायकोचें नांव पार्वतीबाई. या बाईच्याच पोटीं बाळ गंगाधर टिळकांचा जन्म झाला. या बाईनें पुत्रप्राप्ती-करितां सूर्योपासना केली होती. टिळकांना मातृसुख दहा वर्षांहून अधिक लाभलें नाहीं. गंगाधरपंतांनीं पांच रुपये पगाराच्या नोकरीपासून सुरुवात केली. मालवणास त्यांना दहा रुपये मिळत. पुढें चिपळुणास पंधरा रुपये मिळूं लागले. नंतर खुद्द रत्नागिरीस पंचवीस रुपयांवर त्यांची नेमणूक झाली. ट्रेनिंग कॉलेजांतील अभ्यासक्रमाचा फायदा गंगाधरपंतांना मिळता तर ते देवकुळे दिक्षीत यांच्याप्रमाणें फार नांवारूपास आले असते. परंतु तशी सोय

नव्हती. तथापि ते जात्या बुद्धिवान् व उद्योगी असल्यामुळें त्यांनीं खासगी रीतीनें संस्कृत व गणित या विषयांचा अभ्यास इतका केला कीं, त्यांना 'गंगाधरपंत' असें न म्हणतां 'गंगाधरशास्त्री' असें लोक म्हणत. प. वा. डॉ. भांडारकर यांचा व गंगाधरपंतांचा स्नेह संस्कृत विद्येच्या प्रेमामुळें अगदीं पूर्ववयापासूनचा होता. तो पुढें लोकमान्य टिळकांनीहि तसाच चालू ठेवला.

## टिळकांची विद्यार्थिदशा

सन १८४६ सालापासून टिळकांच्या कोंकणच्या घरीं वांटणीचे वाद सुरू झाले होते, ते पुढे २०–२५ वर्षेपर्यंत टिकले. शिवाय कोंकणी मिळकतहि अगदींच थोडी होती. टिळकांच्या आजाच्या वांटणीला सुमारें १७ रुपये आकाराची कीर्दसार जमीन आली होती ! यामुळें कोंकणचा पाश टिळकांच्या वडलांपासून हळूहळू सुटत चालला. पुण्यास आल्यानंतर गंगाधरपंतांनीं नोकरीचा वाढता पगार व ग्रंथकर्तृत्वावर मिळवलेले पैसे मिळून थोडीबहुत शिल्लक टाकण्यास सुरवात केली. या शिलकेचाच उपयोग टिळकांना पुढें आपल्या कॉलेजच्या शिक्षणाला झाला. हें शिक्षण सुरू होण्यापूर्वीच टिळकांचे वडील निवर्तले. तथापि टिळकांनीं शिष्यवृत्ति वगैरे मिळवून स्वतःच्या मिळकतीवरहि शिक्षणाचा कांहीं खर्च भागविला, व आपल्या वडिलांचें स्वावलंबनाचें व्रत पुढें चालविलें.

बाळ गंगाधर टिळक यांची बुद्धिमत्ता लहानपणापासूनच दिसून येत होती. सन १८६१ सालीं दसऱ्याच्या मुहुर्तावर टिळकांना शाळेंत घालण्यांत आलें. सन १८६४ सालीं त्यांची मुंज झाली. पण त्यापूर्वीच पूर्णांक-अपूर्णांकापर्यंत गणित, रूपावळी, समासचक्र, निम्मा अमरकोश व बरेंचसें ब्रह्मकर्म इतका टिळकांचा अभ्यास वडिलांजवळ झाला होता ! मुंज होणाऱ्या आठ वर्षांच्या मुलाची ही विद्या पाहून त्यांचे उपाध्याय व वैदिक गुरुजी हे आश्चर्यचकित झाले असें म्हणतात ! सन १८६६ सालीं टिळकांचे वडील गंगाधरपंत असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर होऊन पुण्यास आले. त्यामुळें पुढें टिळकांच्या शिक्षणाची सर्व सोय यथास्थित झाली हें सांगावयास नकोच. १८७२ सालीं टिळकांचे वडील वारले. टिळकांचें पहिलें इंग्रजी शिक्षण पुण्यांतील सिटी स्कूलमध्यें झालें. नंतर १८६९ सालीं ते

पुणें हायस्कुलांत पांचवे इयत्तेंत बसले. संस्कृत व गणित या दोन विषयांत त्यांची प्रथमपासूनच प्रगति दिसून आली. नवे संस्कृत श्लोक रचणें किंवा जुने पाठ म्हणणें, परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेंतील अवघड तेवढींच गणितांचीं उदाहरणें सोडविणें, वगैरे गोष्टींनीं सामान्य विद्यार्थ्यांहून आपल्या अंगीं असलेलें वैशिष्ट्य टिळक प्रगट करीत. १८७२ सालीं त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा होऊन पुढील सालीं ते डेक्कन कॉलेजांत गेले. तेथेंहि त्यांनीं क्रमिक विषयांपेक्षां अवांतर विषय अधिक वाचणें, तालीम करणें, पोहणें व मित्र-मंडळीशीं गप्पागोष्टी व दंगामस्ती करणें यांत आपला बराचसा वेळ घालविला. त्यांची स्मरणशक्ति तीव्र असून कागदाला टांक किंवा पेन्सिल लावणें या गोष्टीचा त्यांना मनापासून कंटाळा असे. विद्यार्थी या नात्यानें म्हणजे परीक्षेंत विशेष वरचा नंबर मिळवून त्यांनीं नांव मिळविलें नाहीं; परंतु हूड-पणाच्या सर्व खेळांत, स्वाभिमानानें उत्तर-प्रत्युत्तर करण्यांत, पोहणें वगैरेंच्या शर्यतींत वरचा नंबर मिळविण्यांत त्यानीं विद्यार्थिदशेंतील आपलें तेज सम-कालीन विद्यार्थिगणावर चांगलेंच प्रगट केल्याचें सांगतात. सन १८७६ सालीं बी. ए. च्या परीक्षेंत गणित हा मुख्य विषय घेऊन ते पहिल्या वर्गांत पास झाले. नंतर एक वर्षांत एम्. ए. चा अभ्यास करून परीक्षेस बसून नापास झाल्यावर ते एकदम एल्‌एल्. बी. च्या परीक्षेकडे वळले, व ती परीक्षा ते सन १८७९ च्या डिसेंबरांत पास झाले.

## नव्या ध्येयांचा उदय

टिळकांनीं एम्. ए. च्या परीक्षेचा नाद सोडून एल्‌एल्. बी. ची परीक्षा दिली याचें एक कारण असें असावें कीं, त्यांच्या बरोबरीच कांहीं विद्यार्थी हायकोर्ट वकील होणार होते. आणि कोंकणचे रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं हायकोर्ट वकिली करून शिवाय मुंबईत पुढारीपण मिळविलें, हें उदाहरणहि त्यांचे डोळ्यांपुढें होतें. तथापि, कायद्याच्या ज्ञानाचा उप-योग पैसे मिळविण्याकडे करूं नये असाहि विचार त्यांच्या मनांत अनेक वेळां येऊन गेला असावा. निदान त्यांच्या पुढील सर्व आयुष्यांतील आचर-णानें या तर्काला चांगलेंच प्रत्यंतर मिळतें. कारण, सर्व जन्मभर त्यांनीं वकिलीच्या ज्ञानाचा स्वतःकरितांच नव्हे तर दुसऱ्याच्याहि कार्याकरितां

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



उपयोग केला व करूं दिला, परंतु त्याचा मोबदला म्हणून कोणापासून एक पै हि घेतली नाहीं. १८८९ नंतर फर्ग्युसन कॉलेज सोडल्यावर त्यांनीं पुण्यांत वकिलीचा क्लास काढला पण स्वतः वकिली केली नाहीं. ती ते पुण्यांतहि करिते तरी लाखों रुपये मिळविते. परंतु एलूएल्. बी. होतांच त्यांनीं शिक्षण-संस्थेंत प्रवेश केला आणि ती सोडतांच राजकारण व वर्तमानपत्र हातीं घेतलें. लोकांनाहि एम्. ए. होण्यापेक्षां एल्एल्. बी. होण्याचा सल्ला ते देत. त्याचा हेतु हा कीं, कायद्याचें ज्ञान हें राजकारणाला अत्यंत आवश्यक व सार्वजनिक व्यवहारालाहि उपयोगी पडतें. पण शिक्षण काय किंवा राजकारण काय, दोन्हींतहि जुन्या पिढीविषयीं विशेष आशा न बाळगतां नव्या पिढीवरच त्यांनीं भिस्त ठेविली होती. टिळक एल्एल्. बी होण्याचे आधीं कांहीं दिवस कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे शाळाखात्यांतील सरकारी नोकरी सोडून स्वतंत्र खाजगी शाळा काढण्याच्या हेतूनें पुण्यास आले होते. त्यांचें ध्येय टिळकांना पटून त्यांनीं शास्त्रीबुवांच्या शाळेंत शिक्षक म्हणून सामील होण्याचें कबूल केलें. टिळक १८७९ च्या अखेरीस एल्एल्. बी. ची परीक्षा पास झाले व १ जानेवारी १८८० रोजीं न्यू इ. स्कूलचे शिक्षक म्हणून दाखल झाले. ही शाळा लवकरच भरभराटली. दरम्यान आगरकर, नामजोशी, गोळे, आपटे, केळकर, धारप वगैरे अनेक मंडळी शाळेला येऊन मिळाली.

टिळकांप्रमाणें आगरकरांनींहि शाळेला येऊन मिळण्यांत मोठाच स्वार्थ-त्याग केला होता. " विशेष संपत्तीची किंवा सुखाची हांव न धरतां फक्त पोटा-पुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्चिण्याचें " ध्येय त्यांनीं आपल्या डोळ्यापुढें ठेविलें होतें. १८८१ सालच्या प्रारंभीं या न्यू इं. स्कूलच्या मंडळींनीं 'केसरी' व 'मराठा' हीं वर्तमानपत्रें व आर्यभूषण छापखाना ही संस्था स्थापन केली. कारण, प्रत्यक्ष क्रमिक शिक्षण तरुण पिढीच्या विद्यार्थ्यांना देता येत असलें तरी एकंदर जनतेला शिक्षण द्यावें तें वर्तमानपत्रांचे द्वारेंच देतां येणें शक्य होतें. न्यू इं. स्कूलचे बरेच शिक्षक या इंग्रजी-मराठी पत्रांतुन लिहीत. ह्यामुळें वर्तमानपत्रेंहि लवकरच लोकप्रिय झालीं. त्यांतच १८८२ सालीं कोल्हापूर प्रकरण उद्भवलें. कोल्हापूरचे महाराज श्री. शिवाजीराव

यांचा, त्यांचे कुटुंबांतील मंडळी व संस्थानचे दिवाण यांच्याशीं, बेबनाव झाला होता. दिवाण हे महाराजाना वाईट रीतीनें वागवीत अशा समजुतीमुळें लोकांची सहानुभूति महाराजांकडे होती. या सहानभूतीमुळें 'केसरी' 'मराठा' पत्रांनीं कडक लेख लिहिले. त्यामुळें दिवाण रा. ब. बर्वे यांनीं दोन्ही पत्रावर मुंबई कोर्टांत अब्रुनुकसानीची फिर्याद केली. ह्या खटल्यांत टिळक आगरकर हे दोघे संपादक म्हणून तावडींत सापडले. सेशन कोर्टांत दोघेहि दोषी ठरून ता. १६ जुलै १८८२ रोजीं त्या दोघांना प्रत्येकीं चार महिने साध्या कैदेची शिक्षा झाली. या शिक्षेचे एकशें एक दिवस त्यांनीं मुंबईच्या डोंगरी येथील तुरुंगांत काढले. या खटल्याचे प्रकरणीं एकंदर जनतेची सहानुभूति केसरी–मराठ्याकडे असून त्यांच्या बचावाकरितां लोकांनीं वर्गण्या दिल्या, व टिळक-आगरकर तुरुंगांतून बाहेर आल्यावर अनेक रीतींनीं त्यांचा सत्कार केला. तुरुंगवासांत टिळकांचें चोवीस पौंड व आगरकरांचें सोळा पौंड वजन कमी झालें. यावरून दोघांना हा देहदंड किती भोंवला याची कल्पना येईल. पुढें खुद्द कोल्हापूरचे महाराजहि वेडे होऊन एक प्रकारच्या बंदिवासांत मरण पावले.

या प्रकरणामुळें वर्तमानपत्रांच्या लोकप्रियतेंत भर पडली. परंतु कचेरींतील गैरव्यवस्थेमुळें त्यांच्या डोक्यावर कर्जाचा बोजा बसला. त्यामुळें आपटे वगैरे एक दोघानीं वर्तमानपत्रांशीं आपला संबंध सोडला. परंतु इतरांनीं तीं टिकवून चालविण्याचा निश्चय केला. पुण्यांतील जुनीं वर्तमानपत्रें व तरुण विद्वानांनीं चालविलेला 'केसरी' यांमध्यें पुष्कळच फरक लोकांना दिसून आला व केसरीचा खप हजारांनीं होऊं लागला. मराठ्याचा खप कमी; परंतु सर्व हिंदुस्थानभर पुण्यांतील राष्ट्रीय वृत्तीच्या नव्या पिढीचीं मतें प्रगट करणारें इंग्रजी पत्र म्हणून त्याचें महत्त्व विशेष होतें. वर्तमानपत्रें हें न्यू इं. स्कूलमधील शिक्षकवर्गाच्या उद्योगाचें एक उपांग इतकेंच मानण्यांत येई. शिवाय शिक्षण–विषयांत जे मतभेद दिसून येत नाहींत ते वर्तमानपत्रांतील लेखनांत दिसून येत. यामुळें छापखाना व पत्रें यांचा व्याप वाढविण्यापेक्षां शिक्षण-संस्थेचाच अधिक व्याप वाढविण्याचें ठरलें. याच सुमारास हिंदुस्थान सरकारनें एज्यूकेशन कमिशन नेमिलें. त्याचा हेतु

उच्च शिक्षणाचा प्रसार कसा अधिक करतां येईल यांची चौकशी करण्याचा होता. या संधीचा फायदा घेऊन न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षक-वर्गानें आपले प्रगतिपर विचार वामनराव आपटे यांच्या द्वारें कमिशनपुढें मांडले. उच्च शिक्षण वाढावयाचें तर खाजगी लोकांनीं तें हातीं घ्यावें व सरकारनें त्यांना मदत करावी म्हणजेच तें कार्य होईल अशा मताचा लोकांत व सरकारांत वारा वाहात होता. आपटे यांनीं मांडलेल्या कैफियतीची वाहवा झाली. आपण कॉलेज काढूं तर ती कल्पना हटकून यशस्वी होईल अशी सर्वांना उमेद वाटली. कार्यक्रम आंखला गेला. १८८४ मध्यें डे. ए. सोसायटीची स्थापना झाली व ता. २ जानेवारी १८८५ रोजीं फर्ग्युसन कॉलेज उघडण्यांत आलें. न्यू इं. स्कूलप्रमाणें कॉलेजहि लवकरच भरभराटीला आलें. तें इतकें की, आपलें डेक्कन कॉलेज या लोकांच्या हातीं द्यावें, असें सरकारला वाटूं लागलें. पण अखेर ती गोष्ट घडली नाहीं.

[ २ ]

## टिळक संपादक झाले

कॉलेजांत टिळक संस्कृत व गणित हे दोन विषय शिकवीत. खाजगी कॉलेज काढावें ही टिळकांच्या मनांतील बरेच दिवसांची हौस अशा रीतीनें भागली. पण याच सुमारास वर्तमानपत्रांतील लेखांच्या धोरणामुळें शिक्षकवर्गांतील नव्या मताचे, जुन्या मताचे हा भेद प्रगट होऊन दुही माजली. शेवटीं सन १८८७ सालीं भांडणें विकोपाला जाऊन आगरकरांना केसरीशीं असलेला निकट संबंध सोडावा लागला, व त्यांच्या ऐवजीं टिळक हे केसरीचे कायदेशीर प्रकाशक झाले. वर्तमानपत्रांतील भांडणांचा असा निकाल लागला तरी एज्युकेशन सोसायटींतील भांडणें बळावलीं; व त्यांत टिळकांशीं न जमणाऱ्या लोकांचें बहुमत झाल्यानें टिळकांनीं सन १८९० सालीं सोसायटीच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. या राजीनाम्यांत टिळकांनीं आपली बाजू सविस्तर मांडली आहे. त्यावरून शिक्षण-संस्थेचें ध्येय, राजकीय मतें व सामाजिक मतें या तीनहि विषयांसंबंधीं मतभेद बळावून दोन पक्ष पक्के बनले. अर्थात् एकानें सोडावें व एकानें राहावें, याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं.

सन १८८९ सालीं राजीनाम्याचा विचार येतांच टिळकांनीं सार्वजनिक चळवळीला सुरुवात केली. पहिलें काम क्रॉफर्ड प्रकरणासंबंधानें. कमिशनर क्रॉफर्ड याजवर लांच खाल्ल्याची तोहमत आली. त्याच्या चौकशींत ज्या मामलेदार लोकांनीं सरकारतर्फें साक्षी दिल्या त्यांना प्रथम अभय दिलें असतां, सरकारनें त्यांना कामावरून दूर केलें ! या अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां टिळकांनीं बेसुमार खटपट केली. परंतु प्रपंच चालविण्याकरितां इतर कांहीं कायमचा असा उद्योग टिळकांना करणें प्राप्त होतें. म्हणून मोंगलाईत लातूर येथील एका जिनिंग फॅक्टरींत त्यांनीं कांहीं भांडवल घातलें. तसेंच पुण्यास वकिली-परीक्षेच्या विद्यार्थ्यांकरितां शिक्षणाचा वर्ग काढला. तसेंच, सतत राजकारण चालविण्याचें साधन म्हणून केसरी पत्र किंवा छापखाना हातीं घ्यावा, असें त्यांनीं ठरविलें. सन १८८७ पासून टिळक हे केसरीचे प्रकाशक होते तरी त्यांत ते स्वतः फारसें लिहीत नसत. परंतु सामाजिक मताच्या वादाचे अनेक प्रश्न उपस्थित झाले. केसरींत प्रत्यक्ष लिहिणाऱ्या गृहस्थांचीं व आपलीं मतें जुळत नाहींत असें टिळकांना जाणवूं लागलें. डे. ए. सोसायटीनेंहि छापखाना व वर्तमानपत्रें यांच्या मालकांशीं फारकत करण्याचें ठरविलें. तेव्हां कर्जाची व मिळकतीची वांटणी करतांना टिळकांनीं सात हजार रुपये कर्जाचा बोजा पत्करून ‘ केसरी व मराठा ’ हीं पत्रें आपल्या मालकीचीं करून घेतलीं. आर्यभूषण छापखाना इतर भागीदारांना दिला; पण त्याच छापखान्यांत ‘ केसरी–मराठा ’ कांहीं शर्तींवर छापून घेण्याची व्यवस्था केली.

सन १८९१ सालीं संमतिवयाच्या बिलावर पुण्यांत अतिशय निकराचा वाद झाला. त्यांत टिळक हे सनातनी पक्षाकडे होते; व त्यांनीं केसरींतून हा वाद विद्वत्तापूर्ण रीतीनें लढवून आपल्या वकिली थाटाच्या बुद्धीच्या कौशल्या-बरोबर जुन्या संस्कृत शास्त्रग्रंथांच्या परिचयाचीहि साक्ष लोकांस पटविली. याच सालीं पुणें येथील मिशन हौसमध्यें अस्पृश्यांच्या हातून चहा घेतल्या-बद्दल इतर अनेक लोकांबरोबर टिळकांवर सनातनी पक्षानें बहिष्कार घालून ग्रामण्य केलें. त्या प्रकरणीं टिळकांनीं आपलीं सनातनी मतें न सोडतां, त्यांतल्या त्यांत प्रायश्चित्ताच्या विषयावर मोठ्या कुशलतेनें वाद करून कट्टर

सनातनी पक्षाशीं झुंज मांडलें. यामुळें पूर्वी केवळ सुधारक व सनातनी एवढेच दोन पक्ष होते. त्यांत सुधारक-सनातनी अशा एका तिसऱ्या पक्षाची भर पडली. ग्रामण्य प्रकरणाप्रमाणें पंडिता रमाबाईच्या शारदासदनानेंहि पुण्यांतील वादांत भर घातली. पंडिता रमाबाई या विदुषीनें शारदासदन ही संस्था स्त्रियांच्या शिक्षणाकरितां काढली. परंतु बाईंचा कल दिवसेंदिवस ख्रिस्ती धर्माकडे झुकत चालल्यामुळें शारदासदनाला सुधारकांनीं मदत करण्यांत मोठा धोका आहे या मताचें प्रतिपादन टिळकांनीं केसरींतून अत्यंत जोरानें केलें; व तें खरें ठरून सन १८९३ सालीं सुधारकांना सदनाशीं संबंध तोडावा लागला. टिळकांना स्त्री-शिक्षण तत्त्वतः पसंत होतें, परंतु पुण्यांतील 'फीमेल एज्युकेशन सोसायटी' ची शाळा चालविण्यांत येत होती, त्या पद्धतीसंबंधानें सुधारकांशीं टिळकांचा मतभेद होता. सन १८९३–९४ सालीं मुंबईत व पुण्यांत हिंदु–मुसलमानांचे दंगे झाले. त्या बाबतींत सुधारकांनीं स्वीकारलेली तटस्थ वृत्ति टिळकांना मान्य नव्हती. टिळकांचें म्हणणें हरप्रयत्नानें हिंदु समाजाचें रक्षण स्वाभिमानपूर्वक केलें पाहिजे, त्याकरितां मुसलमानांशीं योग्य रीतीनें झगडलें पाहिजे, व सरकार मुसलमानांविषयीं पक्षपात करील तर सरकाराशींहि भांडलें पाहिजे. सुधारकांची तटस्थ वृत्ति. पण टिळकांची ही चढाईची वृत्ति. यामुळें पुण्यांतील या दोन पक्षांमधील मतभेद आणखी बळावले.

## टिळकांची विजयपरंपरा

सन १८९५ सालीं टिळक हे पुणें म्युनिसिपल निवडणुकीला उभे राहून निवडून आले, पण याहिपेक्षां त्यांचा मोठा विजय म्हटला म्हणजे मुंबई कायदेकौन्सिलांत त्यांची झालेली निवडणूक हा होय. ही निवडणूक एका बाजूस सुधारकपुरस्कृत नेमस्त पक्ष व दुसऱ्या बाजूस सनातनीपुरस्कृत राष्ट्रीय किंवा जहाल पक्ष यांच्यामध्यें अत्यंत चुरशीनें लढविली गेली. व या निवडणुकींत जय मिळाल्यानें पुण्याचे त्यावेळचे जुने पुढारी रा. ब. महादेव गोविंद रानडे व त्यांचे अनुयायी आगरकर, गोपाळराव गोखले या सर्वांवर ताण करून टिळक पुण्याचे पुढारी झाले असें उघड ठरलें. १८९४–९५ सालीं टिळकांनीं गणपत्युत्सव व शिवाजी–उत्सव हे दोन

प्रसिद्ध व महत्त्वाचे राष्ट्रीय उत्सव सुरू केले. जनतेच्या राष्ट्रीय भावनेला पोषक अशा या चळवळी होत्या. त्या सरकारला अर्थातच अप्रिय होत्या, पण ती अप्रियता सोसण्याची तयारी व धडाडी टिळकांनीं दाखविली, यामुळें यांचे हे नवे उद्योग म्हणजे केवळ रिकामपणचे उपद्व्याप नसून प्रवृत्तिपर राष्ट्रीय चळवळींतील तें एक ठळक अंग आहे, अशी जनतेची समजूत सहजच झाली. आणि याहि दृष्टीनें टिळकांच्या लोकप्रियतेंत अतिशय भर पडली. गणपत्युत्सव पुण्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रांत एकदम फैलावला, व सन १८९६ मध्यें टिळकांनीं रायगडावर पहिला शिवाजी उत्सव मोठ्या समारंभानें घडवून आणला. मध्यंतरी सन १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीय सभा भरली. तिचें चालकत्व प्रथमपासून अखेरपर्यंत न्या. मू. रानडे व गोपाळराव गोखले प्रभृतींच्या हातीं राहिलें. पण कट्टर सनातनी पक्षानें ग्रामण्य विसरून जाऊन, राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरविली जाऊं नये असा वाद उपस्थित केला; आणि तात्त्विक दृष्ट्या हें म्हणणें बरोबर, अशी बाजू टिळकांनींहि उचलून धरली. कारण, सामाजिक परिषदेविरुद्ध स्वतः टिळकांचेहि कांहीं आक्षेप असतच. या वादांत शेवटीं रानडे पक्षाला हार खावी लागली व सामाजिक परिषद वेगळ्या जागीं भरवावी लागली. गणपति व शिवाजी उत्सव ही कांहींशी स्थानिक बाब. पण राष्ट्रीय सभेंतील बखेडा हा सर्व हिंदुस्थानचें लक्ष वेधणारा; आणि रा. ब. रानडे सर्व हिंदुस्थानांत मान्यता पावलेले; यामुळें हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत सुधारक पक्ष टिळकांविरुद्ध, सनातनी, अर्ध–सनातनी पक्ष टिळकांच्या बाजूला, अशी अखिल भारतीय चळवळ होऊन, कायदे–कौन्सिलांत निवडल्यानेंहि जी प्रसिद्धि टिळकांना मिळाली नव्हती ती या वादांत मिळून, महाराष्ट्राचें निम्म्याहून अधिक पुढारीपण सर्व हिंदुस्थानच्या मतें टिळकांकडे आलें.

सन १८८९ सालीं मुंबईस राष्ट्रीय सभा झाली. तेव्हांपासून मुंबई इलाख्यांत, विशेषतः महाराष्ट्रांत, राजकीय चळवळ जोरानें सुरू झाली. पण राष्ट्रीय सभा ही नेमस्त किंवा लिबरल पुढाऱ्यांच्या हातीं असल्यामुळें महाराष्ट्रांतील त्या चळवळीचें अधिकृत पुढारीपणहि नेमस्तांच्याच हातीं होतें. राष्ट्रीय पक्षानें आपलीं विशिष्ट व उठावदार मतें प्रकट करण्यास

प्रारंभ केला होता; पण राष्ट्रीय सभेंतील अधिकृत पक्षाविरुद्ध प्रतिपक्ष मात्र दुय्यम अल्पसंख्य पक्ष, या न्यायानें विरोध वेशीवर बांधण्यापलीकडे त्याला अधिक यश येण्याचा संभव नव्हता. टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाला मध्यम वर्गापासून खालीं प्रतिष्ठा मिळाली होती. पण वरिष्ठ वर्गांत त्या चळवळीला 'कुचेष्टा' हेंच नांव अजून मिळत होतें. नेमस्त पक्षाकडे राष्ट्रीय सभेचें उपाध्ये-पण होतें तरी, महाराष्ट्रांत प्रांतिक परिषदा वगैरे भरत त्यांत, टिळकांना समाईक अधिकाराची जागा अर्थातच हटकून मिळत असे. पण प्रत्यक्ष बहुमत टिळकांच्या बाजूला न मिळाल्यानें त्यांना हार खावी लागे, व विरोध करूनच आपलें समाधान करून घ्यावें लागे. ही स्थिति पुण्यांतील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनांत विशेष प्रत्ययाला आली. तथापि प्रत्यक्ष कॉंग्रेसचें याज्ञिक जेथें चालावयाचें नसेल अशा ठिकाणीं, म्हणजे स्थानिक राजकारणांत, टिळकांची सरशी होऊं लागली होती. आणि त्याचें प्रत्यंतर याच सुमारास असें आलें कीं, न्यायमूर्ति रानडे हे पुण्याच्या सार्वजनिक सभेचे एक उत्पादक होते व गोपाळराव गोखले यांनीं सेक्रेटरी व संपादक या नात्याचें काम कांहीं वर्षें केलें होतें, तरी या सभेंत आपलें बहुमत प्रस्थापित करून टिळकांना ती काबीज करतां आली. आणि नेमस्त पक्षालाहि राजकीय चळवळ आपल्या पद्धतीनें करण्याकरितां स्वतंत्र व निरामय असें अधिष्ठान पाहिजे म्हणून, रानडे यांचे सल्ल्यानें ' डेक्कन सभा ' या नांवाची संस्था गोखले पक्षानें काढली. नेमस्त व जहाल असे राजकारणाचे दोन पंथ किंवा आखाडे उत्पन्न झाल्यावर सरकारची मान्यता कोणाला मिळणार, निदान त्याचा कल कोणाकडे झुकणार, हें उघडच दिसूं लागलें. सन १८९६–१८९७ सालीं सार्वजनिक सभा व डेक्कन सभा दोघांनींहि दुष्काळ निवारण्याची चळवळ केली. तींत सरकारनें सार्वजनिक सभेच्या कार्यपद्धतीवर ठपका ठेवून सरकार-दरबारीं तिची अमान्यता जाहीर केली, आणि महाराष्ट्रांतील लोकमताचें मुख म्हणून डेक्कन सभेला मान्यता दिली. पण सरकार हें जसें एक प्रस्थ तसेंच जनता हें तितकेंच महत्त्वाचें दुसरें प्रस्थ केव्हांहि ठरतें. आणि या दुसऱ्या प्रस्थाच्या दरबारीं टिळक व राष्ट्रीय पक्ष यांची सेवा अधिक मान्यता पावूं लागली. नेमस्त पक्षानें चालविलेलीं वर्तमानपत्रें व

राष्ट्रीय पक्षानें चालविलेलीं वर्तमानपत्रें यांपैकीं या दुसऱ्यांचा वाचक वर्ग पुष्कळच वाढूं लागला.

सन १८९१ पासून टिळक हे सरकाच्या डोळ्यावर येऊं लागले. संमतिवयाच्या बिलाला त्यांचा जो विरोध होता तो वास्तविक प्रत्यक्ष राजकारणाशीं संलग्न नव्हता. तथापि तें बिल सरकारनें पुढें आणलें होतें म्हणून त्याला जो विरोध तो सरकारलाहि विरोधच! शिवाय या बिलाला विरोध करतांना टिळकांनीं सुधारक पक्षाची खूप हजेरी घेतली, आणि तो आधीं लोकांत अप्रिय होता त्यापेक्षां अधिकच अप्रिय करून सोडला. ही गोष्ट सरकारला आवडण्यासारखी नव्हती. कारण, जनतेमध्यें आपणाला संभाळून धरणारा असा एखादा वर्ग सरकारला हवा असतोच, आणि तो वर्ग सुशिक्षित सुधारक हाच तेव्हां होता. पण सन १८९२ पासून केसरीच्या टीकेचें तोंड खुद्द सरकारकडे अधिक वळलें. प्रथम हिंदु-मुसलमानांचे दंगे, त्यानंतर हॅरिसशाहीचे प्रताप, इत्यादि विषयांवर टिळकांची केसरींतील टीका सरकारास झोंबण्यासारखीच होती. पण पुढें प्लेगनिवारणार्थ सरकारनें केलेली कडक उपायांची योजना, तसेंच दुष्काळ-निवारणासंबंधानें सरकारचें अनुदारपणाचें धोरण, यांविषयींची केसरीची टीका त्यांना फारच जाचक वाटली. सन १८८९ पासून ते सन १८९६ पर्यंतचें टिळकांचें चरित्र पाहिलें तर एका बाजूला ते नवे नवे विषय घेऊन सरकारावर टीकेचे हल्ले चढवीत होते व लोकांच्या मनांत राष्ट्रीय राजकारण बिंबवून देत होते; व दुसऱ्या बाजूला वाढती लोकप्रियता संपादन करून ते जयामागून जय मिळवीत होते. राष्ट्रीय सभेच्या कार्यांत ते एक प्रांतिक पुढारी म्हणून सन १८८९ पासूनच गणले जाऊं लागले. पुढें कॉंग्रेसमधून त्यांनीं सामाजिक परिषदेची हकालपट्टी केली. पुण्याची म्युनिसिपल निवडणूक जिंकली. ते युनिव्हर्सिटींत निवडून आले, कायदेमंडळांत निवडून आले. कोणत्याहि राष्ट्रीय चळवळीचें नांव निघालें कीं जनता एकस्या त्यांच्याकडे विश्वासानें बोट दाखवूं लागली. या गोष्टी सरकारच्या नजरेंतून जाणें शक्य नव्हतें, आणि त्यांच्यावर केव्हां झडप घालतां येईल याची तें वाट पाहात बसलें होतें. दुष्काळाच्या चळवळींत टिळकांवर खटला व्हावयाचा; पण इतर लहानसहान लोकांवर खटले

करून सरकारानें आपलें कार्य साधून घेतलें. सन १८९६ सालीं ' मराठा ' पत्राच्या संपादकानें प्लेगची धामधुम सुरू होण्यापूर्वीच टिळकांवरील संकटाला उद्देशून भविष्यादाखल असा जाहीर इषारा दिला कीं, ' वादळ होऊं घातलें आहे. धोक्याचा बावटा लवकरच उभारला जाईल. ' पण हें भविष्य नसून राष्ट्रीय चळवळीच्या तीव्रतेवरून व सरकाराच्या मनोवृत्तीवरून खरें ठरणारें अनुमानच होतें.

## सरकारकडून छळाचा प्रारंभ

पुण्यांत सन १८९६ अखेर प्लेग सुरू झाला. त्याचा कहर फार झाला, पण त्याहिपेक्षां प्लेगच्या व्यवस्थेकरितां नेमलेल्या रँडसाहेबांच्या अधिकाराच्या जुलमाचा कहर अधिक झाला. या प्लेगच्या अपत्तींत लोकांचें दुःखनिवारण करण्याकरितां स्वतः टिळकांनीं पुष्कळच विधायक कामगिरी केली, व कांहींसें पडतें घेऊन रँडसाहेबाशीं सहकारिताहि केली, परंतु अखेर सर्वसामान्य जनतेनें भोगलेल्या दुःखाचा कडेलोट होऊन, ता. २२ जून सन १८९७ रोजीं रात्रीं सरकारी बंगल्यांतील ज्युबिलीच्या मेजवानीनंतर गणेशखिंड रस्त्यावर प्लेगचे मुख्य अधिकारी रँडसाहेब यांचा खून झाला ! सरकारच्या मनांत या खुनाचा संबंध टिळकांपर्यंत नेऊन भिडवावयाचा होता. परंतु तसा कांहीं संबंध त्यांना लावतां आला नाहीं. तरी वड्याचें तेल वांग्यावर काढावें या न्यायानें त्या सालच्या शिवाजी उत्सवांतील कांहीं व्याख्यानें व कांहीं कविता केसरींत छापल्या त्यांचें निमित्त करून टिळकांवर सरकारनें राजद्रोहाचा खटला भरला. आणि टिळकांचे सहकारी सरदार नातू यांना उचलून नेऊन नजरकैदेंत ठवलें. टिळकांवरील खटल्यानें सर्व देश हादरला व चोहोंकडून मदतीचीं आश्वासनेंहि आलीं. बंगालनें तर मुख्य बॅरिस्टर पुरविला. पण अखेर मुंबई हायकोर्टाच्या सेशनमध्यें खटला चालून, न्यायमूर्ति स्ट्रॅची यांनीं ज्यूरीला खटला समजावून देतांना टिळकांविरुद्ध उघड उघड रोख धरला; व ता. १४ सप्टेंबर सन १८९७ रोजीं टिळकांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली ! त्या शिक्षेविरुद्ध विलायतेस अपील दाखल करण्यांत आलें. परंतु त्यांत कांहीं निष्पन्न झालें नाहीं. विलायतेंत टिळकांचा खटला माजी मुख्य प्रधान मि. ॲस्क्विथ यांनीं

चालविला. पण वकील किती मोठा व खटला किती चांगला असला तरी काय उपयोग ? याच सुमारास 'मोदवृत्त' वगैरे इतर अनेक मराठी वर्तमानपत्रांवरहि राजद्रोहाचे खटले होऊन संपादकांना कडक शिक्षा झाल्या. अशा रीतीनें एकीकडे राष्ट्रीय चळवळीची, आणि दुसरीकडे राजद्रोहाचे खटले भरून दहशत उत्पन्न करण्याची, सरकारची पहिली मोहीम समाप्त झाली.

टिळकांना ही सर्व १८ महिन्यांची शिक्षा भोगावी लागली नाहीं. आधीं सहा महिने त्यांची सुटका झाली. त्यांची सुटका होण्याकरितां विलायतेंत मॅक्समुल्लरप्रभृति संस्कृत पंडित व हॉवर्ड असोसिएशनसारख्या परोपकारी संस्था यांनीं निरनिराळ्या प्रकारें खटपट केली. शिक्षेच्या पहिल्या वर्षाच्या अखेर रँडसाहेबाचा खून करणाऱ्या चाफेकर बंधूंचा सुगावा लागला; व त्या चौकशींत टिळकांचा खुनाशीं कांहीं संबंध नाहीं असें गुप्त पोलीस खात्याला कळून आलें. टिळकांना सोडण्याच्या आधीं टिळकांनीं माफी मागावी अशी कारवाई सरकारनें करून पाहिली; परंतु ती सफल झाली नाहीं. तथापि ता. ६ सप्टेंबर रोजीं, म्हणजे एक्कावन्न आठवडे पक्की कैद भोगल्यानंतर, टिळकांची मुक्तता झाली. या शिक्षेच्या अवधींत त्यांचें वजन फारच कमी झालें होतें व ते जिवंत परत येतात कीं नाहीं अशी शंका वाटूं लागली होती. या खटल्याच्या योगानें टिळकांची कीर्ति हिंदुस्थानांतच काय पण विलायतेंतहि पसरली. सुटकेनंतर कांहीं दिवस विश्रांती घेऊन टिळकांनीं आपला एक नवा ग्रंथ लिहून काढला. त्याचें नांव 'आर्यांचें मूळ वसतिस्थान व वेदांतून त्याची निष्पत्ति.' या ग्रंथांत वेदवचनांची, भौतिक सृष्टीच्या वर्णनानुरोधानें, छाननी केलेली असून वेदाचा काळ किती जुना आहे हेंहि अनुषंगानें दर्शविण्यांत आलें आहे. या ग्रंथाचें थोरलें जुळें भावंड ८ वर्षांपूर्वीच टिळकांनीं जन्मास घातलें होतें. त्या ग्रंथाचें नांव 'ओरायन'. यांतहि ज्योतिर्गणिताच्या आधारें वेदाचें प्राचीनत्व ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. या ग्रंथावर पाश्चात्य पंडितांचे कांहीं चांगले अभिप्राय पडले; व टिळक हे जसे मोठे राष्ट्रीय पुढारी तसेच ते अत्यंत जाडे विद्वान् व संशोधक आहेत अशी त्यांची ख्याती प्रस्थापित झाली. टिळकांची विद्वत्ता व राजकारणांतील उद्योग हीं अशा रीतीनें एकमेकांस पोषकच झालीं.

रँडच्या खुनाचें शेंपूट इतर रीतीनें आणखी बरेंच लांबलें, व त्याला अनुसरून टिळक व महाराष्ट्र यांच्यावर विलायतेंतील पत्रांनीं पुष्कळ तोंडसुख घेतलें. त्याचा फायदा घेऊन टिळकांनीं मुंबईंतील 'टाइम्स ऑफ इंडिया' व विलायतेंतील 'ग्लोब' या पत्रांना खटल्याची धमकी दिल्याबरोबर दोघांनींहि माफी मागितली, व टिळकांचा अत्याचाराशीं संबंध जोडण्याचा त्यांच्या शत्रूंचा पयत्न या वेळेपुरता निष्फळ ठरला. कैदेंतून सुटल्यावर पुढील चार वर्षें टिळकांना किंचित् शांततेचीं गेलीं. त्यांत त्यांनीं केसरीची सुधारणा व व्यवस्था करून घेतली. टिळक तुरुंगांत असतांना आर्यभूषण छापखान्यानें केसरी छापण्याचें बंद केलें होतें; परंतु टिळक सुटून आल्यावर त्यांनीं पुनः आर्यभूषण छापखान्यांतच पण वेगळी व्यवस्था करून केसरी छापण्यास सुरुवात केली. ता. ४ जुलै सन १८९९ पासून टिळकांनीं स्वतः कायदेशीर संपादक म्हणून पुढें येऊन, व 'पुनश्च हरिः ॐ' या मथळ्याखालीं मोठा उद्बोधक अग्रलेख लिहून, 'हा पहा मी फिरून राजकारणाच्या कामाला जुंपलों' असें शिंग फुंकलें. आणि पुढें दुर्दैवानें ताईमहाराज–प्रकरण अंगावर येऊन पडलें नसतें तर महाराष्ट्रांत राजकारण रंगलें त्याहूनहि अधिक उठावदार रीतीनें त्यांनीं तें रंगविलें असतें. या अभावित प्रकरणानें त्यांचा पुष्कळ पैसा नासला, पण त्याहिपेक्षां त्यानें त्यांच्या मौल्यवान् वेळेचा अधिक अपहार केला, आणि एक प्रकारें त्यांच्या चारित्र्यावर घाला घालण्याचें संकट उभें केलें !

## ताईमहाराज प्रकरण

ताईमहाराज–प्रकरण म्हणजे काय होतें हें सविस्तर सांगण्यास येथें जागा नाहीं. पण थोडक्यांत तें असें होतें. टिळकांचे एक स्नेही, सरदार बाबामहाराज, यांचा टिळकांवर विश्वास असल्यामुळें, त्यांनीं मृत्युपत्र करून आपल्या इस्टेटीच्या व्यवस्थेकरितां ट्रस्टी नेमले त्यांत टिळक प्रमुख होते. मेलेल्या मित्राचा शब्द पाळण्याकरितां टिळकांनीं ट्रस्टीचें काम अंगावर घेतलें. बाबामहाराजांची विधवा स्त्री ताईमहाराज यांना मुलगा दत्तक देणें प्राप्त होतें, व त्या बाबतींत ती बिचारी बदसल्लागारांच्या हातीं सांपडून तिनें टिळकांच्या योजनेला विरोध केला ! पण अखेर टिळकांनीं आपल्या मताप्रमाणें दत्तक-

विधान घडवून आणलें; व ट्रस्टी या नात्यानें आपल्या योग्य अधिकाराची कदर स्वतः बाई व तिचे सहकारी यांना दाखविली. तेव्हां बाईला टिळक छळतात असा कांहीं लोकांनीं कांगावा केला. आणि प्रोबेटनें टिळकांना मिळालेला अधिकार कोर्टातून काढून घेणें, पहिलें दत्तविधान अमान्य करणें, दुसरें आपल्या हिताचें घडवून आणणें, अशी कारवाई सुरू केली !

या कामीं प्रतिपक्षाला सरकारची मदत अवश्य होती. सरकारलाहि हें हवेंच होतें कीं, एखाद्या खासगी व्यवहाराच्या मानगडींत ओढून टिळकांच्यावर खोटी साक्ष देणें, खोटे कागद करणें, वगैरे कांहीं अनैतिक प्रकारच्या गुन्ह्यांचा आरोप करून, त्यांना न्यायकोर्टात दोषी ठरवितां आलें तर 'औषधांवांचून खोकला गेला !' अशा रीतीनें टिळकांच्या विरुद्ध ताईमहाराज व त्यांचे सरकारी यांचा एक गट बनून, त्यांनीं वरील सर्व प्रकारची कामगिरी सरकारच्या मदतीनें प्रथम पार पाडली. जिल्हा-कोर्टानें टिळकांचा ट्रस्टीचा अधिकार तर काढून घेतलाच, पण त्यांच्यावर खोट्या साक्षीची तोहमत ठेवली. त्यांत त्यांना स्पेशल मॅजिस्ट्रेटनें दीड वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा दिली. पण सुदैवानें सर लॉरेन्स जेंकिन्स हे मुंबई हायकोर्टाचे सरन्यायाधीश होते व त्यांना सरकारच्या या चढाईच्या धोरणाचा कयास बरोबर बांधतां आला. टिळकांविरुद्ध पुरावाहि फार कमी प्रतीचा व लटपटीचा होता. यामुळें हायकोर्टानें टिळकांना त्या व इतर सर्व आरोपांतून एकदम कायमचें दोषमुक्त करून सोडून दिलें. पण आपण करविलेलें दत्तविधान शाबीत करून घेणें हें दिवाणी कायद्याच्या दृष्टीनें टिळकांना केव्हांहि प्राप्तच होतें. म्हणून त्यांनीं पुणें फर्स्ट-क्लास कोर्टात दत्तक-शाबितीचा दावा लावला. त्याचा निकाल त्यांच्यासारखा झाला. पण पुढें टिळक तुरुंगांत असतां हा हुकूमनामा न्या. मू. चंदावरकरांनीं रद्द केला. परंतु टिळकांनीं प्रिव्हि-कौन्सिलकडे अपील केलें तें यशस्वी होऊन दत्तकप्रकरणाचा अखेरचा निकाल टिळकांसारखा होऊन दत्तक पुत्र ( हल्लींचे ना. श्रीजगन्नाथमहाराज ) हे बाबामहाराजांचे वारस म्हणून ठरवण्यांत आले. पुढें कोर्ट ऑफ वॉर्ड्सच्या ताब्यांतून सर्व इस्टेटहि त्यांची त्यांना मिळाली. हें सर्व प्रकरण १०।१५ वर्षें घोळत होतें. टिळक मृत्यु पावले त्याचे आधीं अगदीं थोडे दिवसपर्यंत श्री. जगन्नाथमहाराज यांची इस्टेट

त्यांना लाभूं देऊं नये असा प्रयत्न प्रतिपक्षाकडून चालू होता. पण तोहि आपल्या वाकिली ज्ञानानें टिळकांनीं परतविला. अशा रीतीनें १८९८ पासून १९२० पर्यंत, जें एक भित्रकार्य हातीं धरलें तें पुढें ढकलून त्यांनीं त्याची कड पोंचविली. अपल्या कर्तव्यनिष्ठेची व नैतिक आत्मविश्वासाची खरी कसोटी लागलेली टिळकांनीं जगाला दाखविली व त्याजकडून धन्य धन्य म्हणवून घेतलें.

सन १८९८ सालीं तुरुंगांतून सुटल्यावर टिळकांनीं पुनः लॉ क्लास सुरू केला. मात्र लवकरच तो प्लेगमुळें बंद करावा लागला. टिळक राजकारणांत अधिकाधिक गुंतुन पडूं लागले. तथापि केसरीचें कर्ज फिटून त्याच्या उत्पन्नावर त्यांना आपला संसार चालवितां येऊं लागला. सन १८९९ व १९०१ या सालात टिळकांनीं अनेक नामांकित लेख केसरींत लिहिले. आपले व्यवसायबंधु कै० शिवरामपंत परांजपे, व त्यांच्या विचारांचे इतर वर्तमानपत्रकार, यांच्यावर मुंबईकर नेमस्त पुढाऱ्यांचा हल्ला सुरू होता तो त्यांनीं परतविला. प्लेग–प्रतिबंधक लस तयार करण्याचा उपक्रम सरकारनें केला. त्यांतील दोष व व्यंगें दाखविण्याची, आणि ती लस सक्तीनें टोंचली जाऊं नये याविषयींची, टिळकांनीं पुष्कळ खटपट केली. नाना फडणविसांचा उत्सव सुरू केला. पंचांग–शोधनाच्या चळवळीला प्रारंभ केला. रायगडावरील दुसरा उत्सव करून त्या राष्ट्रीय उत्सवाला कायमपणा आणला. आणि पंडितागिरीच्या दृष्टीनें शिवजन्मतिथीचा निर्णय, ज्ञानेश्वरांच्या वादांतील ज्ञानेश्वर दोन नसून एकच या सिद्धांतांची मांडणी, वगैरे अनेक गोष्टी त्यांनीं केल्या. याशिवाय पुढें त्यांनीं जमीनमहसुलाच्या नव्या कायद्यासंबंधानें पुष्कळ चळवळ केली, व दिल्ली दरबारच्या स्वरूपाचें यथायोग्य आविष्करण केलें. शिवाजी–उत्सवाचें बीज बंगाल्यांत रोवविलें. इकडील आखाड्यांचें महत्त्व व उपयोग हीं बंगाली तरुणांना पटवून दिलीं. आणि या सर्व गोष्टी ताईमहाराज-प्रकरणाची धामधूम चालू असतांनांच त्यांनीं केल्या, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

[ ३ ]

यानंतरच्या टिळकांच्या आयुष्याचे तीन भाग पडतात. एक १९०८

पर्यंत, दुसरा १९१४ पर्यंत व तिसरा १९२० पर्यंत. या पहिल्या भागाला 'उदयपर्व', दुसऱ्याला 'तपस्यापर्व', व तिसऱ्याला 'सिद्धिपर्व' अशींहि नांवें देतां येतील. हा पहिला खंड टिळकांच्या वयाच्या ४४ ते ५२ ऱ्या वर्षापर्यंतचा, दुसरा ५२ ते ५८ वर्षापर्यंचा, व तिसरा ५८ ते ६४ या वर्षापर्यंतचा. या पहिल्या खंडांतील टिळकांची कामगिरी महाराष्ट्रांत राष्ट्रीय पक्ष जन्मास घालून तो पायावर उभा करण्याची झाली. ही कामगिरी करतांना त्यांना ज्या प्रतिपक्षाशीं झगडावें लागलें, त्यांत मोठमोठे नामांकित राजकीय पुढारी होते. आणि त्या झगड्याचें कारण असें—

## नेमस्तांची विचारसरणी

या पुढाऱ्यांच्या मतें इंग्रज सरकार हें युक्तिवादानें, गोडीगुलाबीनें, नेमस्तपणानें वश होऊन प्रजेला राज्याधिकार देईल असें होतें. हिंदुस्थानांत प्रस्थापित झालेलें इंग्रजांचें राज्य ही ईश्वराचीच एक सहेतुक योजना असून फिरून ती योजनाहि हिंदुस्थानच्या हिताकरितांच आहे अशी उदारमतवादित्वाची भूमिका त्या पुढाऱ्यांनीं स्वीकारली होती. कालमानाप्रमाणें, म्हणजे ज्या परिस्थितींतून त्यांनीं राजकीय चळवळीची वाट काढली, व ज्या पूर्वसंस्कारांचें ओझें खांद्यावर घेऊन जी वाट त्यांना चालावी लागली तिच्या दृष्टीनें, ती भूमिका बरोबर होती असेंहि म्हणतां येईल. गोड बोलून जिंकावयाचा, युक्तिवाद करून जिंकावयाचा प्रतिपक्षी हा उदार दिलाचाच नसला तरी सरळ मनाचा असेल, त्याचें अंतःकरण प्रतिभासंपन्न नसलें तरी निदान त्याची विवेचक बुद्धि त्याला दगा देणार नाहीं, आणि ईश्वरानेंहि जर त्याला प्रजेशीं बोलतांना भलेपणाची भाषा शिकविली आहे तर त्याच्या हातुन भलेपणाचेंच कार्य ईश्वर घडवून कां न आणील? अशी नेमस्त पुढाऱ्यांची विचारसरणी होती. पण या भलेपणाच्या विचारसरणींत धैर्य, स्वार्थपराङ्मुखता, व सत्यप्रियता या तीन श्रेष्ठ गुणांचा अभाव दडून राहिलेला आहे, किंवा जाणूनबुजून तो दडविला जातो, अशी शंका नवीन पक्षाच्या पुढाऱ्यांना येऊं लागली. आपल्या अंगचे हे तीनहि गुण आपण अधिक प्रगट करूं शकूं असा त्यांना आत्मविश्वास वाटूं लागला. आणि

व्यावहारिक जग त्रयस्थ या नात्यानेंहि त्याचेंच म्हणणें बरोबर आहे अशी ग्वाही देऊं लागलें.

## राष्ट्रीय-पक्षाची विचारसरणी

नव्या पक्षाचें म्हणणें थोडक्यांत असें कीं, राज्यसंपादन कोणीहि मोक्ष-प्राप्तीकरितां करीत नाहीं, ऐहिक सुखलालसेनेंच करतो. इंग्रज सहा हजार मैलांवरून, एवढे कष्ट सोसून, इकडे आले व त्यांनीं इतक्या प्रकारच्या स्थानिक अडचणींतून परिश्रमानें व दक्षतेनें मार्ग काढला; आणि सर्व हिंदु-स्थानभर मेखा मारून आपल्या राज्याचा तंबू उभारला; तो हिंदी लोकांच्या हातीं राज्यसूत्रें व त्याचे सर्व आर्थिक फायदे देण्याकरितां नव्हे. या देशां-तील लोकांचा कमीपणा तोच इंग्रजांचा मोठेपणा. या लोकांचें जें अनहित तेंच इंग्रजाचें हित. आणि या लोकांची स्वराज्याविषयींची निराशा तीच इंग्रजाची आपलें साम्राज्य टिकविण्याची आशा. असा हा दुस्तर विरोध उघड आहे. आम्ही देखील स्वराज्य हें निःश्रेयसाचें साधन म्हणून इच्छीत नसून अभ्युदयाचें साधन म्हणूनच जर मानतों, तर त्या परक्या साम्राज्याच्या धन्याच्या मनांत लोकोत्तर परोपकारबुद्धि प्रभावी होईल असें आपण काय म्हणून घेऊन चालावें ? जगाच्या जन्मापासून आतांपर्यंतचा सर्व व्यवहार हा ईश्वराच्या योजनेनेंच होत असतो हें खरें. पण हिंदुस्थानच्या लोकांनीं इंग्रजांच्या राज्याखालीं, म्हणजे पारतंत्र्यांत, कायमचें राहावें हीच ईश्वरी योजना होय असें मानणें हें आत्मघातकीच नव्हे पण मूर्खपणाचेंहि आहे! कोणतीहि ईश्वरी योजना उलटापालटीच्या रूपानेंच अनुभवाला येते. जन्म-मरण, धारणें-पारणें, क्रिया-प्रतिक्रिया, यशापयश, या जोड्या ईश्वरानें नियति-चक्रांतच बसविलेल्या असून, 'नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' या न्यायानें इंग्रज सरकारला हिंदुस्थानांत आणणें ही जर एका ईश्वरी योजनेंतील नांदी असली, तर त्यांनीं कांहीं कालानें तरी आमचें राज्य आमच्या स्वाधीन करून स्वदेशीं परत जावें, किंवा येथें कोणी राहिलेच तर त्यांनीं प्रजेशीं समताभावानें आणि सेवाधर्माच्या विनयबुद्धीनें वाटल्यास राहावें, हें त्याच ईश्वरी योजनेचें भरतवाक्य होय असें आपण मानलें, तर तें ईश्वराघरीं खाचित रुजू होईल. इंग्रज स्वतःच्या स्वार्थाबरोबर आमचा थोडा-

बहुत फायदा आपाततः करून देत असतीलहि. किंवा व्यवहारी स्वार्थी माणसाच्या मनांतहि निरपेक्ष परोपकाराची वृत्ति क्षणभर प्रगट होऊं शकते, त्या वृत्तींतहि त्यांनीं आम्हांला कांहीं दिलें असेल, आम्हांला कांहीं शिकविलें असेल. परंतु त्याचा मोबदला म्हणून, कृतज्ञता म्हणून, जन्मभर या देशानें त्यांची गुलामगिरीच पत्करली पाहिजे असें होत नाहीं. शेतकरी धान्याचीं पोतीं गाडींत भरून घरीं नेत असतां, वाटेनें थोडेंबहुत धान्य सांडत जातच असतें. म्हणून तो तीं उदार मनानें भिक्षा वांटीत चालला आहे असें कोणी म्हणत नाहीं. कोळ्यानें जाळ्यांत पकडलेल्या माशांतून एखादा जाळ्याच्या तुटक्या भागांतून सुटून पुन्हां परत पाण्यांत पडतो व वांचतो, म्हणून तो कोळ्यानें धर्म केला किंवा त्यानें अहिंसेचें, जीव-दयेचें व्रत आचरलें असें कोणी म्हणत नाहीं. शाळेंत शिकणारा विद्यार्थी वयानें प्रौढ झाला म्हणजे तो, मानवी हक्कांनीं, गुरूच्या बरोबरीचा होतो. मग त्याला गुरूच्या विद्येइतकी विद्या लाभलेली नसली म्हणून काय झालें ! इंग्रज भलेपणाची भाषा बोलतील तिला तेवढ्यापुरतें आपण भलेपणाचें उत्तर देण्याला हरकत नाहीं. पण स्वराज्यसंपादनाच्या एकंदर चळवळीचें कार्य अशानें कसें पार पडणार ? आधीं युक्तिवादाला मर्यादा आहे. पण युक्तिवाद पटला असतां त्याप्रमाणें सर्वच लोक वागतात असें नाहीं. म्हणून युक्तिवाद न सोडतांहि, जशास तसें म्हणून, प्रतिकाररूपानें वेळीं आडमार्गांत शिरूनहि बोलावें लागतें. विवेचक बुद्धीपेक्षां भावनेनेंच जगांत अधिक कार्य होतें. आणि भावनाप्रेरित मनुष्य बोलू लागला म्हणजे औचित्यविचाराचीं शंभर अंगें किंवा तंत्रें तो सांभाळूं शकत नाहीं. त्याला हटवादांत शिरावें लागतें. वितंडा करावी लागते. पण याशिवाय भाषणांत स्पष्टवक्तेपणा, कठोर-पणा आणावा लागतो. टोंचून लागून बोलावें लागतें. थट्टामस्करी व पाण-उतारा करावा लागतो. वेळीं शिव्याशापहि द्यावे लागतात. कारण अमूर्त सरकारी भाषा सौम्य, संभावित व नेमस्त असली तरी व्यक्तिशः गोरे अधि-कारी, त्यांचे सगेसोयरे, आणि स्वतःच्या हितचिंतनामुळें इंग्रजाचें हित-चिंतन करणारे आमच्यांतलेच स्वाभिमाननष्ट किंवा देशद्रोही काळे लोक—या सर्वांच्या भाषणांतून, लेखांतून भलेपणा व मर्यादा कितीशा सांभाळल्या

जातात ? म्हणून आपणहि आडरानांत शिरणें प्राप्तच. पण स्वदेशाचा उद्धार करावयाचा तर नुसती वाचिक तपस्या उपयोगी पडत नाहीं. मनांत जशी खरी स्वदेशभक्ति असावी लागते, तशीच तिची सगुण उपासना करावयाची तर सक्रियताहि लागते. आणि ती सक्रियता म्हणजे मुख्यतः स्वदेशाला उपकारक होतील अशा राजकीयच काय पण औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक प्रतिस्पर्धी चळवळी व उद्योग करावे लागतात. अशा रीतीनें सरकारला प्रतिपक्ष व प्रतिक्रिया उत्पन्न झाली म्हणजे, ती मोडून काढण्याला सरकार आपलें बळ व आपलीं साधनें उपयोगांत आणूं लागतें. आणि त्याचा परिणाम खाऊन जिरवून टाकून, त्यावर आपणच अंगुष्ठमात्र तरी उरावयाचें तर त्याला निर्भयवृत्ति, धैर्य, स्वार्थत्याग, शारीरिक व आर्थिक कष्ट सोसण्याची तयारी लागते. फार काय, पण सकृद्दर्शनीं अवगुण किंवा पाप असें स्वरूप असणाऱ्या गोष्टीहि, केवळ निस्वार्थीपणाच्या आधारावर करून, जगाचें बोलून घ्यावें लागतें. आणि आपल्या शुद्ध सात्त्विक अंतःकरणाच्या सुखावर दुःखःकारक, अपकीर्तिकारक जीवन कंठावें लागतें. तात्पर्य, वर सांगितलेल्या वाचिक तपस्येच्या जोडीला या मानसिक व कायिक तपस्येची जोड द्यावी लागते.

## उदयकालचे उद्योग

अशा रीतीनें नेमस्त पक्षाचें व राष्ट्रीय पक्षाचें तत्त्वज्ञान भिन्न असून, त्यांतील विरोध टिळकांच्या बरोबरीच्या नव्या पिढीनें सर्व हिंदुस्थानभर विसाव्या शतकाच्या प्रारंभीं प्रकट करण्यास सुरुवात केली. नेमस्तांच्या तत्त्वज्ञानांतील कांहीं थोडा अंश राष्ट्रीय पक्षाला मान्य होता. उलट राष्ट्रीय पक्षाच्या तत्त्वज्ञानांतील कांहीं भाग नेमस्त पक्षाला मान्य होता. पण आपलें कार्य यशस्वी करावयाचें तर वैशिष्ट्य राखावें लागतें, व वैशिष्ट्य राखावयाचें तर विरोधदर्शन करावें लागतें. म्हणून नेमस्तपक्षानें नेमस्तपणा, कायदेशीरपणा, सनदशीरपणा हेच शब्द आपल्या पक्षाच्या निशाणावर लिहिले. आणि राष्ट्रीय बाण्याचे जहाल शब्द नवीन पक्षानें आपल्या निशाणावर लिहिले. हा या पक्षोपन्यासातील सरळ वृत्तांत होय. मग उभयपक्षांनीं एकमेकांचा पराभव करण्याकरितां एकमेकांची थट्टा, निंदा, उपहास, पाडाव करण्याचे शक्य ते

सर्व उपाय व उद्योग केले, ते मनुष्यस्वभावाला धरून होते इतकें म्हणूनच सोडून द्यावें लागतें. कारण हा मनुष्यस्वभाव एकाच पक्षाला दिलेला नसून, त्याची वांटणी उभय पक्षांत सारखीच झालेली होती. नेमस्तपक्षानें आपल्या पद्धतीचें कार्य तीन पिढ्या म्हणजे दादाभाई नौरोजीपासून गोखल्यांपर्यंत सुरू ठेविलें होतें. पण मवाळ नांव पावलेल्या नेमस्तांनीं जहाल नांव दिलेल्या राष्ट्रीय पक्षाची टिळकांची ही पहिलीच पिढी होती. हें द्वंद्व, व्यक्तींतील नव्हे पण पक्षांतील द्वंद्व, अजून चालू आहेच व आणखी किती पिढ्या चालेल हें सांगतां येत नाहीं. पण नेमस्तपक्षाला मागें टाकणारा राष्ट्रीयपक्ष निघाला, राष्ट्रीयपक्षाला मागें टाकणारा सत्याग्रहीपक्ष निघाला, सत्याग्रहीपक्षाला मागें टाकणारा कम्यूनिस्ट पक्ष निघाला, आणि कम्यूनिस्टपक्षालाहि मागें टाकणारा टेररिस्ट, क्रांतिकारक किंवा अराजकपक्ष निघाला—हाच क्रम पुढेंहि अनेक पिढ्या या पक्षांच्या चढउतारांतून चालणारा आहे.

जुन्या व नव्या पक्षांतील भेद व विरोध अशा रीतीनें किंचित् सविस्तर सांगण्याचा हेतु हा कीं, राष्ट्रीय वृत्तीचें वरील विचारसरणीचें टिळकांचें धोरण हें त्यांच्या सर्व भावी आयुष्यांत त्यांनीं सतत व सुसंगत अंगिकारिलें होतें. त्या एका सूत्रांतच त्यांनीं यापुढें केलेल्या सर्व सार्वजनिक, विशेषतः राजकीय, कृत्यांची व चळवळींची मांडणी झालेली होती. आणि याच दृष्टीनें यापुढें दिलेल्या त्यांच्या चरित्राकडे वाचकांनीं पाहिल्यास प्रत्येक वेळीं त्याचा वेगळा खुलासा करीत बसण्याचें कारण राहणार नाहीं.

सन १९०० सालीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांची कारकीर्द समाप्त झाली. त्या कारकीर्दींत जशीं संकटें या इलाख्यावर कोसळलीं ( दुष्काळ व प्लेग, दडपशाही इत्यादि ) तशीं पूर्वी कोणत्याहि गव्हर्नरच्या वांट्यास आलीं नव्हतीं. असें असतां त्यांच्या स्मारकाची चळवळ ठराविक लोकांनीं केलीच ! त्याविरुद्ध टिळकांनीं केसरींतून व सभांतून विरोध केला. टिळकांचा विरोध स्वतः त्यांच्यावर झालेल्या राजद्रोहाच्या खटल्यामुळें नव्हता. मुंबईच्या नेमस्त पक्षांतीलहि कित्येक पुढारी या स्मारकाला विरोध करीतच होते. या सुमारास साताऱ्यास प्रांतिक परिषद भरली. तींत एका बाजूला मुंबईकर व पुणेंकर नेमस्त पुढारी व दुसऱ्या बाजूस महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाचे पुढारी हे

उपस्थित होऊन त्यांच्यांत बरीच कटकट झाली. अनेक ठरावांवर दुमत झालें. विषयनियामक कमिटी व जाहीर परिषद यांच्या अधिकारांचा प्रश्न निघाला. लॉर्ड सँढर्स्ट यांच्या निषेधाच्या ठरावावर प्रचंड बहुमत व्यक्त होण्याइतक्या सभासदांच्या सह्या झाल्या. पण अखेर अध्यक्ष व टिळक यांनीं मिटतें घेतल्यानें परिषद कशीबशी पार पडली. राष्ट्रीय पक्षानें महाराष्ट्रांतील अधिकृत पुढारीपण अद्यापि नेमस्त पक्षाकडेच असल्याची कबुली दिली. पण त्याबरोबर नव्या वाढत्या लोकमत ची बोधप्रद चुणूकही दाखविली. या विरोधाचा क्रम पुढें सतत चालूच राहिला.

दिल्ली-दरबारावर टिळकांनीं केसरींत अत्यंत मार्मिक लेख लिहिले. भाषा सौम्य वापरली पण खरा मुद्दा सोडला नाहीं. १९०१ ते १९०३ मध्यें अनेक सभा व परिषदा भरल्या. त्यांतील मुख्य म्हणजे मुंबई, सोलापूर, धारवाड येथील प्रांतिक परिषदा, आणि कलकत्ता, अहमदाबाद व मद्रास येथील राष्ट्रीय सभा या होत. कलकत्त्यास एज्युकेशन कमिशनच्या ठरावावर टिळकांनीं भाषण करून त्यांत हिंदी गृहस्थ असावे असें सुचविलें. अहमदाबाद येथील राष्ट्रीय सभेला प्रतिनिधीची दहा रुपयांची फी वीस रुपये करण्यांत आली. राष्ट्रीय सभेला जोडून औद्योगिक प्रदर्शन प्रथम भरविण्यांत आलें. कॉंग्रेसमध्यें तिचें काम वर्षभर अखंड चालण्याची कल्पना प्रथम निघाली याहून अधिक काहीं झालें नाहीं. मद्रास येथील कॉंग्रेसला टिळक स्वतः हजर नव्हते. ती सभा अशाकरतां महत्वाची ठरली कीं, कर्झनशाहीचा निषेध तींत झाला आणि वंगभंगाची बातमी प्रथमच त्या सभेंत लोकांच्या कानीं आली. म्हणजे पर्यायानें वंगभंग, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण वगैरे या मोठ्या चळवळींचा उगम या सभेंत झाला. येथून पुढें राष्ट्रीय सभांना खरें महत्त्व येऊं लागलें. कारण तींत नेमस्त व राष्ट्रीय पक्षाचे झगडे वर्चस्वाकरितां सुरू झाले. सन १९०४ ची राष्ट्रीय सभा मुंबईस भरली. तींत कॉटनसाहेबांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभेचें काम अखंड चालविण्याच्या डिग्बी यांच्या योजनेची चर्चा झाली. राष्ट्रीय सभेला घटना नको म्हणणारे फेरोझशहा आणि असावी म्हणणारे लाला लजपतराय यांच्यामध्यें खडाजंगी उडाली. टिळकांनीं लालाजींच्या मताला पाठिंबा दिला व पार्लमेंटपर्यंत

चळवळ नेऊन भिडविण्याची सूचना केली. त्यांचें म्हणणें ‘ सनदशीर चळवळ हवी तर तीच कां होईना, पण ती तरी करून करा. ’ या सुमारास परराष्ट्रीय हिंदी राजकारणाचा उदय झाला. हॉलंडमध्यें सोशॅलिस्ट कॉंग्रेस भरली तींत दादाभाई नवरोजी हजर राहून त्यांनीं कडक भाषण केलें. इतकें कीं, इंग्रजांना नांवें ठेवतांना दादाभाईनीं कोणताहि शब्द शिल्लक ठेवला नाहीं. त्यामुळें त्यांचे स्तुतिपाठक इंग्रज व त्यांचे नेमस्त अनुयायी हेहि त्यांना नांवें ठेवूं लागले. १९०५ सालीं तर वंगभंगाची चळवळ सर्रास सुरू झाली. नामदार गोखले हे विलायतेस गेले. वरिष्ठ कायदे कौन्सिलांत त्यांचा आधींच प्रवेश होऊन त्यांच्या कामाची वाखाणणी झाली होती. लजपतराय हेहि विलायतेस गेले. बंगाल्यानें घातलेल्या परदेशी मालावरील बहिष्काराचें समर्थन दोघांनीहि केलें. गोखल्यांनीं होमरूल लीगची मागणी सभांतून मांडली व तिकडील लोकांना सांगितलें कीं, “ तुम्हीं सैन्यच पाठवाल तर इलाज नाहीं. पण देशांतल्या देशांत आम्ही सरकारला पाहून घेऊं. त्यांना छळून स्वराज्य मिळवूं. ” या उद्‌गारांबद्दल टिळकांनीं गोखल्यांना केसरींतून धन्यवाद दिले. त्या सालच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान गोखले यांना देण्यांत आलें. तींतील मुख्य काम वंगभंगाचा परामर्ष घेऊन सरसकट बंगाल्यांतील चळवळीला पाठिंबा देण्याचें झालें. सभेंत टिळकांनीं लजपतरायांच्या जोडीनें पुढारीपण घेतलें होतें. क्रांतिकारक चळवळीचा बंगाल्यांतील जन्म या सुमारास झाला होता. १९०५।०६ या दोन सालांत वंगभंग, स्वदेशी व बहिष्कार ही तिहेरी चळवळ खूप जोरांत झाली. १९०६ सालच्या कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेंत दादाभाई नवरोजी यांनीं अध्यक्षस्थानावरून स्वराज्याच्या मागणीची मुहूर्तमेढ रोविली. ‘ म्हातारपणीं उतूं जाऊं लागले ’ असें म्हणून दादाभाई नवरोजींना संभाळून घेण्याकरितां फेरोझशहा मेथाप्रमृतींनीं पुष्कळच खटपट केली, व टिळक हे नेमस्त पक्षावर अन्यायानें टीका करतात वगैरे बऱ्याच तक्रारी केल्या. पण खुद्द दादाभाई यांनींच आपल्या भाषणांत स्वराज्याची मागणी केली. आणि ‘ मी तरुण असतों तर बंड करून उठलों असतों ’ असें विधान केलें. यामुळें तर राष्ट्रीय पक्षाची तीव्र भावना हीच यापुढें खरी उपयोगी पडणारी असें

ठरून, टिळक, लजपतराय व अरविंद घोष वगैरे राष्ट्रीय पक्षाच्या पुढाऱ्यांच्या चळवळीला एकंदर लोकमताकडून मान्यता मिळाली. आणि यापुढें नेमस्त पक्षाला आपलें स्थान, आपली इभ्रत, आपली तत्त्वें आणि सनदशीर चळवळ हीं संभाळण्याकरितां बचावाचें धोरण स्वीकारून हळूहळू पाय मागें घ्यावा लागला. हा विरोध पुढील सालीं फारच भडकला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतुःसुत्रीवर टिळकांचीं व्याख्यानें व लेख सुरू होऊन, त्यांची उज्ज्वल प्रतिभा, लेखनचातुर्य, ओजस्वी वक्तृत्व व निर्भयता हीं जगजाहीर झालीं. लाला लजपतराय यांना तर सरकारनें हद्दपारच केलें.

लॉर्ड मोर्ले यांनीं उदार-मतवादित्वाचें ओझरतें दर्शन हिंदुस्थानला दिलें, परंतु त्याचा पोकळपणाहि सहज दिसून आला. मोर्ले यांचे पुरस्कर्ते गोखले म्हणून टिळकांनीं त्यांचेवर भडिमार केला. १९०७ सालीं सुरतेस नेमस्त व राष्ट्रीय पक्षांतील भारतीय युद्ध झालें, व तुंबळ रण होऊन राष्ट्रीय सभा मोडली. नेमस्तांनीं कन्व्हेन्शन बनवून राष्ट्रीय सभा आपल्या पंखाखालीं कशी राहील याविषयीं योजना केली. उलट या सभेंत आपण शिरावें व जागा धरून रहावें असे टिळकांचे प्रयत्न, पण त्याचेबरोबर कन्व्हेन्शनची निंदा सुरू झाली. सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत टिळकांनीं इतकें तीव्र धोरण स्वीकारलें कीं, हद्दपारींतून सुटून आलेले लाला लजपतराय यांनाहि नेमस्त पक्षांतील गोखलेप्रभृतींचा त्याग करून सर्वस्वीं टिळकांना जाऊन मिळतां आलें नाहीं; पण लिबरल पक्षाच्या सुरक्षित घरकुलांत मरणाऱ्या राष्ट्रीय सभेविषयीं यापुढें ते उदासीन राहिले. नेमस्त पक्षानें आपला, आणि टिळकांच्या नव्या पक्षानें आपला जाहीरनामा काढला. नव्या पक्षाच्या जाहिरनाम्यांत कलकत्ता येथील चतुःसूत्रीचाच पुनरुच्चार व पाठपुरावा केला होता. त्यापलीकडे जाऊन पुढें विशेष असें पाऊल टाकलेलें नव्हतें. किंबहुना त्यांची तक्रार अशीच होती कीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेमार्गें जाऊन, व त्या ठरावांना भिऊन, नेमस्त पक्ष पीछेहाट करीत आहे ती त्यानें करूं नये; म्हणजे राष्ट्रीय सभेंत सर्व पक्ष एक होतील व भांडण मिटेल. पण यापुढें आठ वर्षेपर्यंत टिळकांना राष्ट्रीय सभेचें दर्शन घडलें नाहीं. ती

सभा एकट्या नेमस्तांच्याच हातीं राहिली. मात्र दिवसेंदिवस ती इतकी हतप्रभ झाली कीं आपल्या रोडकेपणाची लाज तिची तिलाच वाटूं लागली. इकडे १९०८ च्या उन्हाळ्यांत धुळें येथें प्रांतिक परिषद भरली. तींत जहाल राष्ट्रीय मताचाच विजय होऊन नेमस्त पक्ष नामशेष झाला. टिळक सन १९०८च्या राष्ट्रीय सभेस हजर असते तर काय झालें असतें हें सांगवत नाहीं. पण त्यापूर्वी बंगाल्यांतील अत्याचारांना जोर चढला. बॉंब-गोळ्यांची विद्या चोहोंकडे पसरली. टिळकांसारख्यांना मोकळें सोडून त्यांची व बंगाली पुढाऱ्यांची एकजूट टिकूं देणें अनिष्ट असें सरकारनें ठरविलें. दडप-शाहीला सर्रास प्रारंभ केला. आणि टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला.

[ ४ ]

## राजद्रोहाचा दुसरा खटला

हा खटला केसरींतील मूळ कांहीं एका लेखाकरितां होता. पण तो लेख गुन्ह्याच्या शाबितीला अपुरा वाटल्यावरून आणखी कांहीं लेखांबद्दल सर-कारनें दुसरी एक फिर्याद केली. या खेपेस टिळकांना जामिनावर सोडण्यांत आलें नाहीं. १८९७ च्या खटल्यापेक्षां या खटल्याचें स्वरूप अधिक भीति-प्रद ठरलें म्हणून बचावाकरितां जाहीर वर्गणी केली नाहीं. टिळकांनीं आपला खटला स्वतःच चालविला. एक आठवडाभर खटल्याचें काम व टिळकांचें भाषण चालल्यावर, न्या. मू. दावर यांनीं ज्यूरीला खटला समजावून देतांना टिळकाना प्रतिकूल असें मत व्यक्त केलें. ज्यूरींत सात विरुद्ध दोन असा मतभेद होऊन टिळकांना दोषी ठरविण्यांत आलें, व न्यायाधिशानीं त्यांना सहा वर्षें काळें पाणी व एक हजार रुपये दंड, अशी शिक्षा फर्माविली. पण टिळकांनीं उलट न्यायाधिशाला असें बजाविलें कीं, " मी मुळींच गुन्हेगार नाहीं. लौकिक गोष्टींचें नियंत्रण करणारी दैवी शक्ती या न्यायपीठाहून वरिष्ठ आहे. कदाचित् तिचीच इच्छा अशी असेल कीं, मला शिक्षा व्हावी, आणि त्या शिक्षेच्या योगानेंच मी अंगिकारिलेल्या देशकार्याला ऊर्जित दशा यावी. " या निकालाच्या दुसरे दिवशीं मुंबईत दंगे झाले. गिरण्या बंद कराव्या लागल्या. सरकारला गोळीबार करावा लागला. कांहीं थोडे दिवस अहमदा-बादच्या तुरुंगांत काढल्यावर मंडाले येथील तुरुंगांत टिळकांची रवानगी

झाली तेथें त्यांना लिहिण्यावाचण्याची मोकळीक होती. तिचा फायदा घेऊन, त्यांनीं तत्त्वज्ञानावरील संस्कृत, इंग्रजी शेंकडों ग्रंथ वाचले व ' गीतारहस्य ' हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला.

ता. १७ जून १९१४ रोजीं सरकारानें टिळकांना पुण्यास घरीं आणून सोडलें. लोकांच्या आनंदाला सीमा उरली नाहीं. टिळकांनीं तूर्त कांहीं करावयाचें नाहीं असें ठरविलें होतें, तरी त्यांच्या संबंधानें लोकांची वृत्ति पाहून सरकाराला भीति वाटूं लागली. आणि ता. २५ जून रोजीं सरकारनें वटहुकूम काढून कोणीहि त्यांची भेट घेणें हा गुन्हा ठराविला. त्यांच्या घरासमोर अष्टौप्रहर पोलिसांचे खडे पहारे बसले. तसेंच पुढें येणाऱ्या उत्सवांत टिळकांच्या नांवाचा जयघोष कोणीं करूं नये, त्यांच्या तसबिरीलाच काय पण त्यांच्या मुलांनाहि कोणीं हार वगैरे घालून सत्कार करूं नये, असेहि हुकूम निघाले. या गोष्टींची तक्रार टिळकांनीं पार्लमेंटपर्यंत पोंचविली. हें प्रकरण सुरू असतांच ता. ४ आगस्ट रोजीं महायुद्ध सुरू झालें. तो अपूर्व प्रसंग लक्षांत घेऊन, त्याचा फायदा घेण्याकरितां, सरकारानें टिळकांवरील नजरबंदी उठवून लोकप्रियतेचा डाव टाकला ! उलट टिळकांनींहि एक जाहीरनामा काढून युद्धकालीं सामोपचाराचें धोरण जाहीर केलें ! तथापि खासगी राजकारणांतल्या प्रतिपक्षांनीं टिळकांवरील बंदी अजून उठविली नव्हती. त्या सालीं मद्रास येथें राष्ट्रीय सभा भरली. तिला टिळकांना हजर राहूं देऊं नये अशी कारस्थानें नेमस्त पक्षानें केलीं. टिळक हे बहिष्कारवादी आहेत असा डांगोरा पिटण्यांत आला. " मी परदेशी कापडापुरता बहिष्कारवादी असलों तरी सरकारी राज्यकारभारावर व त्यांत भाग घेण्यावर मीं बहिष्कार घातलेला नाहीं " असें टिळकांनीं प्रतिपादिलें. कॉंग्रेस सभासदत्वाच्या अटी ढिल्या झाल्या तरच टिळक राष्ट्रीय सभेला आणार होते. पण ती गोष्ट पुढें दोन वर्षेपर्यंत झाली नाहीं.

१९१५ सालीं गोपाळराव गोखले मृत्यु पावले. नेमस्तपक्षाला नमतें घेण्याला लावावयाचें तर प्रथम वेगळी स्वतंत्र चळवळ सुरू करून त्यांना लाज आणावी, भीति वाटवावी, प्रतिकूल लोकमत प्रगट करून दाखवावें या उद्देशानें टिळकांनीं राष्ट्रीयपक्षाची प्रांतिक परिषद पुण्यास भरविली.

तिचे स्वागतमंडळाचे सभासद चारशें झाले. १६० प्रतिनिधि आले. फी भरून एक हजार प्रेक्षकांनीं सभा पाहिली. यावरून नेमस्तांच्या हातीं असलेल्या कॉंग्रेसपेक्षां टिळकांची प्रांतिक परिषदच मोठी ठरली ! या परिषदेंतच, 'होमरूल लीग' नांवाची संस्था काढण्याची कल्पना, अध्यक्ष बॅ. बाप्टिस्टा यांनीं प्रगट केली. इकडे मिसेस ॲनी बेझंट या राजकारणांत जोरानें भाग घेऊं लागल्या, व त्यांनींहि आपली एक वेगळी लीग काढली. १९१५ सालीं मुंबईस कॉंग्रेस भरली त्यावेळीं, कॅंग्रेसमध्यें राष्ट्रीय पक्षाला प्रवेश करतां येईल अशा रीतीनें, सभासदत्वाच्या अटी ढिल्या करण्याचा प्रयत्न झाला. शेवटीं पुढील वर्षीं लखनौ येथें नेमस्तपक्ष, राष्ट्रीयपक्ष, व मुसलमानसंघ अशीं तीनहि दळें एका निशाणाखालीं जमलीं. आणि तींत होमरूल किंवा स्वराज्य याची मागणी करण्यांत आली. या योजनेंत मुसलमानहि सामील झाले. कारण त्यांना हव्या असणाऱ्या कांहीं गोष्टी कबूल करून, टिळकांच्या पुढारीपणानें, हिंदु-मुसलमानांचा समेट घडून आला होता. लखनौ कॉंग्रेसच्या पूर्वीं बेळगांव येथें राष्ट्रीय पक्षाची परिषद भरली होती. तींत, कित्येक प्रमुख अनुयायांचा विरोध असतांहि, कॉंग्रेसमध्यें शिरून ती काबीज करण्याचें धोरण टिळकांनीं मंजूर करून घेतलें होतें. परंतु आपली स्वतंत्र चळवळ राहावी म्हणून होमरूल लीगची स्थापना करून घेतली. लगेच सरकारनें होमरूलच्या चळवळीविरुद्ध दडपशाही सुरू केली. बेझंट बाईंना नजरकैदेंत ठेवण्यांत आलें व टिळकांवरही जामीन मागण्याचा खटला भरण्यांत आला. या खटल्याचें वॉरंट ज्या दिवशीं टिळकांवर बजाविण्यांत आलें, तो दिवस टिळकांच्या एकसष्टाव्या वाढदिवसाचा होता ! त्या दिवशीं सर्वत्र मोठमोठे समारंभ होऊन पुण्याच्या समारंभांत टिळकांना लोकांनीं एक लाख रुपयांची थैली अर्पण केली. हा खटला पुणें येथील डि. मॅजिस्ट्रेटपुढें चालून त्यांनीं टिळकांना दोषी ठरवून त्यांजकडून जामीन घेण्यांत आला. पण लगेच हायकोर्टाकडे अपील झालें. त्यांत टिळक दोषारोपांतून मुक्त झाले. बेझंटबाईहि बंधमुक्त झाल्या. फिरून दोघांच्या सहकारितेनें होमरूल लीगची चळवळ सुरू झाली. टिळकांचे दौरे निघण्यास सुरवात झाली. या सुमारास म० गांधी यांनीं सत्याग्रहाच्या नव्या चळवळीचें शिंग फुंकलें.

त्याचा पहिला प्रयोग त्यांनीं बहार प्रांतांतील चंपारण्यांत केला व तेथील मजुरांच्या स्थितीची चौकशी करण्यास सरकारास भाग पाडलें. महायुद्धांत प्रत्येक राष्ट्राला स्वयंनिर्णय असावा अशी घोषणा करण्यांत इंग्लंडनें पुढाकार घेतला होता, व हिंदुस्थानांतीलहि लोक स्वयंनिर्णय मागूं लागले तेव्हां भारतमंत्री मि. मॉंटग्यु यांनीं ता. २० ऑगस्ट १९१७ रोजीं एक जाहीरनामा काढला, व स्वतःच हिंदुस्थानांत येऊन, व्हॉइसरॉयाबरोबर ठिक-ठिकाणीं जाऊन लोकांचीं शिष्टमंडळें बोलावून त्यांच्या कैफियती दाखल करून घेतल्या. याच वेळीं ब्राह्मणेतर पक्ष संघटित होऊन मद्रास व मुंबई येथें त्याचीं मोठीं केंद्रें बनलीं.

## विलायतची सफर

टिळकांना विलायतला जाण्याचें एक कारण यापूर्वीच उपस्थित झालें होतें. तें असें कीं, सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनीं टिळक तुरुंगांत असतां त्यांची बदनामी लंडन टाइम्स पत्रांतून केली होती. त्याबद्दल टिळकांनीं विलायतेंत दिवाणी दावा लावला होता. त्याची हिंदुस्थानांतील पूर्वतयारी होऊन, विलायतेंतील काम चालविण्याकरितां टिळकांना जावयाचें होतें. अर्थात् या खेपेंत परराष्ट्रीय चळवळहि करतां येणारी होती. हें दुहेरी निमित्त घेऊन, टिळकांनीं विलायतेस जाण्याचें ठरविलें. त्यापूर्वी टिळकांनीं एक मोठा दौरा काढला. त्यांत त्यांना थैलीच्या रूपानें हजारों रुपये विला-यतेंतील चळवळीला मदत म्हणून देण्यांत आले. बॅ. बाप्टिस्टा यांना टिळकांनीं यापूर्वीच विलायतेस पाठविलें होतें. आणि आतां ते स्वतः जाणार, तों युद्धाचें निमित्त करून सरकारनें त्यांचें पासपोर्ट रद्द करुन, कोलंबोहून त्यांना परत पाठविलें. इकडे मुंबई, कलकत्ता वगैरे ठिकाणीं राष्ट्रीय सभा भरल्या, त्यांत राष्ट्रीय पक्षाचाच जोर होऊन स्वराज्याची मागणी दृढ झाली. पुढें १९१९ च्या जानेवारींत चिरोल खटला सुनावणीस निघाला, त्याआधीं कांहीं दिवस टिळकांना पासपोर्ट मिळून टिळक विलायतेस गेले. या सुनाव-णींत टिळकांची साक्ष झाली. अखेर ज्यूरीनें टिळकांविरुद्ध निकाल दिला. या निकालानें टिळकांवर खर्चाचा बोजा बेसुमार म्हणजे सुमारें तीन लक्षांचा पडला. परंतु ताबडतोब त्यांच्या मित्रमंडळींनीं हे तीन लक्ष रुपयेहि वर्गणीनें

जमवून १९२० च्या मे महिन्यांत मोठ्या समारंभानें त्यांना अर्पण करून, त्यांच्यावरील हा खर्चाचा बोजा दूर केला. विलायतेंत टिळकांचा चौदा महिने मुक्काम पडला. या अवधींत त्यांनीं परराष्ट्रीय स्वरूपाचें राजकारण पुष्कळच केलें. नंतर भरलेल्या तह परिषदेचे अध्यक्ष क्लेमँको यांजकडे हिंदुस्थानचा अर्ज दाखल केला. अनेक चौक्या पहाऱ्यांतून हिंदुस्थानची कैफियत प्रेसिडेंट वुइल्सन यांजपर्यंत भिडविली. जॉइंट सिलेक्ट कमेटीपुढें होमरूललीगतर्फे साक्ष दिली. विलायतेंतील उदयोन्मुख मजूरपक्षाशीं ऋणानुबंध प्रस्थापित केला व युद्धसमाप्ति झाल्यावर १९१९च्या अखेर टिळक विलायतेहून परत आले. नंतर लौकरच अमृतसर येथील राष्ट्रीय सभा भरली. तींत "मॉटेग्यूप्रणीत पार्लमेंटरी कायद्यानें दिलेल्या सुधारणा अपुऱ्या व निराशाजनक आहेत, तथापि त्या आहेत तशाहि राबवून घ्याव्या" असा ठराव झाला. विलायतेस शिष्टमंडळाचें काम चालू असतां, इकडे रौलॅट ॲक्टाविरुद्ध फार मोठी चळवळ झाली, कत्तली झाल्या, लष्करी कायदे पुकारले गेले, स्वतंत्र चौकशीचे प्रयत्न निष्फळ झाले. तथापि म० गांधी, नेहरू व नेमस्तपक्ष यांनीं सरकारशीं सुधारणांच्या बाबतींत सहकारिता करावी हेंच धोरण योग्य आहे असें ठरवून, सुधारणा निराशाजनक व अपुऱ्या असें विशेषण लावण्यासहि हरकत घेतली!

अमृतसरहून परत आल्यावर टिळक निरनिराळ्या परिषदांना हजर राहिले. तेव्हां त्यांना अनेक मानपत्रें देण्यांत आलीं. १९२०च्या एप्रिलअखेर टिळकांनीं सिंध प्रांतांत दौरा काढला. तो संपवून ते परत आले त्या वेळीं सोलापूर येथें प्रांतिक परिषद भरली होती. तेथें बेझंटबाई व नेमस्त पक्ष यांनीं मिळून टिळकांच्या स्वराज्याच्या मागणीला विरोध केला. पण बहुमत टिळकांच्या बाजूलाच पडलें. परिषदेंत दगडफेक, मारामारी होण्यापर्यंत वेळ आली होती. टिळक विलायतेहून आल्यापासून त्यांना विरोध करण्याचें धोरण, नव्या निवडणुकीवर दृष्टी ठेवून, नेमस्त व ब्राह्मणेतर पक्ष यांनीं मिळून ठरविलें होतें. त्याची कड सोलापुरास पोंचली. तथापि घोडामैदान जवळ असल्यामुळें टिळकांनीं काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना करून तिचीं तत्त्वें प्रगट करणारा एक जाहिरनामा काढला, व राष्ट्रीय पक्षातर्फे निवडणुकी लढविण्याची

तयारी झाली. १९२० च्या मे महिन्यांत टिळकांचा दौरा बनारस, जबलपूर वगैरे शहरीं झाला. पुण्यांतील जून महिन्यातील मुक्कामांत टिळकांनीं जगन्नाथ महाराजांसंबंधानें एका अखेरच्या प्रकरणांतील मुकदम्याची तयारी केली. जुलै महिन्यांत हा मुकदमा हायकोर्टात सुनावणीस निघाला तेव्हां समक्ष हजर राहून सॉलिसिटर, बॅरिस्टर यांना टिळकांनीं मदत केली. त्यांतील सुनावणी ता. २१ जुलै रोजीं संपून, टिळकांना फार मोठें यश मिळून, श्री. जगन्नाथ महाराज हे आपल्या दत्तक घराण्यांतील इस्टेटीवर चिरस्थायी झाले. त्याच्या आदल्याच दिवशीं टिळकांना ताप येऊं लागला, तो कांहीं केल्या हटला नाहीं. आणि त्यांतच ता. ३१ जुलैच्या उत्तररात्रीं व १ ऑगस्टच्या पहांटे मुंबईस सरदारगृहांत टिळकांचें देहावसान झालें. स्मशानयात्रा अलौकिक झाली. ती सोनापुरांत समाप्त न होतां समुद्रावरील वाळवंटांत प्रचंड गर्दीमुळें समाप्त करावी लागली. तेथें त्यांच्या दहनस्थळीं हल्लीं एक भव्य पुतळा उभारण्यांत आला आहे. ता. २ ऑगस्ट रोजीं टिळकांच्या अस्थि मुंबईहून स्पेशल ट्रेननें पुण्यास आणविल्या व मोठ्या समारंभानें त्यांचा प्रवेश पुण्यांत झाला.

टिळकांनीं मुंबईस देह ठेवला. त्यांच्या अस्थि प्रयाग येथें संगमांत गंगार्पण झाल्या. पण त्यांची स्मृति अद्याप जगभर कायम असून, हिंदुस्थानांतल्या अनेक ठिकाणीं लोकांनीं यांचीं स्मारकें त्यांच्या प्रेमानें कायमचीं उभारून ठेवलीं आहेत.

[ ५ ]

## हिंदवी असंतोषाचे जनक

हिंदुस्थानांतील सर्व आबालवृद्धांना टिळकांचें नांव जें केवळ परिचित नव्हे तर प्रियहि झालें होतें त्याचें कारण त्यांच्या आंगचे अनेक गुण होत. हे गुण म्हटले म्हणजे मुख्यतः देशभक्ति, धैर्य, करारीपणा, स्वार्थत्याग हे होत. या गुणांपुढें त्यांचें लेखनचातुर्य, वक्तृत्व हीं केव्हांहि फिकींच पडतात. राष्ट्रीय दृष्टि व मर्मज्ञान हीं सोडलीं तर टिळकांच्या लेखांत चित्ताकर्षक असें

फारसें उरत नाहीं असें म्हणणारे अनेक टीकाकार आम्हीं पाहिले आहेत. तसेंच त्यांचें वक्तृत्व प्रसंगोपात्त त्यांतील आवेशामुळें व मनाच्या निर्भयतेमुळें फारच परिणामकारक होत असलें तरी खऱ्या वक्तृत्वकलेचे ढंग किंवा नटवे-पणा त्यामध्यें नव्हता म्हणून प्रसिद्ध वक्त्यांच्या मालिकेंतून त्यांचें नांव वगळ-णारे त्यांचेच कांहीं स्नेहीं आम्हाला आढळले आहेत. पण त्यांच्या उपरि-निर्दिष्ट गुणचतुष्टयासंबंधानें त्यांच्या मित्रांतच काय पण शत्रूंतहि मत-भेद नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे. सरकारी अधिकारी, सरकारी नात्यानें अर्थातच त्यांची कोणत्याहि गुणाकरितां स्तुति करूं शकत नाहींत हें ठीकच आहे. पण खासगी रीतीनें बोलण्याचा प्रसंग आला असतां वरील किंवा इतर अनेक गुणांसंबंधानें अधिकाऱ्यांनीं आदरच दर्शविलेला आहे, असें अनेक प्रत्यक्ष माहितगार माणसांच्या तोंडून आम्हीं ऐकलें आहे. इतकेंच नव्हे तर ही गोष्ट स्वानुभवानें आम्हांसहि माहित आहे. मुंबईच्या 'टाइम्स' पत्रानें टिळकांच्या मृत्यूसंबंधानें एक स्फुट लेख लिहिला आहे. त्यांत अर्थात् टिळकांच्या राजकीय चारित्र्याबद्दल वाटेल तीं अद्वातद्वा व प्रस्तुत प्रसंगाला अत्यंत अनुचित अशीं विधानें केलीं आहेत. पण खुद्द टाइम्सला तो कट्टा शत्रु होऊनहि टिळकांचे कांहीं गुण नाकबूल करतां आले नाहींत. त्याबद्दल कबुलीच द्यावी लागली आहे. टाइम्स म्हणतो, 'टिळ-कांची बुद्धिशक्ति वाखाणण्यासारखी होती. त्यांच्या संशोधक ग्रंथांची मोठ-मोठ्या प्रसिद्ध विद्वान् पंडितांनीं मान्यतादर्शक स्तुतिच केली आहे. जें चळ-वळीचें काम त्यांनीं जन्मभर केलें त्यांत त्यांचें धैर्य, धाडस व अखंड उत्साह दिसून आला. त्यांचीं भाषणें व लेख ऐकणारांना व वाचणारांनाहि त्यांच्या पुनः पुनः आवृत्त्या किंवा रूपांतर झालीं तरी त्यांच्या मनांवर त्यांचा परि-णाम किती होतो याचें कोणालाहि आश्चर्य वाटतें. त्यांची भाषापद्धति अननुकरणीय आहे." अशा कर्तृत्ववान, धैर्यशील व उद्योगी पुरुषाच्या हातून (टाईम्सकाराच्या मताप्रमाणें) अनेक अनिष्ट गोष्टी घडाव्या या-बद्दल त्यानें खेद प्रदर्शित केला आहे. तसें तो म्हणणारच, व त्यास उत्तर देणेंहि फारसें कठीण नाहीं. प्रस्तुत आपणाला ग्राह्य मुद्दा हाच, कीं टिळ-कांच्या वैऱ्यांना देखील त्यांच्या कांहीं बिनमोल गुणांची स्तुति केल्याशिवाय

आपल्या निंदेला यावा तितका उठाव येत नाहीं असें वाटतें, यावरूनच त्यांचे गुण किती खरें व सर्वसंमत होते हें दिसून येईल.

अशा गुणांचा उपयोग कशा प्रकारें व्हावा हा मुद्दा अर्थात् वादग्रस्तच असणार. किंबहुना टिळक व त्यांचे प्रतिपक्षी यांच्या दरम्यान जें आजन्म युद्ध चालू होतें त्याचें कारण हा मतभेदच होय. सरकारला वाटे, कीं असला बुद्धिमान्, धाडसी व कर्तृत्वावन् पुरुष आपल्याला लाभता तर काय बहार झाली असती. किंबहुना सरकार व टिळक यांच्यामधील मतैक्याचा क्षणिक व किंचिन्मात्र स्पर्श ज्या एखाद्या विषयाला चुकून कधीं काळीं झाला त्यांत सरकारनें या मतैक्याला किंमत देऊन त्याचा प्रत्यक्ष उपयोग करून घेण्या-चीच इच्छा दर्शविली. समाजसुधारकांना समाजसुधारणा हा विषय प्रिय असल्यामुळें त्यांनाहि सहजच वाटे, कीं अशा धीट व कर्तबगार मनुष्यानें सुधारणांचा प्रश्न हातीं घेतला असता तर त्यानें त्याची अपूर्व प्रगति केली असती. सरकाराप्रमाणें समाजसुधारकहि प्रसंगविशेषीं टिळकांविषयीं आदर प्रदर्शित करीत व त्यांच्याकडून चुकून लाभणाऱ्या सहनुभूतिलेशाचा शक्य तो उपयोग करून घेत. फार काय, स्वतः टिळकांना असें अनेक वेळां म्हण-तांना आम्हीं ऐकलें आहे, कीं "सुधारणा कां होईना, पण तिचाहि फैलाव करण्याचा उद्योग यशस्वी होण्यास जो उत्साह व चिकाटी लागते ती सुधा-रक दाखवीत नाहींत; हे गुण अंगीं असणाऱ्या लोकांच्या संख्येच्या मानानें सुधारणेचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे असें त्यांनीं मानलें पाहिजे. मी स्वतः सामाजिक सुधारणेच्या उद्योगांत पडलों असतों तर त्यांतहि मी काम करून दाखविलें असतें. सर्व सुधारकांचें मिळून एखाददुसरें वर्तमानपत्र, पण त्यालाहि यशस्वी करण्यास जो संघटित उद्योग व उत्साह लागतो तो त्यांच्यांत दिसून येत नाहीं. यामुळेंच केवळ सुधारणामतवादी वर्तमानपत्रें मागें पड-तात" इत्यादि. पण टिळकांनीं सरकारी नोकरी न करण्याचें जें कारण तेंच त्यांनीं समाजसुधारणा हातीं न घेण्याचें कारण. या मतभेदामुळें त्यांचें चरित्र सरकारला व समाजसुधारकांना अनेक प्रसंगीं व अनेक बाजूंनीं अत्यंत अप्रिय झालें; व कित्येक प्रामाणिक मताच्या व सच्चारित्र्याच्या सुधारकांना टिळकांशीं निकट स्नेहसंबंध ठेवतां आला नाहीं ही गोष्ट अगदीं खरी. तथापि

टिळकांवर एकांगी उद्योगाचा आरोप करणाऱ्या लोकांनाहि, टिळक हे टिळकांनीं ग्राह्य मानलेल्या देशभक्तीच्या साध्याकरितांच आपलें आयुष्य खर्चीत होते हें नाकबूल करतां आलें नाहीं. उदाहरणार्थ, सर नारायणराव चंदावरकर यांचीं व टिळकांचीं मतें जुळण्याचा योग साऱ्या जन्मांत क्वचितच आला असेल, तथापि अलीकडे त्यांच्याहि तोंडून टिळकांविषयीं 'ग्रेट' म्हणजे 'महानुभाव' असें व्यक्तिवर्णन निघे. त्याचें कारण हेंच, कीं टिळकांच्या अंगीं दोष असले तरी ते मोठ्या माणसाचे दोष आहेत व त्यांचा हा मोठेपणा त्यांच्या देशभक्तीवर व स्वार्थत्यागावर आधिष्ठित झालेला आहे!

लोकोत्तर देशभक्तीला लोकमत 'शंभर खून माफ' करीत असतें. खून याचा अर्थ ढोबळ चुका. टिळकांवर प्रेम करणाऱ्या लोकांना ते निर्दोष दिसतात व त्यांच्या हातून आजवर एकहि चूक झाली नाहीं असें प्रामाणिकपणानें वाटतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. उलट टिळकांच्या प्रतिपक्षांना ते दोषपूर्ण दिसतात. पण लोकमताचीं डोळे फिरविणारीं हीं उच्च दोनहि टोकें सोडून देऊन स्थिर बुद्धीच्या भूमीवर उभा राहून कोणी विचार करू लागला तर त्याला टिळकांच्या अंगचे गुण त्यांजवर आरोपित झालेल्या दोषापेक्षां किती तरी पटीनें अधिक भरतात असें दिसून येईल; इतकेंच नव्हे, तर या लोकोत्तर, गुणसंपन्न, बुद्धिमान्, देशभक्त मनुष्याच्या अंगी सद्यःस्थितींत देशाला सर्वांत अत्यंत उपयोगी पडणारा आणि खरोखरच दुर्मिळ असा एक गुण होता असेंहि त्याला कबूल करावें लागेल. हा गुण म्हणजे सरकाराशीं वागतांना टिळकांनीं दाखविलेला पराकाष्ठेचा निर्भीडपणा. सरकाराविषयीं प्रजाजनांच्या मनांत अनेक वर्षांच्या संवयीमुळें भिनलेली फाजील नम्रता व फाजील आदबशीरपणा नांगरून टाकून, टिळकांनीं राष्ट्रीय स्वाभिमानाच्या वाढत्या वृक्षांच्या मुळ्यांना मनोभूमि हवी तशी उलथीपालथी करून दिली ही त्यांची कामगिरी बिनमोल व बिनतोड आहे. टिळक लेखांत व व्याख्यानांत सरकारचा अधिक्षेप करीत तेव्हां लोकांना असें कधींच वाटलें नाहीं, कीं हा अधिक्षेप अयोग्य आहे. पण त्यांना नेहमीं एकच नवल वाटे व तें हेंच, कीं आजपर्यंत इतके लोक होऊन गेले, विद्वान् झाले, पंडित झाले, व्यवहारज्ञ झाले, समयज्ञ झाले, देशभक्तहि

झाले, तरी पण सरकारला असें निर्भीडपणें व टाकून बोलणारा मनुष्य हाच पहिला. सरकारविरुद्ध स्पष्ट बोलण्याचें व्रत टिळकांनीं प्रथमपासून धरलें तें अखेरपर्यंत पाळलें होतें. टाइम्सकारांनीहि टिळकांचे दोष दाखवितांना त्यांच्या चरित्राचें वर्णन " A life of campaigning terrorism to which we know no parallel in constitutional history " अशा शब्दांनीं केलें आहे. याचा सोप्या शब्दांत अर्थ असा, कीं " टिळकांच्या राजकीय मोहिमेचा दरारा मोठा कठिण; कोणत्याहि देशाच्या राजकीय घडामोडीच्या इतिहासांत त्याला तोड सांपडावयाची नाहीं. " आपल्याहुन वेगळया दृष्टीनें कां होईना, पण टाइम्सकरांनीं केलेलें टिळकांचें हें वर्णन टिळकांना खरोखरच अत्यंत भूषणास्पद आहे असें आम्ही तरी मानतों. राजकीय चळवळीची मोहीम करावी तर सर्व हिंदुस्थानांत एक टिळकांनीच करावी. सरकार इतर अंगांनीं सामर्थ्यवान् असेल पण टिळकांच्या राजकीय मोहिमेची त्याच्या मनांत धडकी भरत असे. टाइम्सनें याचा अजाणता पुरावाच वरील वर्णनांत दिला आहे. सरकार प्रबळ असतां या मोहिमांची भीति वास्तविक त्यांना इतकी का वाटावी ? त्याचें कारण हेंच, कीं त्या मोहिमेंत निर्भयता व धाडशीपणा हीं तर असतच, पण कायद्याच्या दृष्टीनें अत्यंत सुबक असें कौशल्यहि त्यांत असे. सरकारच्या बाजूला सर्व साधनें भरपूर, पैसा वाटेल तितका, पैशानें वश होणारीं बुद्धिवान् व धाडशी मनुष्यें पदरीं हवीं तितकीं, अधिकाराचें शस्त्रागार नेहमीं भरलेलें, हिंदुस्थानाच्या आंत बाहेर सद्दी जोरावर, साम्राज्याचे ग्रह उच्चीचे आलेले व बिचाऱ्या हिंदुस्थानचे ग्रह नीचीचे व पुरे अधःपतन पावलेले; याच्या उलट बिचाऱ्या टिळकांजवळ कांहीं नाहीं. येऊन जाऊन डोकें, जीभ, व एक लेखणी असें असता या निर्धन, निःशस्त्र, निःसैनिक वीराच्या मोहिमेचें भय टाइम्सनें म्हटल्याप्रमाणें कोणाला कां वाटावें ? पण तें वाटत होतें खरें. सरकार अशा गोष्टी स्वतः तोंडानें बोलून न दाखवितां नेहमीं आपल्या हस्तकांच्या किंवा हितचिंतकांच्या तोंडून बोलून दाखवितें. ध्वनिभ्रम उत्पन्न करण्याची ही जी कला त्यांना पुरी साध्य झाली होती तिला अनुसरून त्यांनीं टाइम्सकारांप्रमाणें इतर अनेकांच्या तोंडून त्यांचें वर्णन केलेलें आहे. चिरोलसाहेबांनीं आपल्या " हिंदुस्थानांतील अस-

तोष " या प्रसिद्ध पुस्तकांत टिळकांना " Father of Indian Unrest " म्हणजे " एकंदर हिंदुस्थानांतील प्रक्षोभाचे जनक " अशी पदवी दिली आहे. तसेंच रौलेट कमिटीच्या रिपोर्टांतहि क्रांतिकारक चळवळीचें मंथन करून त्यांतून काढलेल्या श्रीखंडाचा टिळा टिळकांच्या कपाळीं लावून त्यांचीच अग्रपूजा केली आहे. यावर फिरून आमचें म्हणणें हेंच, कीं दोष देण्याच्या हेतूनें जरी हें वर्णन, करणारानें केलें तरी राष्ट्राच्या दृष्टीनें आणि टिळकांच्या अभिमानी भक्तांच्या दृष्टीनें खरोखरच हें वर्णन टिळकांना बहुमानाचें पदक दिल्याप्रमाणें आहे. हिंदुस्थानांत असा एकहि मनुष्य आज नसेल, कीं कर्तृत्वाच्या दृष्टीनें अशा प्रकारच्या स्तुतीचा हा उंची दागिना, बहुमानाची ही थोर पदवी मिळणार असेल तर त्याबरोबर सरकारकडून येणारे हे व असले इतर शेंकडों दोषारोप खुषीनें पत्करणार नाहीं ! टिळक व सरकार यांजमधील संबंधाची ही गोष्ट ज्यानें जाणली नाहीं व तिचें कौतुक केलें नाहीं त्याला टिळकांच्या चरित्रांतील मर्मच कळलें नाहीं असें आम्ही म्हणतों ! ! सरकारकडून अशी निंदा करून घेण्याचें भाग्य अनेक शतकांतून एखाद्यालाच लाभतें. ज्यानें आपलें चारित्र्य घडीप्रमाणें संभाळून सरकाराशीं व इतर अनेक शत्रूंशीं जन्मभर युद्ध करून एकंदर राष्ट्रीय प्रक्षोभाचा जन्मदाता किंवा आद्यगुरु ही पदवी सरकारकडून मिळवून आमरण टिकविली त्याची स्तुति करण्याला त्याच्या मित्रांनीं निराळे शब्द कधीं खर्ची घालण्याचा प्रयत्नहि करूं नये असें आम्हांला वाटतें. लोकमान्य ही पदवी एका अर्थानें स्पृहणीय आहे. पण 'राष्ट्रीय चळवळीचें आद्य कारण ' ही पदवी तिच्याहूनहि खरोखर अधिक स्पृहणीय नाहीं काय ! " Father of Indian Unrest " हा शब्द टिळकांना स्वतःलाहि स्पृहणीयच असला पाहिजे. त्यांनीं चिरोलसाहेबावर फिर्याद मांडली तेव्हां वरील शब्दांनीं आपली बदनामी झाली अशी तक्रार केली नाहीं. केवळ खासगी चारित्र्यावर शिंतोडे उडविण्यासारखीं व त्यांतूनहि खोटीं अशीं जीं विधानें चिरोलसाहेबांच्या बुकांत ग्रथित आहेत त्यांपुरतीच त्यांची फिर्याद होती. " फादर ऑफ इंडियन अनरेस्ट " " राष्ट्रीय प्रक्षोभाचे आद्य गुरु " हे शब्द कोणी कितीहि घोळघोळून म्हटले तरी त्यांतून निंदेचा लवलेशहि

निघूं शकत नाहीं. कोणीं कितीहि लावून बोलण्याच्या अर्थानें ते म्हटले तरी त्यांनीं टिळकांच्या कीर्तिरूप देहाला टांचणी टोचण्याइतकीहि इजा होऊं शकत नाहीं. लोकमान्य हा शब्द प्रौढ असला तरी तो लिवालिवीत (Passive) आहे. आणि " फादर ऑफ इंडिअन अनरेस्ट " या शब्दांत टिळकांच्या पराक्रमाचें जें खोल व गंभीर गुणवर्णन आहे, तें 'लोकमान्य' या शब्दांत खचित नाहीं. या चार इंग्रजी शब्दांतून निघणारा जोरकस अर्थ समर्पक रीतीनें प्रकट करणारा एकच सुटसुटीत व ठसठशीत शब्द कोणी सुचवील तर आम्ही महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षातर्फे त्याचे ऋणी होऊं; व यापुढील टिळकांचा उल्लेख लोकमान्य या शब्दांनीं न करतां त्याहूनहि उज्ज्वल अशा या नवीन पदवीनेंच शक्य तर करीत जावा अशी महाराष्ट्रास विनंति करूं. राष्ट्राच्या स्वाभिमानबुद्धीला त्यांनीं क्षोभ उत्पन्न केला म्हणूनच ते लोकमान्य झाले ही गोष्ट खरी. परंतु मान्यता, व मान्यतेचें कारण जो पराक्रम, याचा जो दूरान्वय लोकमान्य या साध्या नांवांत घडतो तो आमच्या मताला पटत नाहीं. तरुण महाराष्ट्रापुढें टिळकांचें उदाहरण ध्येयरूपानें राहिलें पाहिजे. पण तें ठेवितांना टिळकांना मिळत असलेल्या बहुमानापेक्षां त्यांनीं राजकारणांत जो पराक्रम केला तोच तरुण पिढीच्या नजरेपुढें त्यांच्या पदवीच्या रूपानें विशेष ठळकपणें आला पाहिजे.

## [ ६ ]

## लो० टिळकांच्या यशाचें मर्म

लो० टिळकांइतका 'यशस्वी' पुरुष महाराष्ट्रांत गेल्या शें-पन्नास वर्षांत झाला नाहीं. याविषयीं बहुधा एकमत आहे. पण त्या यशाचें मर्म काय ? असा प्रश्न निघाला असतां त्याचीं उत्तरें मात्र निरनिराळीं येण्याचा संभव आहे. याचें कारण यश या शब्दाचा सर्वांचा अर्थ एकच असत नाहीं. यश याचा अर्थ कोशकार कीर्ति असा देतो. पण मनुष्याची कीर्ति ज्यावरून होते तेंहि यशच असतें. कार्यदर्शक शब्द कारणालाहि लक्षणेनें लागतो. यश या शब्दाचा हा दुसरा अर्थ अपूर्व कार्यसिद्धि असा आहे. टिळकांचें कार्य अपूर्व व त्याची सिद्धिहि अपूर्व !

कीर्ति या अर्थानें यश हा शब्द मनांत आणून टिळकांच्या यशाचें मर्म काय या प्रश्नाचें जें उत्तर मिळतें तें, कार्यसिद्धि हा अर्थ घेऊन येणाऱ्या उत्तराहून वेगळें आहे. टिळकांचें यश म्हणजे कीर्ति सर्व हिंदुस्थानभर काय पण इतर कांहीं देशांतहि पसरली होती. हिंदुस्थानांतल्या रानांजंगलांतल्याहि मनुष्यांनीं टिळकांचें नांव कर्णोपकर्णीं ऐकलें होतें. आणि टिळक म्हटलें म्हणजे कोणी तरी एक 'फार मोठा माणूस' इतकेंच ज्ञान त्यांना असे. देव, भुत, राक्षस यांचें वस्तुरूप कोणींच पाहिलेलें नाहीं. हे तीनहि आहेत किंवा असावेत अशी कबुली मन आंतून देतें; पण या तिघांचेंहि स्वरूप कोणीं पाहिलेलें नसतें. त्यांची कल्पना मन करावयासच बसलें तरी प्रत्ये-काची वेगवेगळी होईल. किंबहुना, त्याच एकाच माणसानें निरनिराळ्या वेळीं कल्पना चालावली तरी हीं कल्पनारूपें वेगवेगळीं असू शकतील. पण भक्तिभावना हें जसें ईश्वराचें अस्तित्व मानण्याला सबळ कारण, तशींच भुतें व राक्षस यांचें अस्तित्व मानण्याचें खरें कारण भीति हें असतें.

कीर्तिमान् टिळकांची हजारों लोकांची कल्पना त्यांच्या भौतिक स्वरूपाच्या कल्पनेइतकीच वस्तुस्थितीला सोडून असण्याचा संभव होता. ज्यांनीं टिळक कधीं पाहिले नव्हते अशांनीं त्यांच्या स्वरूपाविषयीं चालविलेल्या कल्पना ऐकण्याचा प्रसंग मला अनेक वेळां आला. त्यांनीं मुद्दाम होऊन टिळकांचें वर्णन केलें नाहीं, पण त्यांच्या बोलण्याच्या ओघावरून तें वर्णन न कळत बाहेर पडत असे. सामान्य लोकांची कल्पना अशी कीं, टिळक हे कमींत कमी सहा सात फूट उंच, भले लठ्ठ, कदाचित् गुलमिशावाले, हातांत एखादें भलें मोठें दांडकें वापरणारे, असे पुरुष असावे. पण हें वर्णन वस्तु-स्थितीला अगदीं सोडून होतें. दुसऱ्या कित्येकांची कल्पना अशी कीं, टिळकांना एखादा साहेब दिसला न दिसला पुरे, ते त्याच्या अंगावर खेंकसत असतील, त्याला तोंडावर शिव्याशाप देत असतील, त्याचे आई-बाप उद्धरीत असतील, किंवा हातांतलें सोडगेंहि त्याच्या अंगावर उगारीत असतील. ही कल्पनाहि वरच्याइतकीच वस्तुस्थितीला सोडून होती हें सांगणें नकोच. टिळक हे कोणी मोठे विरागी म्हणजे साधुसंतांसारखा पोषाक केलेले, किंवा अंगाला भस्म फांसलेले, किंवा कपाळाला लाल शेंदराचें

बोट लावलेले, अशी जी कित्येकांची कल्पना तिचीहि गत वरीलप्रमाणेंच. आणि टिळक हे देवासारखे होते, ते नवसाला पावत, किंवा मनांतलें ओळखीत, किंवा भविष्य सांगत, किंवा रोग बरे करीत अशाहि ज्या कल्पना—अर्थात् फार थोड्या लोकांचे ठिकाणीं——दिसून येत होत्या त्याहि खोट्या होत्या हें सांगावयास नको.

पण पूर्वी सांगितल्याप्रमाणें, देव-भूत-राक्षस यांची भौतिक कल्पना प्रत्येकाची वेगवेगळी असली तरी भक्ति व भीति या भावना जशा सर्वसामान्य व सत्यस्वरूप असतात, तशीच कीर्तीनें टिळकांना ओळखणाऱ्या दूरदूरच्या लोकांच्या मनांत त्यांजविषयीं एक भावना सर्वसामान्य होती. ती अशी कीं, टिळक हे मोठे देशभक्त असून देशाच्या शत्रूपासून त्याला सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अर्थात् टिळक हे आपले मित्र, उपकारकर्ते व आपल्या शत्रूचे शत्रू. अशा लोकांना देश किंवा त्याची सुटका या शब्दांच्या व्याख्या बरोबर करितां आल्या नसल्या; पण देशाची व त्याच्या सुटकेची कल्पना प्रत्येकाची वेगळी असली तरी, या सर्व कल्पना ज्यांत बसूं शकतील असा कांहीं गुण टिळकांमध्यें होता, म्हणूनच त्यांच्या मोठेपणाची कीर्ति पसरली व मान्य झाली.

अशा कीर्तीचें निर्णायक कारण असामान्यत्व. कीर्ति ही समुद्राच्या लाटांसारखी आहे. एक लाट उठली म्हणजे ती दुसऱ्या लाटेला उठविते, दुसरी तिसरीला, असा क्रम पुढें सुरू होतो. पण पहिली लाट उठण्यालाहि कांहीं तरी सबळ क्षोभ-कारण लागतेंच. टिळकांच्या कीर्तीची लाट प्रथम महाराष्ट्रांत उठली व मग ती हळुहळू इतर प्रांतांत पसरली हें खरें; पण मूळ महाराष्ट्रांत तरी ही लाट उठण्याला कारण काय झालें? टिळकांवरील खटले व त्यांना झालेली शिक्षा हें त्यांच्या अखिल भारतीय कीर्तीचें खरें कारण आहे असें कित्येक टीकाकार म्हणतात. ठीक आहे. खटले होणें, शिक्षा सोसणें, आणि या दोहों प्रसंगीं निर्भय, धीरोदात्त अशी वृत्ति ठेवणें यामुळें होणारी कीर्ति क्रमाक्रमानें वाढणारी असून सर्व हिंदुस्थानाला एकदम पटणारी अशा प्रकारची आहे ही गोष्ट मान्य करण्यास हरकत नाहीं. परंतु यांत देखील वर दर्शविलेलें टिळकांचें कांहींतरी असामान्यत्व हेंच कारण मानलें पाहिजे.

राजकीय गुन्ह्याकरितां टिळकांहून अधिक शिक्षा झालेले किंवा तुरुंगांत अधिक दिवस काढलेले लोक आहेत; पण त्यांच्या खटल्यांच्या व शिक्षांच्या 'बातमी'नें त्यांची 'कीर्ति' सर्व हिंदुस्थानभर पसरली नाहीं किंवा टिकूनहि राहिली नाहीं. अर्थात् हें असामान्यत्व कोणतें ? याचा विचार करितां यश या शब्दाचा जो दुसरा म्हणजे कार्यसिद्धी हा अर्थ, त्याकडे वळावें लागतें. टिळकांची कार्यसिद्धि कांहीं विशेष होती म्हणूनच त्यांची कीर्ति कांहीं विशेष झाली. मग ही कार्यसिद्धि कोणती ? तर **सरकारशीं राजकारणाचें भांडण सतत भांडत राहून त्या भांडणांत जास्तींत जास्त लोक सामील करून घेऊन त्याची दहशत सरकारास बसविणें, हें होय.** आणि ही कार्यसिद्धि कां झाली तर टिळकांच्या आंगचे **लोकोत्तर गुण या एका कार्यावर खर्च झाले** म्हणून.

कार्यसिद्धि या शब्दामध्यें क्रियापूर्णत्वाचा ध्वनि असला तरी टिळकांनीं देखील केलेलें कार्य शेंकडा शंभर इतकें पूर्णत्वाला गेलें होतें असें कोणीच म्हणत नाहीं. किंबहुना १९२१ सालीं असा एक क्षण खचित आला होता कीं, राजकारणाची चळवळ टिळकांच्या चळवळीपेक्षांही अधिक तीव्रतेला पोंचली होती. टिळकांच्या चळवळीपेक्षां त्या चळवळींत त्या वेळीं अधिक लोक सामील होते, आणि टिळकांच्या कोणत्याहि चळवळीपेक्षां त्यावेळच्या चळवळीची सरकारला क्षणभर अधिक दहशत वाटली. पण या गोष्टी झाल्या, तरी क्षणभर झाल्या ! त्या तशा टिकल्या नाहींत. त्यांमध्यें सातत्य राहिलें नाहीं. उलट टिळकांविषयीं सरकाची जी शत्रुत्वाची भावना १८९५-९६ सालीं होती तीच १९२० सालापर्यंत एकसारखी टिकली. चिरोलसाहेबानें टिळकांचें 'Father of Indian unrest' हें जें वर्णन केलें आहे तें त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला जसें लागतें तसें, 'सरकारचे शत्रु' हें जें त्यांचें वर्णन सरकारनें केलें तें त्यांच्या कारकीर्दीच्या जवळ जवळ अखेरच्या काळांत उद्भवलेलें होतें. म्हणजे अशा रीतीनें टिळकांच्या कारकीर्दीचे आद्यंत हे सुसंवादी स्वर असून या कारकीर्दीच्या मध्यभागीं झालेले त्यांच्यावरील खटले हे अनुवादी-स्वरानें टिळकांचें धोरण एकाच प्रकारचें राहिलें असें सांगतात. ग्रंथपरीक्षा जशी उपक्रमोपसंहार व मध्यवर्ती सिद्धान्त यांच्या साहाय्यानें

करितात, त्याच रीतीनें टिळकांच्या चरित्राचें परीक्षणहि या तीन प्रकारच्या कसोट्यांनीं करावें लागतें. सरकाराशीं झुंज ठेवणें, केव्हांही त्या झुंजेंत जास्तींत जास्त लोक सामील करणें, व सरकारास दहशत वाटेल अशा रीतीनें झुंज लढवणें, या तिहींनाहि अवश्य लागणारी अशी एक गोष्ट म्हणजे धोरणाचा सुसंगतपणा व उद्योगसातत्य हें होय. सतत सुसंगतपणें अधिकांत अधिक लोक मिळवून सरकाराला दशहत पडण्यासारखी राजकीय झुंज करणें हेंच टिळकांच्या यशांतील खरें मर्म होय, असें विचारांतीं कोणासहि समजून येईल. लो० टिळकांची कीर्ति क्रमानें वाढतच गेली, केव्हांहि कमी झाली नाहीं. पण त्याचें कारणहि हें कीं, वरील अर्थाची कार्यसिद्धिहि यथाप्रमाण वाढत गेली आणि या कार्यसिद्धीला टिळकांच्या अंगचे सर्व गुण एकाग्रतेनें खर्ची पडले.

वरील कसोटी लावून पाहिली असतां टिळक हे त्यांच्या आधींच्या, समकालीन व नंतरच्या त्यांच्या बरोबरीच्या लोकांहून वेगळे पण अधिक यशस्वी कसे ठरले तें कळून येईल. आपण निरनिराळीं उदाहरणें घेऊं म्हणजे कळेल. महाराष्ट्र घेतला तर कृष्णशास्त्री चिपळूणकर बुद्धिवान् व विद्वान्, पण त्यांना राजकारणाची दृष्टीच नव्हती. विष्णुशास्त्री चिपळूणकरांना राजकाणाची दृष्टि भरपूर होती. टिळकांनीं त्यांचीच दृष्टि व स्फूर्ति घेतली. पण शास्त्रीबोवांमध्यें टिळकांच्याइतकी उद्योगशीलता, बहुजनसमाजांत मिळूनमिसळून वागण्याची आवड आणि राज्यकारभाराचे किरकोळ वाद हे चळवळीच्या चरांत इंधनास रखे घालून स्वयंपाकासारखें प्रत्यक्ष कार्य करून देणारी आग पेटत ठेवणें ही कला नव्हती. ते अवघ्या बात्तिसाव्या वर्षींच वारले हें खरें. तथापि त्यांची समक्ष माहिती असलेले लोक सांगतात त्यावरून टिळकांसारखा चालू राजकारणाचा राडा उरकण्याला लागणारा स्वभाव शास्त्रीबोवांच्या ठिकाणीं नव्हता. प्रो० जिनसीवाले हे विद्वान् व बहुश्रुत, पग ते अगदींच एककल्ली. हातून कधीं एक अक्षरहि हुकमी लिहून व्हावयाचें नाहीं; आणि कोणीं एक विषय पुढें आणला तर दुसराच कांहींतरी काढून मुळावर कांहींच उरूं न देण्याची त्यांची वादपद्धति असे. राजकारणांत विधायक सूचना करून कानामात्राइतकें सूक्ष्म पाहून प्रतिपक्षाशीं धांवतें युद्ध करण्याची कला जिनसीवाले यांना मुळींच अवगत नव्हती. डॉ. अण्णासाहेब पटवर्धन यांची बुद्धि अत्यंत

कुशाग्र. पण ते चालू राजकारणांत मुळीं पडलेच नाहींत, व पडले तरी त्यांची दिनचर्या आणि स्वभाव यांच्यामुळें त्यांच्या हातून चालचलाऊ काम चारदोन दिवस देखील झालें नसतें. कोणास कधीं न सुचतील असेहि मुद्दे एकादे वेळीं ते काढीत पण पुष्कळ वेळां कोणी कधींहि मानणार नाहींत असेच ते असत. डॉ० नानासाहेब देशमुख यांची बुद्धिमत्ता जबर आणि त्यांचें अंतःकरण राष्ट्रीयत्वानें पूर्ण भरलेलें. परंतु राजकारणांतील प्रत्यक्ष पुढारीपण टिळकांवर सोंपवून आपला आशीर्वाद आणि सल्ला-मसलतीची व इतर हरएक प्रकारची मदत त्यांना देऊन, नानासाहेबांनीं चालू राजकारणापासून स्वतःस मोकळें ठेवलें होतें.

आतां दुसऱ्या पक्षांतील महाराष्ट्रीय पुढारी घेऊं. रा. ब. गोपाळराव हरि देशमुख हे बहुश्रुत व लेखनव्यासंगी. परंतु त्यांचा बहुतेक जन्म सरकारी नोकरींत गेला. उरलेल्या वेळांत देखील त्यांनीं जें लिहिलें सवरलें त्याचा रोंख आधुनिक शास्त्रें, कला, भौतिक सुधारणा वगैरेविषयीं आपल्या समाजांत अभिरुचि उत्पन्न करणें व जुन्या धार्मिक, सामाजिक कल्पनांचें मनावरील बंधन कमी करणें यांतच गेला. हें काम त्यांच्या परीनें चांगलेंच होतें. पण राजकारणांत इंग्रजांची सत्ता व शहाणपण यांनीं त्यांची दृष्टि दिपून व बुद्धि थिजून गेल्यासारखी झाली होती. यामुळें राजकारणांतील झगडा करण्यास ते फारसे पात्र नव्हते. रावबहादुर रानडे यांची बुद्धि टिळकांच्या बुद्धीइतकी किंवा तिजहूनहि अधिक विशाल होती. आणि त्यांची व्यापक कामगिरी, एकंदर समाजाला उद्योगशील बनविण्याविषयींची आतुरता, विषयाभ्यासाची आस्था, तात्त्विक विचारांचा खोलपणा, सार्वजनिक पुढाऱ्याला लागणारी मनःसमता यांविषयीं लो० टिळक हे स्वतः इतके आदरयुक्त उद्गार काढीत कीं, त्यांच्या मतें अखिल हिंदी पुढाऱ्यांत श्रेष्ठपणाचा मान एकट्या रानड्यांना मिळतो. परंतु रानडे यांचेंहि सर्व आयुष्य नोकरपेशांत गेलें आणि राष्ट्रीयत्वाची प्रखर भावना जनतेंत उत्पन्न करण्याला जो तापटपणा अवश्य असतो तो त्यांचे अंगीं मुळींच नव्हता. रानड्यांना 'फादर ऑफ पॉलिटिक्स् इन् महाराष्ट्र' हें नांव यथार्थतेनें देतां येईल. पण हें वर्णन, आणि चिरोलसाहेबांनीं केलेलें टिळकांचें वर्णन

हीं जोडून पाहिलीं—अर्थात् राजकारण व असंतोष या दोन शब्दांतील सूक्ष्म व गहन फरक लक्षांत घेतला—म्हणजे रानडे व टिळक यांच्यांतील फरक कोणाच्याहि तेव्हांच लक्षांत येईल. आणि रा० ब० रानडे यांचीहि कीर्ति जरी सर्व हिंदुस्थानभर पसरलेली आहे तरी त्यांच्यापेक्षां टिळकांची कीर्ति समाजाच्या वरिष्ठ वर्गांप्रमाणें मध्यम व कनिष्ठ वर्गांतहि कां अधिक पसरली होती हें समजेल. अधिकांत अधिक जनता आपल्याबरोबर सामील करून घेण्याची कला रानड्यांपेक्षां टिळकांना अधिक हस्तगत झाली होती यांत शंका नाहीं. कै० गोखले व टिळक हे दोघे तर पुढारी या नात्यानें एकाच काळीं समाजांत वावरत होते. त्या दोघांचें चरित्र मागच्या पिढीच्या डोळ्यांपुढें ढळढळीत असल्यामुळें दोघांतील फरक काय व गोखल्यांपेक्षां टिळकांचें कीर्तिरूप यश देशांत अधिक कां पसरलें हें त्या पिढीस चांगलें माहीत आहे.

मुंबईच्या पुढाऱ्यांपैकीं कीर्तिमत्तेच्या दृष्टीनें टिळकांशीं फक्त फिरोजशहा मेथा यांचीच तुलना करता येईल. मेथा हे रानड्यांपेक्षां अधिक तापट व राजकारणाची झुंज करून खेळणारे होते. पण त्यांचें वास्तव्याचें ठिकाण, भाषा, राहणी, स्वभाव, सर्वच गोष्टी, त्यांचें राजकारण व सामान्य जनता यांचा संबंध जुळण्याला प्रतिकूल होत्या. इतर प्रांतांतील पुढाऱ्यांपैकीं लाला लजपतराय हे टिळकांच्या बरेचसे जवळ येतात; पण पंजाबाची स्थितीच अशी होती कीं, तेथें लजपतरायांसारख्या पुढाऱ्यांसहि हवा तेवढा अनुयायी-वर्ग संघटित असा मिळूच नये. त्यांतल्या त्यांत लजपतराय यांच्या सेवेचा कल राजकारणापेक्षांहि धार्मिक, सामाजिक बाबींकडे अधिक असे, आणि राजकारणांत आपणासहि दोन गोष्टी अधिक सांगण्यासारखे टिळक होते असें स्वतः लजपतरायच म्हणत. पं० मदन मोहन मालवीय हे उद्योग-शीलतेंत कदाचित् टिळकांनाहि मागें सारण्यासारखे आणि हिंदुसमाजापुरतें पाहिलें तर निदान उत्तराहिंदुस्थानांत टिळकांची जी कीर्ति तिच्याहून पंडित मालवीय यांची कीर्ति अधिक प्रसृत आहे यांत शंका नाहीं. पण दीर्घसूत्री-पणा, अनिश्चितता वगैरे व्यक्तिगत अवगुण पंडितजींमध्यें असून, शिवाय त्यांचें मन जात्या मृदु असल्याकारणानें राजकाणांत टिळकांइतकी तीव्रता ते आणूं शकले नाहींत. अगदीं अलीकडल्या काळापर्यंत त्यांची वृत्तिहि बरीचशी

नेमस्तपणाकडे असे. बंगालचे पुढारी सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं टिळकांप्रमाणेंच आपल्या प्रांतांत अनाभिषिक्त राजसत्तेचा उपभोग घेतला; परंतु निःस्वार्थीपणांत त्यांच्या प्रांतांतलेहि लोक सुरेंद्रबाबूंना टिळकांइतका मान देत नसत. आणि उपयुक्ततेहून अधिक वयोमान त्यांना मिळाल्यामुळें सुरेंद्रबाबूंची कीर्ति त्यांच्या हयातींतच उताराला लागलेली पाहाण्याचा त्यांना प्रसंग आला. टिळकांच्याइतकी सर्व हिंदुस्थानभर कीर्ति झालेला एकहि पुढारी मद्रास इलाख्यांत झाला नाहीं. पूर्वी जी. सुब्रह्मण्य अय्यर व अलीकडे न्या० मू० सुब्रह्मण्य अय्यर यांना लोकप्रियता पुष्कळच लाभली; पण ती बरीचशी प्रांतिक होती. बिहारप्रांत, मध्यप्रांत यांजमध्यें टिळकांशीं तुलना करण्यासारखा कीर्तिमान् पुढारी झालाच नाहीं.

गुजराथेंत म० गांधींच्या पूर्वी नांव घेण्यासारखा कीर्तिमान राजकारणी पुढारी कोणीच झाला नव्हता. पण म० गांधी यांनीं त्यांचा सगळा वचपा भरून काढून, आपल्या प्रांताला कीर्तिमान् पुढाऱ्यांच्या गणनेंत सर्व हिंदुस्थानांत अग्रमान मिळवून दिला. टिळकापेक्षांहि म० गांधी हे एके वेळीं अधिक कीर्तिमान् ठरले यांत शंका नाहीं. मीं अन्यत्र एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, १९२१–२२ च्या सुमारास एक काळ असा येऊन गेला कीं, तीव्रतेच्या दृष्टीनें म० गांधींचें राजकारण टिळकांच्या राजकारणापुढें बरेंच गेलें होतें. सर्वसाधारण विद्वत्तेच्या दृष्टीनें टिळक हे गांधींपेक्षां श्रेष्ठ असले तरी, इंग्रजी भाषा लिहिण्याबोलण्यात गांधींनीं टिळकांवर ताण केली. शिवाय जनतेचें साहाय्य मिळविण्याच्या दृष्टीनें परप्रांताची कोणतीहि देशभाषा अवगत नसणें ही एक टिळकांच्याहि मध्यें मोठी उणीव राहून गेली होती, ती म० गांधी यांनीं भरून काढली. निर्भयतेंत टिळक व गांधी यांजमध्यें डावें उजवें कांहींच म्हणतां येण्यासारखें नाहीं. राहणीच्या साधेपणांत गांधींनीं टिळकांच्याहि पुढें मजल मारली व एकाद्या विशिष्ट गोष्टीविषयीं आग्रहाची व करारीपणाची कड, एका विशिष्ट क्षणीं कोण अधिक पोंचवूं शकला ही बाब घेतली तर टिळकापेक्षां गांधीच अधिक मान्यता पावतील. पण विशिष्ट प्रसंगीं टिळकांपेक्षांहि जनतेचें अधिक पाठबळ मिळविण्याची पात्रता म० गांधी यांनीं सिद्ध केली असली तरी ती टिकविण्याची पात्रता त्यांनीं सिद्ध केली नाहीं

असेंच म्हणावें लागतें. गांधींच्या करारीपणाबद्दल लोकांना जितका विश्वास वाटे तितकाच, ते आपलें राजकारणी धोरण लहरीपणानें वेळोवेळीं केवळ आत्मसंतोषार्थ बदलूं शकतील असा संशयहि जनतेला येत असे. आपल्या धोरणाला प्रसंगानुसार मुरड घातली पाहिजे असें टिळकांचें मत व कृतिहि होती. पण फरक असा कीं, म० गांधी यांची मुरड इतकी ढोबळ असणें संभवनीय कीं, तिनें मूळच्या वस्तूचें स्वरूपच सर्वस्वीं पालटल्याचा भास व्हावा; आणि टिळक देखील मुरड घालीत पण ती इतकी सूक्ष्म-बेमालूम असे कीं, त्यांच्या मूळच्या धोरणाचें स्वरूप फारसें बदललें असें सहसा कोणास म्हणतां येत नसे. यामुळें टिळकांनीं सरकाराशीं सुरू केलेलें राजकारणी झुंज म०गांधी यांनीं परिणत स्वरूपाला आणलें व एकवेळीं टिळकांपेक्षां अधिक जनतेचें पाठबळ चळवळींत मिळवून टिळकांपेक्षांहि त्यावेळेपुरती सरकारला अधिक दहशत उत्पन्न केली तरी, चळवळीच्या तीव्रतेचें सातत्य व दहशत म० गांधी यांना टिळकांप्रमाणें राखतां आली नाहीं. येवढ्याच बाबतींत टिळक व महात्मा गांधी यांच्या यशाच्या मर्मांत फरक पडतो. म० गांधींच्या गुणांच्या अंगभूत असलेले जे प्रतियोगी दोष तेच कदाचित् या गोष्टीला कारणीभूत असतील. किंवा उलट कोणीकोणी असेंहि म्हणतात कीं, टिळक आणखी पांचसात वर्षें जगते तर त्यांच्याहि लोकप्रियतेचें काय झालें असतें कोणास ठाऊक? पण काल्पनिक गोष्टी सोडून प्रत्यक्ष घडून आलेल्या गोष्टींपुरतें पाहिलें तर, टिळक व गांधी यांच्यामध्यें जो फरक वर दर्शविण्यांत आला तो मान्य केल्याशिवाय, माझे मतें, गत्यंतर नाहीं.

असो. अशा रीतीनें टिळकांच्या कीर्तिरूपी यशाची मीमांसा करतां येते. यश म्हणजे कार्यसिद्धि या अर्थानें टिळक काय, गांधी काय, कोणासहि ती सिद्धि सोळा आणे आपल्या पदरांत पडली किंवा आपलें कार्य पूर्ण होऊन आपण कृतार्थ झालों असें यथार्थतेनें म्हणतां आलें नाहीं. दोघांच्याहि कार्यसिद्धीची कल्पना विशाल असल्यानें, इतरांपेक्षां स्वतः त्यांनाच आपल्या कार्यसिद्धीची अपूर्णता व आपल्या कर्तृत्वाचा उणेपणा भासत असला पाहिजे व भासत होताहि. पण एका माणसाला देशाच्या विद्यमान बिकट परिस्थितींत जितकें करतां आलें तितकें टिळक व गांधी या दोघांनीं केलें यांत

शंका नाहीं. त्यांतल्या त्यांत टिळकांचा भर प्रत्यक्ष राजकारणावर विशेष होता, व गांधींचा भर सद्गुण-संवर्धनावर होता ही गोष्ट जनतेला दिसत असल्याकारणानें, म० गांधींइतकेंच टिळकांना आपले व आपल्या देशाचे मित्र असें जनता मानीत असली, तरी आपल्या शत्रूंचे शत्रु या दृष्टीनें गांधींपेक्षां टिळकांस जनता अधिक मान्यता देत होती व आहे असें मला निःसंशय वाटतें. कित्येकांच्या दृष्टीनें शत्रुत्वाच्या कसोटीनें देशभक्तीची किंमत करणें हें हीनतेचें ठरेल, व सात्त्विक गुणांचे जे एकांतिक समर्थनकार असतील त्यांनीं असें म्हटलें असतां त्यांत वावगें कांहीं नाहीं. पण जनता ही जशी आहे तशी सामान्यपणें घेतली असतां टिळकांच्या यशाचें मर्म काय अनुमानितां येतें इतकेंच दर्शविण्याचा मीं येथें प्रयत्न केला आहे.

टिळकांपेक्षां निरनिराळ्या एकेकट्या गुणांनीं श्रेष्ठ असे अनेक लोक हिंदुस्थानांत होऊन गेले. पण टिळकांमध्यें जो गुणसमुदाय संघटित झाला होता तो इतर थोड्यांमध्यें होता, व तो असाच होता कीं, त्यामुळें टिळकांची कीर्ति इतरांपेक्षां अधिक व्हावी.

[ ७ ]

## लो० टिळकांसंबंधीं दोन महत्त्वाचीं पत्रें

### [ १ लो० टिळकांचें श्री. दादासाहेब खापर्डे यांना १९०९ सालीं मंडाले तुरुंगांतून लिहिलेलें पत्र

( इंग्रजी )—या वेळीं टिळकांच्या सुटकेकरितां कांहीं अटी सुचविल्या जाणार असा प्रवाद विलायतेंत होता. तो लंडनहून खापर्डे यांनीं टिळकांना कळविला. त्याला टिळकांचें हें उत्तर आहे. सुटकेकरितां भलत्या अटी पत्करणारे टिळक नव्हते हें पूर्वीं १८९८ सालीं दिसून आलेंच होतें. त्याचप्रमाणें तें या पत्रावरूनहि दिसून येईल. हें पत्र माझ्या संग्रहीं असतांहि पूर्वीं टिळकचरित्रांत घालावयाचें नजरचुकीनें राहिलें. तें माझा मुलगा चि. काशिनाथ ऊर्फ बापू यानें हुडकून काढून त्याचें भाषांतर करून पाठविलें आहे.

२ महात्मा गांधी यांचें लो. टिळक यांना. (हिंदी) हें हि पत्र मजजवळील कागदपत्र चाळतांना मला नुकतेंच उपलब्ध झालें. तें मूळ हिंदींत आहे तें तसेंच दिलें आहे. या पत्रावरून दोन गोष्टी दिसून येतात. गांधीजी हे मनानें व तत्त्वानें प्रतिसहकारवादी आहेत. मात्र आपलें उद्दिष्ट साधण्यासंबंधानें इतर साधनांपेक्षां सत्याग्रहावरच (याचा अर्थ असहकारितेवरच असा मात्र नव्हे) महात्माजींचा अधिक विश्वास असतो. या पत्रावर नुसती मिति आहे, शक नाहीं. तथापि संदर्भावरून तें १९१८ सालचें असावें असें वाटतें.

न. चिं. केळकर ]

## पत्र १

तुमचें ता. ६ चें पत्र काल पोंचलें. माझ्या सुटकेकरितां जर सरकारकडून कांहीं शर्ती व बंधनें सुचाविण्यांत आलीं तर तीं मी पत्करीन किंवा नाहीं हा प्रश्न कांहींसा चमत्कारिक आहे. हा प्रश्न माझ्यापेक्षां माझ्या मित्रांनींच सोडवून त्याचें उत्तर दिलें असतें तर तें अधिक बरें झालें असतें. तथापि तुम्ही हा प्रश्न मलाच विचारतां म्हणून नाइलाजानें व कांहींसें नाखुशीनें मी माझें मत सांगतों.

माझ्या सुटकेकरितां, (१) कायदेशीर मार्गानें, (२) इक्विटीच्या मार्गानें व (३) सामान्य भूतदयेच्या मार्गानें, असा तीन मार्गांनीं प्रयत्न करून पाहातां येईल. रीतसर मार्गानें या तीनहि गोष्टी संपल्या म्हणजे मग या बाबतींत आपण एक पाऊलहि पुढें जाऊं नये.

(१) कायदेशीर मार्गाचा प्रयत्न तुम्हीं करून पाहिलाच आहे. माझ्या खटल्यांत जीं अनेक दोषस्थळें राहिलीं आहेत तीं पाहतां खटल्याची फेरचौकशी व्हावी असा निर्णय प्रिव्हि–कौन्सिल देईल अशी सर्वांची अपेक्षा होती. पण त्या बाबतींत अपयश आल्यानें कायदेशीर प्रयत्नांचा अखेरचा मार्गहि संपला आहे.

(२) इक्विटीच्या दृष्टीनें पाहतां माझी चौकशी हिंदी ज्यूरीकडून व्हावयास पाहिजे होती. सध्याच्या कायद्याप्रमाणें मला तसा हक्क मिळ शकत नाहीं म्हणून सिव्हिल राईट्स कमिटी माझी बाजू घेऊं शकेल. मला जर हिंदी

ज्यूरी मिळती तर मी खात्रीनें सुटलों असतों. राजद्रोहासारख्या स्टेटविरुद्ध गुन्ह्यांत तुमची चौकशी तुमच्याच देशबांधवांचे ज्यूरीकडून झाली पाहिजे हा एक ' हेबियस कॉर्पस ' इतकाच महत्त्वाचा सनदशीर हक्क आहे. 'स्टार' वगैरे इंग्रज पत्रांनीं देखील असेंच मत दिलें आहे. पार्लमेंटरी कमिटीकडे न जातां सिव्हिल राइट्स कमिटीच्या अध्यक्षांची तुम्हीं गांठ घेतली हें बरें झालें.

( ३ ) मला झालेली शिक्षा फार जबर आहे, गुन्ह्याच्या प्रमाणाबाहेर आहे, या मुद्द्यावर भूतदयेच्या दृष्टीनें प्रयत्न करितां येईल. कायदेशीर मुद्द्यांच्या सर्व गोष्टी बाजूस ठेवल्या तरी, केवळ एकदोन लेख मीं वर्तमानपत्रांत लिहिले याखेरीज इतर कोणतेंहि अपकृत्य अगर आक्षेपार्ह गोष्ट माझे हातून घडली असें दाखवितां आलें नाहीं. एवढ्या गुन्ह्याकरितां सहा वर्षांच्या कैदेची शिक्षा ठोठावणें हें खरोखरच रानटीपणाचें कृत्य आहे. इंग्लंडमध्यें कोणालाहि आज अशी शिक्षा मिळती ना ! सरकारनें मेहेरबानीनें ही शिक्षा सक्तमजुरीची न करितां साध्या कैदेची केली हें खरें. तरीहि माझें आजचें वय, समाजांतील दर्जा व मीं लिहिलेला लेख या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन, कोणीहि मला झालेली शिक्षा जबर आहे असेंच म्हणेल. मग न्यायाधीश यांचें मत कांहींहि असो. या मुद्द्यावर अपील करणारांनीं दयेचा अर्ज पूर्वी मॅक्समुल्लर किंवा सर वुइलियम हंटर यांनीं जसा केला होता त्या धर्तीवर अगदीं थोडक्यांत करावा. त्यांत इतर गोष्टी असूं नयेत. त्यावर वजनदार गृहस्थांच्या सह्या असल्या तर आज ना उद्यां त्याचा थोडाबहुत तरी उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं. माझ्या सुटकेकरितां सरकार कोणत्या अटी घालील व मी कोणतीं बंधनें मान्य करूं शकेन याचा विचार हें अपील करणारांनीं करूं नये. ती सरकार व माझ्यामधील गोष्ट आहे. त्यांत योग्यायोग्य पाहून काय करावयाचें तें आमचें आम्ही पाहून घेऊं.

आतां यानंतर सरकारच्या शर्ती पत्करावयाच्या कीं नाहीं याबद्दल माझें खरें मत काय आहे तें तुम्हांस सांगतों. पूर्वी १८९८ सालीं जशा प्रकारचीं बंधनें मजवर घालण्यांत आलीं ( खटल्याचें पुस्तक पृ. १४ पहा ) तसलींच हींहि असतील तर तीं पत्करण्याला माझी हरकत नाहीं. माझा

सन्मान लोकांनीं करूं नये, मिरवणूक काढूं नये या गोष्टींना मी आनंदानें संमति देईन. पण ज्या मुख्य गोष्टीकरितां माझा आग्रह आहे ती हीं कीं **तुरुंगाबाहेर माझें पाऊल पडल्यानंतर स्वतंत्र नागरिकाला जे जे कायदेशीर हक्क असतात ते सर्व मला मिळाले पाहिजेत. हे माझे हक्क अबाधित राहतील म्हणूनच पूर्वीं १८९८ सालीं सरकारनें घातलेल्या इतर किरकोळ अटींना मीं मान्यता दिली.** आतां तसल्या अटींवर सरकार मला सोडणार नाहीं; अधिक कठिण व जाचक बंधनें घालूं पाहील व तीं मला स्वीकारतां येणार नाहींत हें उघड आहे.

माझ्या शिक्षेचें एक वर्ष संपत आलें. आणखी पांच वर्षें कैदेचीं उरलीं. त्यानंतर मी फिरून तुमच्यामध्यें येईन आणि स्वातंत्र्याचे हक्क भोगूं शकेन अशी मी आशा करतों. ही आशा फारच दूरची आहे हें खरें. तथापि कालांतरानें कां होईना पण फिरून मी तुमच्यांत येऊन राजकीय व सार्वजनिक काम करूं शकेन, हा संभव मी सरकारच्या भलत्याच अटी पत्करून आपल्या हातानें कायमचा कसा खुडून टाकूं ? येत्या जुलैंत माझ्या वयाला ५३ वर्षें सरून चोपन्नावें वर्ष लागणार. माझी शरीरप्रकृति, आनुवंशिक गुण, आणि मनुष्याचें साधारण वयोमान या गोष्टी लक्षांत घेतां मी दहा वर्षांवर अधिक जगणार नाहीं. या दहांतलीं पांच वर्षें तुरुंगांत गेलीं असें समजा. निदान राहिलेलीं पांच वर्षें तरी मला अनिर्बंध रीतीनें सार्वजनिक काम करण्यास मिळतील. **पण भलत्या अटींना मीं मान्यता दिली तर तो माझा राजकीय अगर सार्वजनिक आयुष्यांतील मृत्युच म्हणावयाचा ! असलें मेलेलें जिणें जगण्यांत अर्थ काय ? ती गोष्ट मला साफ नाकबूल आहे.** यापेक्षां जास्त लिहीत नाहीं. राजकीय चळवळ सोडली तरी वाङ्मयविषयक, संशोधनात्मक वगैरे इतर कार्य मी करूं शकेन याहि म्हणण्याचा मीं विचार केला. विचारांतीं माझें असें ठाम मत आहे कीं ती गोष्ट केवळ अशक्य आहे; इतकेंच नव्हे तर माझ्या सर्व पूर्वायुष्याशीं विसंगत आहे. सर्व आयुष्यभर खपून मीं जें केलें त्यावर यानें पाणी ओतल्यासारखें होणार आहे. माझें खाजगी असें आयुष्य काय आहे ? सार्वजनिक आयुष्य हेंच माझें जीवन; तेंच काम मी आजवर हौसेनें केलें.

**तुरुंगाच्या शिक्षेंतून केवळ कांहीं वर्षांची सवलत मिळावी म्हणून मी माझें सर्व सार्वजनिक आयुष्य पुसून टाकण्याला तयार झालों तर, देशावर याचा नैतिक परिणाम काय होईल याचा थोडा विचार करा !** मुलाच्या शिक्षणाची माझ्यावर जबाबदारी आहे. पण ती काळजी माझ्या गैरहजेरींत तुमच्यासारख्या मित्रावर सोपवितां येईल. लहानपणीं मी अवघा पंधरा वर्षांचा असतांना माझे आईबाप वारले. त्यापेक्षां माझ्या मुलांची स्थिति बरी आहे. कदाचित् माझ्या वरील लिहिण्यानें तुमचा असा समज व्हावयाचा कीं कांहीं थोडा काळ म्हणजे निदान वर्ष-सहामहिन्यांचें बंधन सरकारनें घातलें तर मी कदाचित् तें पत्करीन. पण मी तुम्हांला एकवार स्वच्छच सांगतों कीं मी खुषीनें तितका काळ तुरुंगांत राहीन **पण शिक्षा भोगून माझी सुटका झाल्यावर मी माझ्यावर कोणाला कसलेंही बंधन घालूं देणार नाहीं.**

दादासाहेब ! तुम्ही थिऑसाफिस्ट आहां. परमेश्वराच्या नियतिचक्राचे जे अतींद्रिय आणि गहन मार्ग आहेत त्यांवर तुमचा विश्वास आहे. माझ्याप्रमाणेंच तुमच्याहि मनांत असें येत नाहीं का ? कीं न जाणो, या आगामी पांच वर्षांत अशा कांहीं गोष्टी घडून येतील कीं दैवयोगानें माझी अकल्पित सुटका होण्याची वेळ येईल ! तें न घडलें आणि कदाचित् तुरुंगांतच मला मरण यावयाचें असलें तर नाहीं म्हणून काय होणार ? आपली तयारी ठेवलीच पाहिजे ! कायदेशीर किंवा इक्विटीच्या अगर सामान्य भूतदयेच्या दृष्टीनें अपील करणें हे जे तीन मार्ग पत्रारंभीं सांगितले त्यांनीं जें होईल तें करून पाहा. आणि या उपायानीं कांहींच होण्यासारखें नसलें तर तो मार्ग सोडून द्या. कसेंहि करून म्हणजे सरकारच्या हव्या त्या अटी मान्य करून सुटका करून घेण्याची माझी इच्छा नाहीं. आणि तुम्ही माझे मित्र झालां तरी जें पाऊल वाजवी नाहीं त्यापलीकडे तुम्हींहि आपल्या मैत्रीचा जिव्हाळा जाऊं देऊं नये ! या खटपटीकरितां आणखी एकदोन महिने तुम्हांला विलायतेंत राहावें लागेल त्यानंतर तुम्हीं लगेच हिंदुस्थानास परत जावें. मग यश येवो कीं न येवो. जें करावयाचें तें केल्यावर मित्रऋणांतून तुम्ही मुक्त झालां. गीतेच्या उपदेशाप्रमाणें माणसानें फक्त कर्म करावें. फलावर म्हणजे यश येईल

कीं अपशय येईल यावर त्यानें आसक्ति ठेवूं नये; कारण ती गोष्ट त्याच्या हातची नाहीं, ती दैवाच्या हातीं आहे! माझ्यापूर्वी किती तरी लोकांनीं प्रामाणिक मतें बोलण्याबद्दल शिक्षा भोगली आहे. आज मलाहि तशीच शिक्षा भोगावयाची असेल तर उपाय काय? पार्लमेंटमध्यें वेळोवेळीं प्रश्न विचारण्याची खटपट करून माझ्या सुटकेचा प्रश्न सरकारचे व लोकांचे डोळ्यांपुढें सतत जागता ठेवावा. मला त्याचा उपयोग न झाला तरी सर्वसाधारण रीतीनें या चळवळीचा देशाला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं.

मंडालेची हवा नागपूरइतकीच उष्ण आहे. या वर्षी एप्रिल व मे महिन्यांत सुदैवानें पावसाच्या एक दोन सरी पडल्या. त्यानें हवेंत थोडा थंडावा येऊन, उन्हाळा कसाबसा निभावला. तुरुंगाच्या मानानें माझी प्रकृति बरी आहे. मला पाहिजे तीं सर्व पुस्तकें येथें मिळाल्यामुळें, कित्येक वर्षांपूर्वीपासून संकल्पिलेले माझे ग्रंथ मी येथें स्वस्थपणानें लिहून काढणार आहें.

( मंडाले, ता. २९ मे १९०९ )

## पत्र २

अहमदाबाद श्रावण कृष्ण २

लोकमान्य टिळक महाराज

आपका खत मिला है. आपकी दिल सोझीसे मे अनुगृहीत हुआ हुं. मेरे स्वास्थ्यके लिये आप क्यों चिंतित न होंगे? ईश्वर कृपासे मेरी तबिअत अब ठीक है. बिछाना तो मै थोडे रोजतक नहि छोड सकुगा. बडा दर्द रहा था वह अभी शांत हुआ.

कॉंग्रेसमें मेरा आनेका बिलकुल इरादा है नहि, नरम दलकी संमेलनमें भी जानेका इरादा है नहि. मै देखता हूं मेरा अभिप्राय दोनोंसे विचित्र. आपको मैने बतला दिया है. मेरा मंतव्य है इस समय युद्ध की भरती मे हम अब जानेसे, लाखोंको लेजानेसे, हिंदुस्थान की बडी भारी सेवा कर सकते है, और हमारा साध्य-जो स्वराज्य है-उसकी प्राप्ती हम एकदम कर सकते है. मेरी इस राय मे आप और मिसीस बेझंट संमिलित नहि है. मै जानता हुं नरम दलवाले भी इस कार्य मे तीव्रतासे मषगुल नहि होंगे. यह तो एक बात रहि. मेरी दुसरी राय है मॅटग्यू चेम्सफर्ड योजना का तत्त्व

का ग्रहण करना और उस मे जो कुछ सुधारा हम चाहते है वह सुधारा साफ साफ बतादेना. और जो सुधारा हम बतलावेंगा उसका स्वीकार करने के लिये मरणपर्यंत लढना इस सूत्र का नरम दल स्वीकार नहि करेंगे यह तो स्पष्ट है. यदि आप और मिसीझ बेझंट स्वीकार करेंगे तोभि जिस तरहसे मै लढना चाहता हूं वैसा तो आप नहि लडोगे. मिसीझ बेझंटने कह दिया है की वह सत्याग्रही नहि है. आपने एक दुर्बलो का हथियार सत्याग्रह का स्वीकार किया है इस भ्रमणमें मै पडना नहि चाहता हूं. और आप दानोसे विमुख होकर कॉंग्रेस में आंदोलन करना नहि चाहता हुं. मेरे सूत्रपर मेरा आत्यंतिक विश्वास है, और मेरा यहभी मंतव्य है की यदि मेरी तपश्चर्या संपूर्ण होगी तो आप और मिसीझ बेझंट भी मेरा सूत्र का स्वीकार करेंगे. मै धैर्य रखसकता हूं.

नरम और गरम दल उस की थोडी बातो को छोडकर संमिलित होजाने की चेष्टा करे यह मुझको बिलकूल पसंद नहि है. देश मे दो पक्ष है. दोनों पक्षों की राय साफ साफ प्रजा को और राजा को बताने मे कुछभी हानी होगी ऐसा मे मानता नहि हूं. गरम दल और नरम दल को मिलाने की चेष्टा करना मुझको बिल्कुल पसंद नहि है. दोनो पक्ष दृढतासे उनकी राय राजा प्रजा की समक्ष रखेंगे तो बडा फायदा पोहुचेगा.

आपके कार्य मे प्रभु आपको साहाय्य हो ।

**मोहनदास गांधी**

[ ८ ]

## टिळक व बडे देशी लोक

आपल्या संपर्कानें बड्या देशी लोकांना त्रास होतो या गोष्टीची जाणीव टिळकांना नेहमीं असे, म्हणून ते त्यांना आपण होऊन भेटण्याचें टाळीत. "आम्हीं लोकसेवेचा पेशा घेतला त्यामुळें सरकारला अप्रिय झालों. त्या पेशाचा लाभ किंवा हानि ही आमची आम्हांलाच असलेली बरी. त्याचा त्रास ऊगीच लोकांना कां ? ज्याचे त्याचे मार्ग वेगळे असतात आणि असा-वेत. सरकारहि असें आहे कीं, वडाची साल पिंपळाला लावून भाइयावरचा

राग लोकांवर काढतें. म्हणून आम्ही आपले राजेरजवाडे व थोर लोक यांच्यापासून मुद्दाम दोन पावलें दूर राहतों " असें टिळक नेहमीं म्हणत. विशेष प्रसंगींच त्यांची व अशा लोकांची गांठ पडत असे, आणि टिळक आपल्याला भेटल्याचें त्यांना कौतुक वाटे. पण असे प्रसंग अर्थात् थोडे.

## सुरवातीचा ऋणानुबंध

टिळकांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला दाक्षिणेंतील संस्थानिकांचा व त्यांचा संबंध बराच आला, तो कांहीं शिवाजी स्मारकाच्या चळवळीमुळें व कांहीं कौन्सिल-निवडणुकीमुळें। पण १८९७ सालीं शिक्षा होऊन टिळक राजद्रोही ठरले तेव्हां तो संबंध सहजच तुटला. पुढें टिळकांशीं संबंध ठेवूं नये असा सरकारचा प्रत्यक्ष जाहीरनामाच १९१४ सालीं निघाला. पण त्यापूर्वीहि राजेरजवाडे, सरदार-जहागीरदार यांना सरकारची भीति मनांतुन वाटत होतीच. आधीं अशा लोकांची व टिळकांची कोणाला न कळत भेट होणें कठिण. कारण आमच्या इकडे अशा थोर लोकांना आपल्या लवाजम्याशिवाय बाहेर पडण्याची संवय नाहीं ! आणि हरून आल रशीदप्रमाणें वेष बदलून हिंडणें हें त्यांच्या कल्पनेंतहि कधीं येत नाहीं.

अशा लोकांची स्वारी म्हणजे चालतीबोलती जाहिरातच असते. पुण्यांत त्यांची व टिळकांची गांठ पडावी तर या सर्व लोकांवर सरकारची टेहळणी असे. आणि टिळकांच्या भेटीचा चुकून कोठें धागादोरा उमगला तरी त्याबद्दल विचारणें होऊन पोलिटिकल अधिकाऱ्याकडून नाखुषी प्रदर्शित करण्यांत येई. शिवाय राजेराजे लोकांत वैमनस्य असल्यामुळें, एकाचें वाईट दुसऱ्यानें सरकारच्या कानांवर घालण्याला टिळकच काय, पण टिळकांच्या मित्रमंडळींशीं संबंध, हा एक ठराविक विषय होऊन बसला होता. यामुळें ज्याला त्याला जपून वागावें लागे. कारण भिंत्यापाठीचा ब्रह्मराक्षस हा खऱ्यापेक्षां कल्पनेनेंच उभा राहतो.

## अिचलकरंजीकर व मिरजकर

श्रीमंत बाबासाहेब घोरपडे अिचलकरंजीकर, यांची अेक गोष्ट अशी सांगतात कीं, मध्यंतरीं, त्यांचें व कोल्हापूर दरबाराचें बनत नव्हतें यामुळें, ह्या चहाडीचा त्रास चुकविण्याकरितां ते पुण्यांत असतां लकडी पुलाकडे

जावयाचें तर निमित्त टाळण्याकरितां, नारायण पेठचा रस्ता वगळून सदाशिव पेठच्या रस्त्यानें जात ! पण वरील सामान्य सिद्धान्ताला निरनिराळे अपवादहि होते. उदाहरणार्थ, श्रीमंत बाळासाहेब मिरजकर यांचा टिळकांवर मनांतून फार लोभ. ते झाले तरी टिळकांना कारणाशिवाय भेटत नसत व भेटीचें कारण अर्थात् थोडेंच असावयाचें. पण प्रसंग असल्यास टिळकांची भेट घेण्याला, त्यांना आपल्या शहरांत येथूं देण्याला, त्यांनीं कधीं मागें घेतलें नाहीं. त्यांची वृत्तिच निस्पृह व स्वाभिमानी असल्यामुळें, त्यांनीं अेकदमच सरकारास सांगून टाकलें होतें कीं, " टिळक हे माझे जुने ऋणानुबंधी आणि वरच्या प्रतींतले अेक सभ्य गृहस्थ. माझा त्यांचा राजकारणी कांहींअेक संबंध नाहीं. पण चुकून कोठें भेटीचा संबंध आला, किंवा ते लोकांनीं बोलावल्यावरून माझ्या गांवांत आले, तर त्यांचा अपमान करण्यासारखें वर्तन मीं करणें हें माझ्या शीलाला कमी समजतों. तरी याबद्दल आपला राग नसावा. "

## करवीरकर शाहूछत्रपति

दुसरा सांगण्यासारखा अपवाद म्हटला म्हणजे स्वतः कोल्हापूरच्या महाराजांचा ! लहानपणीं टिळकांविषयीं त्यांच्या मनांत फार चांगला भाव होता. आपल्या पूर्वजांबद्दल त्यांना तुरुगवास घडला ही गोष्ट त्याना माहीत होती. पुढें पुढें वेदोक्त-प्रकरण, ब्राह्मणेतर चळवळ आणि वरिष्ठ राजकारण यांत जेव्हां महाराज विशेष लक्ष घालूं लागले, तेव्हां मात्र या तीनहि दृष्टींनीं टिळकांविषयीं त्यांच्या मनांत अप्रीति उत्पन्न झाली. वेदोक्तासंबंधानें महाराजांना वाटे कीं, " हें माझें घरचें व दरबाराचें काम आहे. यांत टिळकांनीं लक्ष कां घालावें ? माझ्या उपाध्याचें मी काय वाटेल तें करीन. त्याचें गाऱ्हाणें घेऊन तें जगप्रसिद्ध केल्यानें माझी बदनामी होते. " ब्राह्मणेतर चळवळीसंबंधानें टिळकांवर महाराजांचा राग. महाराजांची समजूत अशी कीं, टिळक हे ब्राह्मण्याचे कट्टे पुरस्कर्ते असून त्यांच्या बळावर ब्राह्मण्य थोडें बहुत जिवंत आहे. आणि वरिष्ठ राजकारणांत तर टिळक हे सरकाराचे शत्रु, म्हणून ते महाराजांचे शत्रु. सामाजिक बाबतींत लोकशाही अवतरावी असें महाराजांचें मत असलें, तरी राजकीय सत्ता म्हटली म्हणजे तेथें मात्र पुरी राजशाही किंवा नोकरशाही असावी, असा त्यांचा

सिद्धान्त असे. एकदां ते पुण्यास नाटक पाहण्यास गेले. रंगभूमीवर एका जुलमी राजाचें कथानक चालू होतें. तें रंगांत आलेलें पाहून महाराज जवळच्या माणसाजवळ मोठ्यानें उद्गारले कीं, 'याचें नांव राजा. राजा असावा तर असा!' टिळक हे सामान्य जनतेकरितां अधिकार मागतात ही गोष्ट त्यांना पसंत नव्हती. आणि "संस्थानी प्रजेची चळवळ करणारांना माझ्या राज्यांत पाठवा! म्हणजे मी त्यांना कसें काय आहे तें दाखवितों" असें ते म्हणत. या गोष्टींत त्यांचें व इंग्रज अधिकाऱ्यांचें एकमत असे. शिवाय आपल्या संस्थानांतील मांडलिक व सरदार यांना इंग्रज सरकारनें पूर्वी वेळोवेळीं तोडून दिलेले अधिकार काढून घेऊन, आपली अधिराज या नात्याची सत्ता महाराजांना संघटित करावयाची होती. हें घडून येण्याला सरकारची मर्जी आपणावर राहिली पाहिजे आणि आपणहि सरकारच्या कांहीं उपयोगीं पडलें पाहिजे असें बुद्धिपुरस्सर जाणून, सरकाराला तें आवडतें म्हणून, टिळकांचा मनांतुन द्वेष असे त्यापेक्षां बाहेर त्याचा बहाणा ते अधिक करीत. याकरितां प्रसंग असो नसो, टिळकांविरुद्ध ते इंग्रज अधिकाऱ्याकडे गुप्त पत्रें लिहीत, हें १९२१ च्या केसरींत त्यांच्या अंतस्थ पत्रांचें जें बाड प्रसिद्ध झालें होतें त्यावरून लोकांस कळूनच आलें.

ताईमहाराज प्रकरणांतहि असाच त्यांचा टिळकांशीं विरोध आला. कोल्हापूर सोडून बाहेरचा मुलगा दत्तक घेण्याचीं टिळकांचीं कारणें काय होतीं, याचें विवेचन टिळकचरित्रांतील त्या प्रकरणांत मीं केलेंच आहे. पण महाराजांना त्याचें काय? त्यांना टिळकांचा राग हाच कीं, कोल्हापूरच्या मुलावर टिळकांनीं बहिष्कार घातला त्यांत अप्रत्यक्ष रीतीनें आपल्यावर शिंतोडे उडाले! औरंगाबादकडील मुलाच्या दत्तकाला परवानगी देऊन उपकृत करण्यापेक्षां आपल्या शहरांतले, आपल्या गुरुघराण्यांतले, आश्रित व नर्मसुहृद् यांचें कल्याण झालें, तर तें महाराजांना इष्ट वाटणें स्वाभाविक होतें.

पण हें सर्व असलें तरी महाराज टिळकांची भेट घेण्याला कधीं ग्याले नाहींत. उलट भेटतील तितके त्यांना ते हवेचसे वाटत. आणि जेव्हां जेव्हां भेटीचा हा योग येई, तेव्हां तेव्हां ते त्यांच्याविषयीं किती आदरबुद्धी दाखवीत हें सांगतां पुरवत नाहीं. ते भेटीला आल्यास आपण उठून उभें राहाणें,

त्यांच्याशीं विनयपूर्वक बोलणें, त्यांना दारापर्यंत पोंचविणें, वगैरे गोष्टी ते करण्यास कधींहि चुकले नाहींत. 'केसरी' पत्र ते नेहमीं वाचवून घेत. आणि तिकडचा जो कोणी भेटेल त्याच्याजवळ टिळकांची नेहमीं स्तुतीच करीत. स्वतः महाराज बुद्धिवान् व कर्ते पुरुष असल्यामुळें टिळकांची बुद्धिमत्ता व त्यांचें कर्तृत्व यांची परीक्षा त्यांना मनांतून असे. आणि हा एकटा मनुष्य एवढ्या सरकाराशीं झगडतो याविषयीं ते कौतुकाचे उद्गार काढीत. टिळक मुंबईस आजारी पडलें तेव्हां त्यांनीं आपला मनुष्य बरोबर औषध देऊन मुद्दाम मुंबईस रवाना केला होता असें रा. बेळवी स्वतःच्या माहितीवरून सांगतात. आणि टिळकांच्या मृत्यूनंतर दुःखप्रदर्शक पहिली तार महाराजांची आली! पण हें सर्व सांगितल्यावर दुसरीहि एक गोष्ट सांगणें जरूर ती हीं कीं, टिळकांशीं अशा प्रकारचा वरोपचारी संबंध ठेवल्यानें स्वतःला कांहीं इजा होईल हीं भीतीच त्यांना नव्हती. कारण इतर रीतींनीं म्हणजे राजकारणांत टिळकांविषयीं त्यांची भावना निदान आचरण कसें होतें, ही गोष्ट सरकाराला पूर्णपणें माहीत होती.

## सयाजीराव महाराज

टिळकांचा ज्या आणखी एका मोठ्या संस्थानिकाशीं संबंध येई ते बडोद्याचे सयाजीराव महाराज गायकवाड. ते टिळकांना मनांतून फार मानीत. बापटप्रकरणीं टिळकांनीं आपल्या संस्थानावर, लहानसा कां होईना, पण उपकार केला असेंच त्यांना वाटे. वेदोक्ताचा खरा जन्म मूळ बडोद्यांतच झाला, पण त्यामुळें टिळकांना सयाजीरावांनीं, कोल्हापूरकर महाराजांप्रमाणें ब्राह्मणांचे पुरस्कर्ते असें मानलें नाहीं व त्यांचा द्वेषहि कधीं केला नाहीं. आपला पुण्यांतील वाडा त्यांनीं टिळकांना दिला तो अमुक एका उपकाराच्या फेडीकरितां असें मुळींच नाहीं. त्याची त्या वेळची सरकारी किंमत घेऊनच तो दिला. शिवाय त्या वाड्याला त्या वेळीं इतरांची मोठीशी मागणीहि नव्हती. पण आपली किंमत निघून जर सहजासहजीं टिळकांचें काम झालें तर तेंहि करण्याला भ्यावें इतके मात्र भित्र्या मनाचे सयाजीराव नव्हते. टिळकांच्याच सांगण्यावरून महाराजांनीं वासुदेवराव बापटांच्या मुलाला स्कॉलरशिप दिली. पण तोंहि उपकार बापटांवर होता, टिळकांवर

नव्हता. मुंबईस अस्पृश्यतानिवारक परिषद भरली त्या वेळीं सयाजीराव महाराज अध्यक्ष होते, व टिळक येऊन भाषण करणार ही गोष्ट त्यांना माहीत होती. त्यांच्या जागीं असा तसा दुसरा संस्थानिक असता तर तो हटकून भिता व हा प्रसंग टाळण्याची कांहीं तरी युक्ति करिता. सयाजीराव महाराजांनीं टिळकांशीं, ते एक विद्वान् व अनुभविक राजकारणी मनुष्य म्हणून, याहून अधिक संबंध हौसेनें ठेवला असता. पण या गोष्टींत त्यांनाहि त्यांच्या परीनें जाच होता.

## सरदार जहागिरदार

सरदार जहागिरदार वगैरेंचीहि हीच स्थिति. संस्थानिकांपेक्षां त्यांना जाच थोडा कमी. पण आपण बोलूनचलून लहान म्हणून ते आपल्या कर्माला भीत. तथापि इतक्यांतूनहि कामानिमित्त कोणी टिळकांना भेटावयाला आले तर त्यांच्या योग्यतेप्रमाणें जितका मानमरातब ठेवणें शक्य तितका टिळक ठेवीत व त्यांच्याशीं मुद्दाम अदबीनें वागत. जुनें घराणें म्हटलें म्हणजे त्याच्याबद्दल टिळकांच्या मनांत एक प्रकारें उपजत आदरबुद्धि असे. बरोबरीच्या माणसांशीं ते एक वेळ ताठरपणानें वागतील, पण अशा लोकांशीं ते फार जपून वागत.

## कै० बाळासाहेब होळकर, इंदूरकर

इंदूरचे महाराज श्रीमंत बाळासाहेब होळकर यांचें प्रकरण उपस्थित झालें. त्यांच्यासंबंधानें सरकाराकडे कांहीं तक्रारी गेल्यावरून इंदूरचा कारभार चालविण्याकरितां खंडेराव बेदरकरप्रभृतींचें एक मंडळ नेमलें व त्यावर सरकारानें देखरेख करण्याकरितां एक बडा युरोपियन कामगार नेमला. पण एवढ्यानें सरकारचें समाधान झालें नाहीं. ग्वाल्हेरच्या मेजवानींत लॉर्ड कर्झन यांनीं असें दर्शविलें कीं, इंदुरासंबंधानें आणखीहि कांहीं व्हावयाचें आहे ! कौन्सिल नेमल्यानें आपले अधिकार गेले म्हणून बाळासाहेब होळकर नाखूष झाले ही गोष्ट खरी. आणि त्यांच्या तऱ्हेवाईक स्वभावाप्रमाणें ते वाटेल तेव्हां वाटेल तिकडे जात येत असत हीहि गोष्ट खरी. परंतु "हा त्यांच्या तऱ्हेवाईक स्वभावाचा प्रकार असें न मानतां असंतोष व बेदिली यांचाच प्रकार आहे, सरकाराविरुद्ध ते कट करीत असतात वगैरे

बातम्यांवर विश्वास ठेवून त्यांच्यावर लॉर्ड कर्झन यांनीं शस्त्र धरलें, कौन्सिल नेमलें ", व कौन्सिलावर युरोपियन कामगार नेमला, या गोष्टीचा टिळकांनीं वेळींच निषेध केला. टिळकांचें म्हणणें असें कीं, राज्यांत वजनदार व जुनाट अशा ज्या संस्था असतात त्यांना निवडणुकीचा अधिकार देऊन त्यांनीं निवडलेल्या मुत्सद्द्यांचें मंडळ बनावें. आणि असें सरकारनें ठरविलें तर राजेरजवाड्यांचा अपमान होणार नाहीं व संस्थानी प्रजेवर केव्हां केव्हां येणारें जुलमाचें व कुराज्यव्यवस्थेचें संकट टळेल.

असो; पुढें बाळासाहेब होळकर यांना सरकारनें पदच्युत केलें आणि त्यांच्याकडून गादीचा राजीनामा सक्तीनें घेतला. यावर टीका करण्याचा प्रसंग टिळकांना आला. १९०३ सालीं फेब्रुवारी महिन्याच्या प्रारंभीं बाळासाहेब होळकर यांचा सक्तीचा राजीनामा झाला, तो होणार म्हणून टिळकांना आधीं गुणगुण लागली होती. तारीख २७ जानेवारी १९०३ च्या केसरींत, राजेरजवाड्यांच्या भावी स्थितीसंबंधानें टिळकांनीं अग्रलेख लिहिला, त्यांत या स्थितीचें समग्र पर्यालोचन करून त्यांनीं असें सुचविलें होतें कीं, " हिंदी संस्थानिक, राजेरजवाडे, किंवा मोठमोठे जमीनदार यांचा उपयोग सरकारला सार्वभौम राज्यव्यवस्थेच्या कामीं करून घ्यावासा वाटल्यास तो खुशाल करून घ्यावा. आळशी बनून राहण्यानें त्यांचेंहि कल्याण नाहीं. पण यांचा उपयोग करून घ्यावयाचा तर कर्तेपणाचे अधिकार देऊनच तो करून घ्यावा. आणि असें केल्यानेंच देशांतील कर्त्या पुरुषांची परंपरा कांहीं तरी कायम राहील. दिल्लीदरबारानें एक मोठी गोष्ट केली ती ही कीं, दरबारला बोलावलेल्या राजेरजवाड्यांना आपण वस्तुतः किती क्षुद्र आहों याची जाणीव करून दिली ! घरच्या संस्थानांत हे कोठें बाहेर पडले कीं हत्तीच्या पायाखालीं वेलदोडा चिरडूं न देण्याइतका बंदोबस्त ठेवतात. पण दिल्लीला कर्झनशहांच्या हत्तीमागून आपण उन्हांतून मिरवत गेलों, किंवा मिरवणूक पाहण्याला उन्ह खात उभे राहिलों, ही स्थिति पाहून शहाण्या राजेरजवाड्यांच्या मनांत स्वतःच्या स्थितीविषयीं एकवार तरी चांगलाच प्रकाश पडला असेल. संकटकाळीं ऋणानुबंध जोडून, स्नेह्याप्रमाणें अखंड वागविण्याचा ज्यांच्याशीं करार केला, त्यांना आपल्या मिरवणुकींत उंची पोशाख

आणि मौल्यवान् दागिने घातलेल्या मनुष्य-चित्रांची खूप गर्दी दिसावी म्हणून कर्झनशहा यांनीं वेठीला धरून ओढलें. तेव्हां हा आपला ' मान ' झाला असें कित्येकांना वाटलें असलें तरी हा आपला ' अपमान ' झाला असेंहि इतर कित्येकांना वाटलें, व त्या दिवसापासून ते मनांत जळूं लागले ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. पण जखमेंत मीठ भरावें त्याप्रमाणें राजेरजवाड्यांचा असा नुसता अपमान करूनच सरकार थांबलें नाहीं. तर त्यांचे अधिकारहि हिरावून घेण्याचा सपाटा पूर्वीहून अधिक जोरानें त्यांनीं सुरू केला."

राजेरजवाड्यांना आपल्या खऱ्या स्थितीची जाणीव व्हावी हें टिळकांना इष्ट वाटलें तरी, इंग्रज सरकारची सत्ता व वैभव वाढलें म्हणून संस्थानिकांचे जुने हक्क नाहींसे होण्याचें कारण नाहीं असा टिळकांचा मुख्य मुद्दा होता. मांडलिक म्हटले तरी त्यांचींहि संस्थानें आहेत, राज्यें आहेत, प्रजा आहे. तिला सुराज्यव्यवस्थेची जरूर आहे. प्रजा सुखी व संतुष्ट राहून हीं छोटीं राज्यें कायम राहिलीं पाहिजेत. हें सर्व घडून यावयाचें तर, संस्थानिक व राजेरजवाडे यांना केवळ आपल्या वरातींत कोतवाली घोड्याप्रमाणें न मिरवितां, त्यांना मोठे हुद्दे व अधिकार सरकारनें दिले पाहिजेत, व काम शिकविलें पाहिजे. राजेरजवाडे हे एक प्रकारचे नैसर्गिक पुढारी होत. म्हणून ते आपल्या बाजूला वळवून आपले हितचिंतक बनविल्यास राजकीय चळवळीला उलटा शह दिल्यासारखें होईल, असा मुत्सद्दीपणाचा डाव सरकार मनांत आणील तर त्याला वावगें म्हणतां येणार नाहीं. पण राजेरजवाड्यांनीं स्वतःला, किंवा सामान्य जनतेनें त्यांना, अभिजात पुढारी मानण्याला आधीं त्यांचा योग्य मानमरातब व त्यांचे स्वतंत्र राज्याधिकार शिल्लक राहिले पाहिजेत, असें टिळकांचें आग्रहाचें म्हणणें होतें. तेजोभंग झालेला, अपमान पावलेला, किंवा स्वतःला निर्माल्यवत् मानणारा कोणता संस्थानिक हें पुढारीपण गाजवूं शकेल ?

१९०३ च्या दरबारानंतर लवकरच काश्मीरच्या महाराजांना लॉर्ड कर्झनसाहेबांकडून जाच झाला. पन्नाच्या महाराजांची चौकशी झाली. वऱ्हाड खालसा करून देण्याच्या सूचना निजामाला करण्यांत आल्या. होळकरांची

बडतर्फी झाली. पंजाबांतील संस्थानिकांच्या डोक्यावर सरकारी दिवाण नेमण्याची खटपट झाली. काठेवाडांतील बिलका संस्थानाच्या अधिपतींची उचलबांगडी झाली—वगैरे गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे, एवढा दरबार भरविला तरी संस्थानिकांना कांहीं अधिकार नवीन देण्याचें तर राहिलेंच, पण जुने काढून घेण्याचा कर्झनसाहेबांचा हेतु होता असें दिसतें अशी टीका टिळकांनीं केली.

१९०३ फेब्रुवारी महिन्याच्या प्रारंभीं होळकरांचा राजीनामा झाला. या कामीं कर्झनसाहेबांनीं कपट केलें. सक्तीनें राजीनामा घेऊन तो खुशीचा असें लोकांना भासविलें. या मुद्द्यावर टिळकांनीं जोराची टीका केली. दरबारांत आनंदानें मुलाला गादीवर बसवून होळकर गादीला रामराम करून बाहेर पडले नाहींत, तर अपमानाच्या दुःखानें लाल होऊन मनांतून सरकारला शिव्या देत देत त्याच दिवशीं संध्याकाळीं इंदुराहून बढवाईला निघून गेले! टिळकांचें म्हणणें असें कीं, एवींतेवीं कौन्सिल नेमून कारभार चालविला होता तर वरती राजीनामा घेण्याचें कारण नव्हतें. नुसत्या लेखी हुकुमानें संस्थानिकाला पदच्युत करणें हा अपमान होय. त्याचा प्रतिकार स्वतः होळकरांनीच काय पण इतर संस्थानिकांनीं मिळून करावा असेंहि टिळकांनीं सुचविलें. आणि हल्लींचें उदाहरण पाहून शिंदे, गायकवाड, कोल्हापूरकर, निजाम यांनीं वेळींच सावध होऊन आपल्या हक्कांची शहानिशा करून घ्यावी असा टिळकांनीं इशारा दिला!

बाळासाहेब होळकर पदच्युत होऊन बढवाईस पेन्शन घेऊन राहिले. परंतु ते मनांतून जळत असल्यामुळें, आणि स्वभावानें बेफिकीर व बेसावध असल्यामुळें, ते इंग्रज सरकाराविरुद्ध पुष्कळ वेळा प्रगट उद्गार काढीत, लॉर्ड कर्झन यांना शिव्या देत, व लहरीप्रमाणें बाहेरगांवीं अभावितपणें हिंडत-फिरत. यामुळें त्यांची सहानुभूति वाटून कर्झनसाहेबांचा सूड घ्यावा असें त्यांच्या अंकितांपैकीं कित्येकांना वाटणें शक्य होतें. पण असल्या गोष्टी जितक्या बोलण्यांत येतात तितक्या कृतींत उतरत नाहींत. आणि ' बोलेल तो करील काय ' ही म्हण अशा लोकांवरूनच पडलेली आहे. परंतु होळकरांच्यामागें गुप्त पोलिसांचा ससेमिरा होता. आणि गुप्त पोलिसांचें ठाणें

बसलें म्हणजे त्यांतून पुष्कळच वेळां न घडलेल्याहि गोष्टी बाहेर येतात व न केलेलेहि कट प्रकट होतात ! बहुधा अशाच रीतीनें पुढें एक मुकदमा उपस्थित झाला. त्यांत आगरकर या नांवाचा एक पुण्याकडील तरुण मुलगा आरोपी असून, त्याच्यावर लॉर्ड कर्झन यांचा खून करण्याचा आरोप करण्यांत आला होता असें म्हणतात ! कटाची नवलकथा अशी होती कीं, लॉर्ड कर्झन हे इंदूरकडे आले असतां वाटेंत नर्मदा नदीवरचा पूल, त्यावरील लॉर्ड कर्झन बसलेल्या आगगाडीसह, स्फोटक द्रव्यानें उडवून द्यावयाचा ! अेवढें अघोर कृत्य घडून येण्याला त्याची पूर्ण तयारी व रचना तशीच कांहीं विशेष असावी लागणार. पण पोलिसतपासांत त्याहि गोष्टीला कमी पडलें नाहीं ! पुलाचे नकाशे, त्याच्या पायाखालीं सुरुंग भरून त्याची डांबरबत्ती दूरवर नेऊन तेथून ती पेटवून उडविण्याचे नकाशे, वगैरे सर्व कांहीं जय्यत तयारी झाली ! या तयारींत मनुष्यबळाची तयारी ही मुख्य. आणि सुरुंग उडविण्याची डांबरबत्ती शेंकडों फूट लांब असली तरी, ती बढवाओच्या असपासच असणार. पण 'चिथावणी'ची डांबरबत्ती पुण्यास टिळकांसारख्या गृहस्थांपर्यंत पोंचण्यासारखी लांब वळतां येणें शक्य होतें. ती तेथपर्यंत अखेर पोंचली नाहीं. पण आगरकर यांना वीसबावीस वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा निरनिराळ्या अपराधांची बेरीज करून, देण्यांत आली. आगरकर हे तुरुंगांत असल्यावेळीं पुण्याचे कै. डॉक्टर लोहोकरे तुरुंगावर डॉक्टर होते, व ते बाळासाहेब होळकरांविषयीं मोठ्या गमतीच्या गोष्टी सांगत. त्यांपैकीं कित्येक प्रस्तुत लेखकानें स्वतः त्यांच्याकडून ऐकलेल्या आहेत.

## संस्थानिकांचे हक्क

सन १९०० च्या ऑगस्ट महिन्यांत संस्थानिकांच्या हक्कासंबंधानें दोन महत्त्वाचे सरकारी ठराव प्रसिद्ध झाले. पहिला भरतपूरच्या महाराजांना पदच्युत करण्याविषयीं, आणि दुसरा हिंदी राजेरजवाड्यांनीं विलायतेला किंवा परदेशाला जाण्याविषयीं. पैकीं भरतपूरच्या महाराजांनीं आपल्या हुजऱ्याला विनाकारण गोळी घालून ठार मारलें असें पुराव्यानें सिद्ध झाल्यामुळें, झाली शिक्षा ही योग्य झाली असाच अभिप्राय टिळकांनीं दिला. कारण राजे-

रजवाड्यांविषयीं टिळकांना सहानुभूति असली, तरी त्यांना गुन्हे करण्याची मोकळीक असूं नये, प्रजेच्या दृष्टीनें त्यांच्यावर नियंत्रण पाहिजे, असें टिळकांनीं दर्शविलें. दुसऱ्या ठरावासंबंधानें टिळकांनीं असा अभिप्राय दिला कीं, "संस्थानिकांवर परदेशीं जाण्याबद्दल व तेथें बेसुमार खर्च करून राहण्याबद्दल निर्बंध असणें हीं संस्थानी प्रजेच्या हिताचीच गोष्ट होय. तथापि व्यापारी मनुष्याला परदेशीं वाटेल तेव्हां जातां येतें तशी मोकळीक संस्थानिकांनाहि राहावी, नाहीं तर त्यांच्या हक्काला बाध येतो" असा अभिप्राय टिळकांनीं दिला. "धड राजा ना धड प्रजा" अशी राजेलोकांची स्थिति आहे, आहे तिचाहि उत्तरोत्तर संकोचच होत चालला आहे, आणि असल्या मळमळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरें, असेंहि कित्येकांना वाटण्याचा संभव आहे, या टिळकांच्या शब्दांवरून राजेरजवाड्यांची सहानुभूति टिळकांना किती होती हें उघड होईल.

संस्थानिकांच्या तरुण पिढीला शिक्षण मिळावयाचें तें कसलें मिळावें याविषयीं टिळकांचीं मतें निश्चित होतीं, आणि त्यावरूनहि या वर्गासंबंधाची त्यांची सहानुभूति व अभिमानबुद्धि दिसून येते. सन १९०० च्या नोव्हेंबर महिन्यांत लॉर्ड कर्झन यांनीं राजकोट येथें राजकुमार कॉलेजांतील विद्यार्थ्यांना उद्देशून एक भाषण केलें. राजकुमारांनीं अंतर्बाह्य इंग्रज बनूं नये असा स्वतः प्रिन्सिपाल वॉडिंग्टन यांचा कटाक्ष होता, व कर्झनसाहेबांनींहि तें तत्त्व मान्य केलें. पण टिळकांनीं त्यावर अशी टीका केली कीं, "अल्पवयापासून राजकुमारांना युरोपियन शिक्षकच जर ठेवला, आणि इंग्रजी चालीरीति, इंग्रजी भाषा, विद्या, यांच्या खड्या पाहऱ्यांतच जर राजपुत्रांचेंहि बाल्य व तारुण्य जाईल असा बंदोबस्त ठेवला तर, राजकुमार अंतर्बाह्य इंग्रजच बनणार ! दिवसभर शिक्षण विदेशी ठेवून, एखाद्या बक्षिससमारंभाच्या प्रसंगीं मात्र, 'तुम्ही राष्ट्रीयत्व सोडूं नका' असा उपदेश करून चालवयाचें नाहीं." त्याहि जुन्या काळीं युरोपियन शिक्षक ठेवल्यामुळें नासलेल्या राजकुमारांचीं उदाहरणें टिळकांच्या डोळ्यांपुढें होतीं आणि पुढील सत्तावीस वर्षांत तीं कमी न होतां उलट वाढलींच होतीं. "कित्येक संस्थानिकांना तर आपल्या मुलांच्या आया, दाया, संवगडी, खेळगडी, हे

गोऱ्या कातडीचे असल्याशिवाय चालतच नाहीं; व या पद्धतीचे परिणाम किती वाईट होतात हें दिसून आलेलेंच आहे."

काठेवाडांत याच सुमारास लॉर्ड कर्झन यांनीं एक भाषण केलें. त्याला उद्देशून टिळकांनीं अशी टीका केली कीं, "देशी राजेरजवाड्यांचा उपयोग सरकारानें साम्राज्याच्या कामीं करून घेणें हें ठीकच आहे. पण बुद्धिमत्तेच्या जोरावर मोठमोठ्या हुद्द्यांच्या जागा सरकार राजेरजवाड्यांना मिळवूं देत नाहीं. त्यांच्या कर्तृत्वाला संस्थानांच्या हद्दींत नुसतें डाबून ठेवलें जातें. इतकेंच नाहीं, तर तेथेंहि कारभाराच्या मोठ्या जागांवर युरोपियन नेमले जातात. पण साम्राज्यांतील कर्तृत्वाचे अधिकार राजेरजवाड्यांना न देतां, तुम्ही साम्राज्याचे आधारस्तंभ आहां असें तोंडदेखलें बोलणें, म्हणजे तुळई-खालीं चिकटविलेल्या सोनेरी चित्राला तुळईचें ओझें तुझ्यावरच आहे असें सांगण्यासारखें हास्यास्पद होय!" मुसलमानी साम्राज्यांत हिंदु सरदारांना काबूल-कंदाहारचे सुभेदार होतां येत होतें, आणि मराठी साम्राज्यांत तोफखान्याचा कारभार मुसलमानांकडे होता, ह्या गोष्टीची मार्मिक आठवण टिळकांनीं या प्रसंगीं सरकाराला करून दिली.

## संस्थानिकांचें शिक्षण

मुंबई इलाख्यांत सरदार व जहागिरदार यांच्या मुलांसाठीं एक स्पेशल कॉलेज काढण्याचा सरकाराचा विचार सरदारांच्या वार्षिक दरबारांत जाहीर करण्यांत आला. तेव्हां टिळकांनीं त्यावर अशी टीका केली कीं, "ह्या कॉलेजांत सामान्य प्रतीचें शिक्षण मिळावयाचें असेल, आणि केवळ श्रीमंतांचीं मुलें गरिबांच्या मुलांपासून वेगळीं राहून त्यांनीं शिक्षण मिळविलें पाहिजे एवढाच हेतु या कॉलेजाचा असेल, तर असलें कॉलेज नको. कारण त्यामुळें योग्य शिक्षण न मिळतां फक्त कृत्रिम भेदभाव मात्र उत्पन्न होईल."

उत्तर-हिंदुस्थानांतील बुंदेलखंड प्रांतांत पन्ना नांवाचें संस्थान पांच लक्ष उत्पन्नाचें आहे. तेथील महाराजांवर आपल्या चुलत्याला विषप्रयोग करून मारल्याचा आरोप आला. त्याची चौकशी होण्याकरितां कर्झनसाहेबांनीं एक कमिशन नेमलें. त्यांत सर्व युरोपियन अधिकाऱ्यांची नेमणूक झाली. या संबंधानें टिळकांनीं असें लिहिलें कीं, "कमिशन नेमण्याची ही पद्धति राजे

लोकांना कमीपणा आणणारी आहे. विलायतेंत एखाद्या उमरावानें गुन्हा केला, तर त्याची चौकशी त्याच्या बरोबरीच्या लोकांपुढेंच व्हावी असा नियम आहे. आमच्या संस्थानिकांना हा मान कां असूं नये ? लॉर्ड रसेल याच्या-वर दोन लग्नें केल्याचा आरोप नुकताच आला होता. तेव्हां त्याची चौकशी हाऊस ऑफ लॉर्डस् पुढेंच झाली. इकडेहि सामान्य गोऱ्या सोल्जराचा इन्साफ व्हावयाचा असेल, तर त्यालाहि गोऱ्या लोकांची ज्यूरी मागण्याचा हक्क असतो. मग आमच्या संस्थानिकांना तो हक्क कां असूं नये ? ”

‘ नाअिन्टीन्थ सेंचरी ’ मासिक पुस्तकाच्या जानेवारीच्या अंकांत, श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं ‘ युरोप व हिंदुस्थान यांमधील आपला नित्य-क्रम ’ या विषयावर एक लेख लिहिला होता. लॉर्ड कर्झन यांनीं युरोपांत प्रवास करणाऱ्या व जाऊन राहणाऱ्या संस्थानिकावर जी प्रच्छन्न टीका केली होती, तिला हें उत्तर होतें. स्वतःच्या नांवावर, पुढें होऊन, व्हाईस-रॉयसाहेबांना उत्तर दिल्याबद्दल टिळकांनीं महाराजांचें अभिनंदन केलें. पण नेहमीं युरोप खंडांत राहणें किंवा फेरी करणें या गोष्टीचें महाराजांनीं सम-र्थन केलें, त्याविषयीं टिळकांनीं अमान्यता दर्शविली. “ चारपांच सफरी करण्यापूर्वीं युरोप खंडांत हिंदी विद्यार्थी पाठविण्याचें तत्त्व महाराजांना कळलें असतें तर अधिक बरें झालें असतें. महाराजांनीं विद्यार्थी पाठवि-तांना आकुंचित दृष्टि ठवली होती. त्यांनीं जपानाचे राजे, सरदार लोक, यांचें अनुकरण करावें. अलौकिक शिक्षणाच्या मोठमोठ्या संस्था हिंदु-स्थानांत स्थापाव्यात. गयकवाड सरकार बुद्धिमान असतां त्यांचा बराचसा काळ युरोपांतील सफरीचा छन्द पुरविण्यांत गेला असें म्हणणें भाग पडतें. राजपुत्रांनीं विलायतेंत शिक्षण घेण्याला जावें असें महाराजांनीं लिहिलें. पण अल्पवयांत पूर्वसंस्कारहीन पाठविलेलीं मुलें, तीं वरील गुणांच्या ऐवजीं पोषाकादि बाह्य विचारांचें अनुकरण अधिक करतील. निदान अल्पवयांत तरी मुलांना विलायतेंत पाठविणें योग्य नाहीं. विलायतेंत खाण्यापिण्याच्या सुधारणेला अधिक वाव मिळतो हें खरें. पण स्वतःच्या जातीच्या लोकांचा मिलाफ कसा राखावा हें हिंदी राजांना तिकडे अधिक कळण्यासारखें नाहीं. जुन्या वळणाच्या व्यवस्थेची घडी जर नव्या पद्धतीनें बसण्यासारखी

असेल, तर ती संस्थानिकांकडूनच बसू शकेल. सयाजीराव यांनीं राज्यांत पुष्कळ सुधारणा केल्या आहेत. आणि अधिकार व विद्वत्ता यांचा अपूर्व संयोग त्यांच्या ठिकाणीं प्रथम पाहावयास मिळतो, म्हणून आम्ही अशी टीका प्रांजलपणें करतों" असें टिळकांनीं लिहिलें आहे.

## दत्तकाचा हक्क

१८९३ सालीं जत संस्थानामध्यें दत्तविधान होण्याच्या पूर्वीं मुलगा राज्याच्या गादीवर बसविण्याचा समारंभ झाला. हिंदु-धर्मशास्त्राप्रमाणें प्रत्येक हिंदूला जे हक्क आहेत ते संस्थानिकांनाहि आहेत. तेव्हां आपल्या-मागें आपल्या पत्नीनें मुलगा दत्तक घेऊन गादी चालवावी असा अधिकार तिला ठेवणें योग्य आहे. पण संस्थानें हीं संस्थानिकांची मिळकत नसून सरकाराचीं आहेत, तीं वाटेल त्याला वापरण्याला देण्याचा अधिकार सर-काराचा आहे, गादीवर बसविलेल्या मुलाला राजाच्या विधवा राणीनें वाटेल तर दत्तक घ्यावा, आणि राज्याधिकार व पिंडदान यांचा मेळ बसल्यास बसवावा, अशी सरकारानें पाळी आणली, या गोष्टीचा टिळकांनीं निषेध केला.

सन १८९९ च्या डिसेंबरांत मिरजमळा संस्थानाच्या गादीवर श्रीमंत बाबासाहेब यांना बसविण्यांत आलें. पण त्यांचें दत्तविधान होण्यापूर्वीच सरकारानें त्यांना गादीवर बसविलें आणि मग दत्तविधान झालें. आणि जे गादीवर बसविण्यांत आले ते त्या वेळीं औरस किंवा दत्तकपुत्र नव्ह-तेच, पण जवळचे वारसहि नव्हते. अर्थात् सरकारानें त्यांना पाहिजे तो एक मुलगा उचलला व गादीवर बसविला, आणि मग गादीच्या जुन्या राजाचा तो दत्तकपुत्र झाला! या गोष्टीचा टिळकांनीं निषेध केला. १८६२ सालीं लॉर्ड कॅनिंग ह्यांनीं संस्थानिकांना अभिवचन दिलें तें असें—"तुमचा दत्तक मान्य केला जाईल." याचा अर्थ तुम्ही जो दत्तक घ्याल तो आम्ही गादीवर बसवूं असा सरळ आहे. पण सरकारनें "तुमचा" या शब्दाचा अर्थ "तुम्ही हयात असतांना घेतलेला" असा केला. हा अर्थ नसून अनर्थ होय. कारण पुष्कळ वेळां मुलगा बापाच्या मरणोत्तर आईला दत्तक घ्यावा लागतो. पण दत्तकाचा अधिकार दिला असें तर दाखवावयाचें, आणि त्यांतहि कांहीं तरी हातचा ठेवावयाचा, असें सरकारचें धोरण असतें.

पुढें कांहीं दिवसांनीं सांगली संस्थानांतहि हीच गोष्ट घडली. तेथेंहि नवीन संस्थानिक सरकारानें आधीं गादीवर बसविला आणि मग दत्तविधान झालें. याही गोष्टीचा योग्य निषेध टिळकांना करावा लागला.

१९०३च्या जून महिन्यांत सांगली संस्थानाच्या गादीवर श्रीमंत भाऊ-साहेब यांना बसविण्याचा समारंभ झाला. या समारंभासंबंधानें लिहितांना टिळकांनीं पोलिटिकल अेजंट कर्नल फेरीस यांचीं कांहीं गैरमाहितीचीं विधानें खोडून काढलीं होतीं. "सन १८३४ च्या सुमारास अप्पासाहेब सांगलीकर यांच्याकडे इंग्रज सरकारानें दत्तकाबद्दल नजराण्याचें मागणें केलें होतें. अप्पासाहेबांनीं वर लिहिलें कीं, नजराणा देण्याची आमची चाल नाहीं. पेशवे सरकारासहि आपण कधीं नजराणा दिला नाहीं. करितां नज-राणा न घेतां आपल्या सुनेनें घेतलेला दत्तक मंजूर करावा." त्याप्रमाणें कंपनी सरकारानें दत्तक मंजूर केला. तसेंच हल्लीं "भाऊसाहेब यांस सांगली संस्थानाचे अधिपति निवडले आहेत" असा शब्द कर्नल फेरीस यांनीं योजला. त्याचाहि निषेध टिळकांनीं केला. यांत अेक नवीन आक्षेपार्ह तत्त्व सरकारनें घुसडून दिलें आहे. दरबार भरवून असलें जुलमाचें तत्त्व असहाय अशा संस्थानिकांना अैकविणें हें उचित नाहीं. या निवडणुकीच्या तत्त्वाचा अलीकडे सुळसुळाट झाला असून, अक्कलकोट, जत, मिरजमळा येथेंहि याच तत्त्वाचा उपयोग सरकारानें अनधिकारानें केला. उलट राणीच्या जाहिर-नाम्यांत राजेरजवाड्यांचा अधिकार पूर्वीचा आम्हीं मानूं व गादी निरंतर चालवूं, आणि हिंदुधर्मशास्त्र व जातीचा आचार यांना अनुसरून संस्था-निक जो दत्तक घेतील तो मंजूर व कायम करूं, अशी सरकारनें इच्छा प्रगट केली आहे इत्यादि गोष्ट टिळकांनीं वाचकांच्या नजरेस आणल्या. भाऊसाहेब यांचा संबंध पूर्वींचे संस्थानाधिपति तात्यासाहेब यांच्याशीं नसून स्वतंत्र होता हेंहि दर्शविण्यांत आलें. "गादीवर बसवावा एक व तो दत्तक म्हणून मान्य न व्हावा, असा प्रकार या नवीन तत्त्वामुळें संभवतो. तसें झाल्यास संस्थानिक घराणें व त्याचा वारसा आणि गादी व गादीनशीन संस्थानिक हीं वेगवेगळीं होतील."

## संस्थानी प्रजेचे हक्क

लो० टिळकांच्या हयातींत त्यांना प्रायः प्रसंग आले ते, संस्थानिकांची बाजू घेऊन, केसरींतून इंग्रज सरकारशीं भांडण्याचे. तेव्हां संस्थानी प्रजास्वातंत्र्याची चळवळ जोरांत आली नव्हती. कारण संस्थानांतली ही चळवळ, खालसा मुलखांतील प्रजास्वातंत्र्याच्या चळवळीच्या पावलावर पाऊल ठेवून, पण भीत भीत सावधपणानें, चालणारी आहे व तें स्वाभाविक आहे. तथापि ब्रिटिश सरकारशीं संस्थानिकांच्या वतीनें टिळक झगडत तसेंच संस्थानी प्रजेच्या वतीनें संस्थानिकांशीं झगडावें हें तत्त्व टिळकांना मान्य होतें. संस्थानी प्रजेच्या चळवळीचा उगम प्रथम कोल्हापुरांतच १९०६-७ सालीं झाला. त्यासंबंधीं ता. १२ मार्च १९०७ रोजीं कोल्हापूरच्या ने. ज. लायब्ररीमार्फत श्रीशिवाजी थिएटरमध्यें टिळकांचें व्याख्यान झालें, त्याचा एक उतारा याखालीं देतों त्यावरून कळून येईल—

टिळक म्हणाले—"आज सर्वत्रैव लोकांच्या मनांत ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांसंबंधीं मी बोलणार आहें असें समजूं नका. आजचा विषय देशीविदेशीचा, जहाल पक्षाचा नाहीं. तर कोल्हापूरच्या ' लोकप्रतिनिधि ' सभेसंबंधीं बाहेरच्या ( कोल्हापूरबाहेरच्या ) लोकांचे विचार काय आहेत हें उघडपणें सांगण्याचा आहे. हा विषय कमी महत्त्वाचा, अगर फक्त कोल्हापूर प्रांतांतील लोकांनींच विचार करण्याचा, नसून ब्रिटिश मुलखांतील लोकांनींसुद्धां विचार करण्यासारखा आहे. ब्रिटिश सरकार सार्वभौम राजे असल्यामुळें संस्थानिक हे सुद्धां त्यांची प्रजा आहेत, आणि संस्थानची प्रजा ब्रिटिश सरकारची नातप्रजा होते असें म्हटलें तरी चालेल. यंदांच्या राष्ट्रीय सभेमध्यें बहिष्कार वगैरेसारखे जरी दोन-तीन वादग्रस्त प्रश्न होते तरी **कांहीं वर्षांनीं तरी संस्थानच्या व्यवस्थेच्या कामीं राष्ट्रीय सभेस हात घालावा लागेल.** इंग्रजी शिक्षणाच्या योगानें नवीन पिढीच्या मनांत फरक पडत चालला आहे व त्यांस असें वाटण्यास लागलें आहे कीं, आपला कारभार आपण पाहावा व ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे. राज्य करण्यास योग्य असें शिक्षण झाल्यावर जर महाराजांस मुकत्यारी देण्याचें दोन वर्षें पुढें ढकललें तर त्यांस बरें वाटेल काय ? जी गोष्ट त्यांची तीच प्रजेची.

"पूर्वीचे पेशवे सरकारचे ठिकाणीं हल्लीं ब्रिटिश सरकार आहे. पेशव्यांनीं शिंदे, होळकर, गायकवाड यांस जे मुलूख तोडून दिले, ते त्यांनीं केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा इतमाम चालावा म्हणून दिले. प्रत्येक संकटाच्या कामीं त्यांची पेशवे सरकारास मदत होत असे. त्यांना आपल्या संस्थानापुरता कारभार पाहण्याचा नसून, पेशवे सरकारचें राज्य ज्या ज्या ठिकाणीं होतें त्या सर्व ठिकाणचें हिताहित पाहण्यास लागत असे. हल्लींच्या आमच्या ब्रिटिश-सरकारचें राज्यधोरण कांहीं निराळेंच. त्यांनीं संस्थानिकांचे सर्व भाग तुटक करून ठेवले आहेत. लीवार्नर साहेबांच्या 'नेटिव्ह स्टेट्स्' नामक पुस्तकांत या गोष्टीचा उलगडा केला आहे.

"कोल्हापूरचे राजावर प्रजेचा एक विशेष हक्क आहे तो हा कीं, राजा व प्रजा हीं एक जातीचीं आहेत. अस्सल मराठे आहेत. गायकवाडास गुजराथी लोकांवर, होळकरांस नेमाडी, आणि शिंद्यांस अन्य तऱ्हेच्या जातींवर, राज्य करावें लागत आहे. परंतु कोल्हापूरची स्थिति तशी नाहीं. राजा श्रीशिवाजीचे वंशजांपैकीं, राजाची व प्रजेची जात, धर्म आणि भाषा एक, यामुळें प्रजेच्या हिताकडे राजानें लक्ष दिलें पाहिजे.

"हल्लींचे सातवे एडवर्ड यांस जो राज्यकारभारांत हक्क आहे त्यापेक्षां हेनरी आठवा यास जास्ती होता. वरकरणी, मानमरातब जरी पूर्वीइतकाच आहे, खासगी खर्च, दान धर्म, एखाद्यावर मेहेरबानी करणें या सर्व गोष्टी पूर्वीप्रमाणेंच आहेत, तरी राज्यकारभार प्रजेच्या संमतीनें त्यांस पहावा लागतो. हें लोकशिक्षणाचें फळ होय. सदिच्छेनेंच कां होईना, पण दुसऱ्याचे घरची ढवळाढवळ करणें कोणास आवडणार नाहीं ! पण स्वतःचा कारभार चालविण्याइतकी अंगांत हिंमत आल्यावर दुसऱ्याचे तोंडाकडे पाहणें कोणास बरें वाटेल ! सातारचे राजे, पुण्याचे पेशवे, कालेंकरून नष्ट झाले. कोल्हापूरचें राज्य मोडकेंतोडकें कां होईना अजूनपर्यंत तरी शिल्लक आहे. म्हणून त्यास साजेल अशा तऱ्हेचे हितसंबंध प्रजेच्या कल्याणाकरितां संभाळण्यांत यावे.

"ब्रिटिश मुलखांतील लोक म्हणतील कीं, आमचे राज्यकर्ते विदेशी म्हणून त्यांच्यापाशीं आम्ही हक्क मागतों. असें म्हणावें तर रशियाचा राजा व

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

प्रजा एक जातीची असून त्यांच्यांत हक्कासंबंधीं वाद कां आहे ? चीन, जपान, अफगाणिस्थान, पर्शिया वगैरे आशियाटिक राज्यांत सध्यां राजा व प्रजा एक जातीची असतां प्रजेस विशेष प्रकारचे हक्क कां दिले जात आहेत ? या गोष्टींचा विचार राज्यकर्त्यांनीं करणें अवश्य आहे.

" नवीन जो पक्ष म्हणतात त्यापैकीं मी एक असल्यामुळें अशा साधारण गोष्टीनें माझी समाधानी होण्यासारखी नाहीं. ब्रिटिश मुलुखांत आम्ही खटपट करीत आहोंत त्यांत आम्हास श्रेय आल्यास, आम्ही तुम्हांस मदत करूं, व तुम्हांस आम्हांला मदत करितां आल्यास तुमचा आम्हास उपयोग होईल. आमचें सरकार सात समुद्रांचे पलीकडील व परधर्मी असल्यामुळें त्यांची समजूत घालून त्यांस वळविणें कालगतीचें. पण तुमचे राजे तुमच्या जवळ आहेत. तेव्हां त्यांस वळविणें फार सोपें आहे. घरांतील मनुष्याची समज जर तुम्हास काढतां येत नाहीं तर परक्याची काय काढाल ? प्रजेस महाराजांनीं कांहीं हक्क दिल्यास त्यांच्यावर ब्रिटिश सरकारची इतराजी होईल असें मुळींच वाटण्याचें प्रयोजन नाहीं.

" राष्ट्रीय सभा सुरू होऊन आज वीस वर्षें होऊन गेलीं. प्रथमारंभीं कित्येक आंग्लोइंडियन पत्रकारांस ही सभाच नकोशी वाटत होती. परंतु तिनें आतांपर्यंत कसाबसा जीव धरला तर त्यांत फाटाफूट व्हावी म्हणून हिंदु-मुसलमान यांचे तंटे लावून दिले. कोल्हापुरास लोकप्रतिनिधिसभा झाली. त्या वेळीं ब्राह्मण व मराठे यांच्यांत दुही माजवून दिली. या कामीं मराठे, जैन, मुसलमान यांची सहानुभूति नाहीं हें दाखविण्याकरितां लहान लहान सभा भरवून लोकसभेचा प्रतिकार करविला. या सर्व कल्पना शिळया आहेत. इतिहासाची पुनरुक्ति होत असते हें सर्वांस माहीत आहे. राज्यकर्त्यांचा व आमचा शिक्षक एकच, म्हणजे इतिहास ! त्याचे ज्ञानानें त्यांस अशा प्रकारचे अडथळे करावेसे वाटतात; परंतु त्याच ज्ञानानें आम्हांसहि शक्ति दिल्यामुळें आम्ही आशेवर बसून आहोंत. इतिहासांत ज्या ज्या प्रकारचे शेवट झाले तसें झाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. एका चित्पावन मनुष्यानें या सभेची मूळ कल्पना कोल्हापुरांत आणली असा मुंबईचे ' टाइम्स ' काराचा आक्षेप आहे; पण त्यास हें कसें सुचलें नाहीं कीं, याच

संस्थानचें नांव राखण्याकरितां अविश्रांत खटपट करणाराहि एक चित्पावन पत्रकर्ता होता !"

[ ९ ]

## लो. टिळकांचा राजकीय पक्षोपन्यास

कोणत्याहि कार्यक्षेत्रांत जेथें मत म्हणून आहे, तेथें मतांतर म्हणजे अन्य मतहि आहे. परंतु कोणत्याहि मताला पुष्कळसे अनुयायी मिळाले म्हणजेच त्याचा पंथ किंवा पक्ष निर्माण होतो. एकट्या-दुकट्याच्या मताला कोण विचारतो ? अनुयायांची संख्या हाच पंथाचा किंवा पक्षाचा संघटित देह होय. आणि अशी पक्षसंघटनाच सर्व कार्यक्षेत्रांत अनादिकालापासून चालत आलेली आहे. या संघटनेमुळेंच पंथांना व पक्षांना नाम व रूप हीं प्राप्त होतात. कोणताहि विषय घेतला तरी त्यांत ही मतभिन्नता व पक्षसंघटना दिसून येतेच. वास्तविक धर्माची फलश्रुति म्हणजे त्या धर्माच्या आचरणापासून सद्गति, मोक्ष, आनंद, सुख, पुण्य, श्रेय जें काय मिळावयाचें तें शेवटीं व्यक्तीपुरतेंच असतें. त्याचा इतराशीं संबंध नसतो. तथापि धर्म व धर्मविषयक शास्त्रें यांतहि पक्षसंघटना दिसून येते. इतकेंच नव्हे तर, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान व प्रत्यक्ष धर्माचरण यांत जितके पंथ व पक्ष आढळून येतात, तितके इतर कोणत्याहि विषयांत आढळून येत नाहींत.

### पक्षभेदांचीं विविध रूपें

आज आपणाला फक्त राजकारणांतील पक्षांविषयीं बोलावयाचें आहे. राजकारण हें सनातन, अनादि आहे. कुटुंबरूपानें मनुष्य हा समाजांत वावरू लागला तेव्हांपासून राजकारण निर्माण झालें. कारण, कुटुंब झालें तरी तें अणुमात्र राज्यच होय. आणि या कुटुंब-राज्यविषयक राजकारणांत जीं स्थित्यंतरें व उत्क्रांति झाली तीच मोठ्या मानवसमाजांतील राजकारणामध्येंहि दिसून आलेली आहे. राजसंस्थेचें रूप कुटुंब असो, किंवा जात असो, गांव असो, राष्ट्र असो, किंवा अखिल जग असो—त्यांतील व्यवहारांविषयीं मत व आचार या दोहोंमध्यें भिन्नता व विविधता दिसून आल्या आहेत. आपली बायको व मुलें यांच्यावर पुरुषानें राजसत्ता किती व कशी चालवावी, या कुटुंब-राज्यांतील घटकांचें नातें त्याच्याशीं काय राहावें, आणि त्यांना स्वतःचे

म्हणून कांहीं हक्क किंवा अधिकार असावे कीं नाहीं, या साध्या गोष्टींविषयीं देखील भिन्न मतें व म्हणून भिन्न पक्ष पूर्वीपासून आढळतात. आणि उद्यां कुटुंबव्यवस्था नष्ट होऊन सगळ्या मानवी जगाची अेक राज्यसंस्था झाली व तिला कुटुंबराष्ट्र किंवा राष्ट्रकुटुंब असलें कांहीं नांव दिलें, तरी त्या घटनेंतील घटकांचे परस्परसंबंध काय असावे याविषयींहि मतभेद व पक्षभेद होतीलच.

या उत्क्रांतींत कम्यूनिस्ट राष्ट्र हीच शेवटची पायरी असें आपणांस आज दिसेल; परंतु तीहि खरी शेवटची पायरी ठरणार नाहीं. शिवाय आजच्या कम्युनिझमच्या शास्त्रांतहि पक्षभेद आहेतच. मात्र ते पक्षभेद या स्वरूपानें न दिसतां, केवळ व्यक्तिप्राबल्याच्या स्वरूपानें दिसतात. इतर एखाद्या राजशाही किंवा लोकशाही राष्ट्राच्या घटनेची माहिती पुस्तकांत काढून पाहिली तर तींत पक्षभेद नांवानें उल्लेखिले जातात तसा कांहीं उल्लेख रशियासंबंधानें आज आढळत नाहीं. वाटतें कीं, १९३६ सालीं रशियामध्यें जी राज्यघटना अवतरली तीच सर्वराष्ट्रसंमत, सर्वलोकसंमत, असल्यामुळें रशियांत पक्षभेदच उरलेला नाहीं ! परंतु रशियांतहि पार्लमेंटरी पक्षभेद नसले तरी घटकराज्यांतील कारभारांत सूक्ष्म मतवैचित्र्य व पक्षभेद आहेतच. मात्र ते गुप्त व व्यक्तिनिष्ठ आहेत.

पार्लमेंटांतील पक्षभेदाची उलथापालथ झाल्यास ती मंत्रिमंडळ बदलण्यानें दिसून येते. याच्या उलट रशियामध्यें ही उलथापालथ झाल्यास ती फक्त व्यक्तिसंहारानें दिसून येत असेल. स्टालिन व ट्रॉट्स्की यांचीं राजकीय मतें भिन्न होतीं. मात्र त्या दोघांपैकीं अधिकारारूढ कोण झाला यानें तो मतभेद निश्चयात्मक कळण्यापेक्षां ट्रॉट्स्कीचा परदेशांतहि खूनच झाला यावरून दिसून आला आहे. त्याच रीतीनें रशियांत आजवर अनेक व्यक्तींचे खून पडले आहेत. जे आणखी पडत असतील ते बाहेर दिसून येत नाहींत इतकेंच काय तें. आणि उद्यां सोव्हिएट राज्यघटनेपलीकडे मजल जाऊन अधिक जागतिक स्वरूपाची घटना झाली तरी हे पक्षभेद राहतीलच. पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यांच्या अनुयायांच्या संख्येवरूनच त्यांचें बलाबल ठरविलें जाईल व प्रभावी होअील.

पक्षसंघटनेविषयीं हे विचार आज सुचण्याचें कारण असें कीं, भारतीय राष्ट्रीय सभेमध्यें जो पक्षभेद पूर्वीं दिसून आला नव्हता तो आतां दिसून येऊं लागला आहे. भावी हिंदी राजकारणांत तो पक्षभेद अधिकच प्रगट होत जाईल. आणि याचा पुरावा किंवा प्रत्यंतर हेंच कीं, राष्ट्रीय सभा हा एकच पक्ष असावा, तींत इतर पक्षोपपक्ष असूं नयेत, राहूं नयेत किंवा असल्यास मोडून काढावे, अशी घोषणा राष्ट्रीय सभेच्या कांहीं पुढाऱ्यांकडूनच होऊं लागली आहे! म्हणून विद्यमान इंग्लंडसारख्या एकाद्या राजशासित लोक-राज्याप्रमाणें किंवा फ्रान्ससारख्या निर्भेळ लोकराज्याप्रमाणें, नव्या हिंदी राष्ट्रांत पक्षोपपक्ष राहणार? कीं पूर्वीं जर्मनींत नात्सी, इटालींत फासिस्ट, व रशियांत कम्यूनिस्ट हा एकच पक्ष राहिला तसें होणार? याविषयी सह-जच चिकित्सा उत्पन्न झाली आहे.

## हिंदुस्थानांतले आरंभींचे दोन पक्ष

हिंदुस्थानांत ब्रिटिश राजसत्ताविरोधी राजकारण असें सुमारें ७० वर्षां-पूर्वी जन्मास आलें. तेव्हां प्रथम दोनच पक्ष होते. एक सरकारप्रेमी-सर काराश्रित, सरकार-पुरस्कृत असा पक्ष राजेरजवाडे, जमीनदार, सरकारी नोकर यांचा. आणि दुसरा स्थूल शब्दानें उल्लेखण्याचा म्हणजे लोकपक्ष. या दोनहि पक्षांची चेहरेपट्टी प्रथम स्पष्ट शब्दांनीं सांगण्याइतकी रेखाटली गेली नव्हती, व स्थानिक, प्रांतिक, मध्यवर्ति अशीं कायदेमंडळें किंवा लोक-सभा जन्मालाच आलेल्या नसल्यामुळें, त्यांतून प्रकट होण्यासारखी नव्हती. एकाद्या सरदारानें, संस्थानिकानें एखाद्या सार्वजनिक सभेसारख्या संस्थेचें अध्यक्षपद मंडित करावें, किंवा रावबहादूर माधवराव रानडे यांच्यासारख्या पगारी सरकारी नोकरानें राजकारणी म्हटल्या जाणाऱ्या मतप्रतिपादनाला (प्रचाराला नव्हे) साहाय्य करावें, इतका त्या वेळचा पक्षोपन्यास स्थूल व शबल होता. जास्तींत जास्त राजकारणी मागणी म्हणजे राज्यकारभारांत किरकोळ सुधारणा व्हाव्या इतकीच होती. लोकांना, प्रजेला हक्क किंवा सत्ता मागण्याचें स्वरूप त्या मागणीला नव्हतें.

परंतु महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें तर, १८८० च्या सुमाराला, आकार आलेले असे राजकीय पक्ष निर्माण होऊं लागले. कारण त्या सुमारास

राज्यकारभारांतील सुधारणेबरोबर गोरा–काळा या श्रेष्ठकनिष्ठ भेदांचें खंडन व निषेध, आणि प्रजेला हक्क, अधिकार व सत्ता म्हणून कांहीं असले पाहिजेत ही मागणी, सुरू झाली. परंतु काय मागावें यापेक्षां तें कसें मागावें याविषयींच मतभेद दिसून आला, व प्रथम त्या अनुसंधानानें पक्षभेदांना नांवें मिळूं लागलीं. आणि याविषयीं डोळ्यांपुढें असलेलें महाराष्ट्राचें म्हणून ठळक उदाहरण आम्हीं दिलें तरी इतर कोणत्याहि पुढारलेल्या प्रांतांत देखील थोडीशी अशीच स्थिति होती. मात्र कांहीं प्रांतांमध्यें इतकीहि प्रगति नव्हती.

## सनातनी–सुधारक आणि मवाळ–जहाल

१८८० च्या सुमारास हा पक्षभेद निश्चित दिसून आला तरी विशिष्ट नांवानें ओळखला जात नव्हता. व्यक्तीचें नांव योजिल्याशिवाय त्या पक्षाची म्हणून ओळख करून देतां येत नव्हती. हा पक्ष कोणाचा ? तर रा. ब. रानडे यांचा. आणि दुसरा पक्ष कोणाचा ? तर विष्णुशास्त्री चिपळूणकर-प्रमुख केसरी, न्यू इंग्लिश स्कूल इत्यादि संस्थांतील तरुण कार्यकर्त्यांचा. १८८० पासून सुमारें १८९६ पर्यंत याच दोन पक्षांना सनातनी व सुधारक अशाहि नांवानें ओळखलें जात असे. कारण पक्षभेदाचा आधार, सरकारशीं काय राजकीय धोरण ठेवावयाचें, काय मागावयाचें, कसें मागावयाचें हा नव्हता. तर यापेक्षांहि, समाजाची प्रगति सामाजिक, धार्मिक आचारांतील सुधारणेनें व्हावी, होईल, किंवा धार्मिक, सामाजिक कोणत्याहि सुधारणेचा आग्रह न धरतां सनातन पद्धतीनेंच समाजजीवन चालूं असतां राजकारणाच्या दृष्टीनें मात्र पाऊल पुढें टाकलें पाहिजे, हा त्या पक्षभेदाला आधार होता.

पण १८९६ सालीं सनातनी व सुधारक हे शब्द मागें पडून मवाळ व जहाल हे शब्द पक्षभेद–दर्शनाकरितां पुढें आले. आणि त्या शब्दांच्या सामान्य अर्थावरूनच पक्षभेदांचें स्वरूप ओळखतां येण्यासारखें आहे. मागणें अधिक मागावें, कीं कमी मागावें यापेक्षां, तें कोणत्या स्वरांत किंवा किती जोरानें मागावें हेंच पक्षभेदाचें निर्णायक गमक होतें. ज्या पुणें सार्वजनिक सभेचे अध्यक्ष एक संस्थानिक होते, जिचे मुख्य चालक सरकारी नोकर रानडे होते, व जिच्यामध्यें टिळकांसारखे राष्ट्रीय वृत्तीचे लोक होते, अशा

मिश्र स्वरूपाच्या सार्वजनिक सभेंतच ती कोणाच्या हातीं राहावी हा वाद निर्माण झाला. आणि या झटापटींतील यश टिळकांच्या पदरीं पडल्यामुळें, रानडे व गोखले यांनीं प्रतिस्पर्धी दुसरी डेक्कन सभा नांवाची संस्था काढली. संस्थानिकांनीं सार्वजानिक सभेशीं संबंध सोडला तसा तो राकारणाशींहि सोडला, व ते आपल्या संस्थानी कामांत मग्न झाले.

रानडे पक्षाला लोक मवाळ पक्ष म्हणत. कारण सरकारसंबंधानें बोलतांना त्यांची भाषापद्धति मृदु, बुद्धिवादी, अनुनयवादी, तीव्रशब्दाविरहित अशी होती. आणि या पक्षाचा खरा पुढारी व नेता हा स्वतः सरकारी नोकरच असल्यामुळें, त्या पक्षाचें धोरण असें मवाळ राहावें यांत आश्चर्य नाहीं. तथापि मौज ही कीं, स्वतः सरकारी नोकर नसलेले आणि स्वतंत्र बुद्धीनें राजकारणांत पडणारे कांहीं लोक यांना रानड्यांचें पुढारीपणच नव्हे तर त्यांची मतप्रतिपादनाची शैलीहि पसंत असल्यामुळें ते त्यांचे अनुयायी बनले. आत्मनिरीक्षण, आत्मदोषदर्शन हा या पक्षाचा उपक्रम जितका होता तितकाहि सरकारला नांवें ठेवणें व त्याचा निषेध करणें हा नव्हता.

## ‘ नेमस्त ’ आणि ‘ राष्ट्रीय ’

पक्षभेदाची ही स्थिति सुरतेच्या राष्ट्रीय सभेपर्यंत टिकली. त्या सभेंत मवाळपक्षानें नेमस्त पक्ष हें नांव धारण केलें, आणि जहाल म्हटल्या जाणाऱ्या पक्षानें राष्ट्रीय पक्ष हें नांव धारण केलें. पहिल्या पक्षाला मवाळ हें नांव दूषणास्पद वाटलें तसेंच दुसऱ्या पक्षाला जहाल हें नांवहि निंदात्मक वाटलें. यामुळें सुरतेस व त्यापुढें, नेमस्त ( मॉडरेट ) व राष्ट्रीय ( नॅशनॅलिस्ट ) हीं पक्षभेदांचीं नवीं नांवें प्रचलित झालीं तीं पुढें १२ वर्षें टिकलीं, व अजूनहि कांहीं अंशीं चालू आहेत. त्यानंतर आतां नेमस्त पक्ष आहे तेथेंच राहिला. मात्र राष्ट्रीय पक्षाच्याहि पुढें जाऊन पाऊल टाकणारा कॉंग्रेस नांवाचा पक्ष उत्पन्न झाला. तें त्याचें नांव आजहि रूढ आहे. तथापि या कॉंग्रेस पक्षांतच सोशियालिस्ट व कम्यूनिस्ट असे उपपक्ष निर्माण झालेले असून, ते कॉंग्रेस पक्षावर मताधिक्य व मात करूं पाहात आहेत.

१९०८ सालीं सुरतेच्या कॉंग्रेसनंतर राजकीय पक्षोपन्यासाचें जें विशदीकरण किंवा तत्त्वदर्शन टिळकांनीं केलें, तेंच आज अच्युत पटवर्धन,

जयप्रकाश नारायण, अरुणा असफअल्ली इत्यादि तेजस्वी व्यक्ति करीत आहेत. म्हणून ३८ वर्षांपूर्वी टिळकांनीं केलेला पक्षोपन्यास कसा होता याची आठवण करून दिली तर पक्षभेद हा सनातन असून एकाच मार्गानें जाणारा कसा असतो हें ध्यानांत येईल.

## टिळकांनीं केलेला पक्षोपन्यास

हा पक्षोपन्यास करतांना टिळकांनीं ११ फेब्रुवारी १९०८ पासून ३ मार्च १९०८ पर्यंत ‘केसरींत’त ४ अग्रलेख ओळीनें लिहिले. ते केसरींतील त्यांच्या उत्कृष्ट विवेचक लेखांचे नमुने म्हणून सांगण्यासारखे आहेत. परंतु त्या लेखांचा जो सारांश आम्ही यापुढें थोडक्यांत देणार आहों तो देण्यांत, टिळकांच्या लेखनशैलीचें दिग्दर्शन करण्यापेक्षांहि त्या वेळच्या व आजच्या पक्षोपन्यासाचें तत्त्वज्ञान अेकच कसें आहे, हेंच सांगण्याचा आमचा मुख्य उद्देश आहे.

सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत दंगल होऊन सभा मोडली, तेव्हां मेथा-गोखले प्रभृतींनीं कनव्हेन्शन नांवाची अेक वेगळी सभा भरविली. आणि तिच्या प्रतिज्ञा-पत्रकावर जे सही करतील त्यांनाच आंत येऊं द्यावें असें ठरविलें. हा उद्देश सफळ झाला. कारण टिळक पक्षाला हें प्रतिज्ञा-प्रतक मान्य नव्हतें; किंबहुना त्याचें म्हणणें असें कीं थोड्या लोकांनीं राष्ट्रीय सभेचें ध्येय आपणाला हव्या त्या शब्दांनीं लिहून त्याचें प्रतिज्ञा-प्रत्रक करणें, व त्यावर सही करील त्यालाच आंत घेणें, हें साऱ्या राष्ट्रीय सभेच्या उद्देशाला, व तोंपर्यंत रूढ असलेल्या तिच्या घटनेलाहि, अनुसरून नाहीं. तात्पर्य, अशा रीतीनें राष्ट्रीय सभेचें नांव अंतर्धान पावलें, आणि तिच्या जागीं कन्व्हेन्शन या नांवाचा मवाळ पक्ष आणि नॅशनॅलिस्ट म्हणजे राष्ट्रीय नांवाचा जहाल पक्ष असे तट पडले. तेच पुढें ९ वर्षें टिकून राहिले, व फिरून लखनौ येथें सर्व पक्षांची अेकी होऊन पूर्वीसारखी राष्ट्रीय सभा सुरू झाली.

तेथपासून १९२३ मध्यें राष्ट्रसभा अंतर्गत दास-नेहरू-केळकरांचा कौन्सिलवादी स्वराज्य पक्ष स्थापित होईपर्यंत पक्षभेदानें फिरून डोकें वर काढलें नव्हतें. पण तेथून पुढें अेका राष्ट्रीय सभेंतच फेरवाले, नाफेरवाले, कौन्सिलवाले, बहिष्कारवाले, वसाहत-स्वराज्यवादी, स्वातंत्र्यवादी, फॉरवर्ड ब्लॉक,

रॅडिकल, सोशिॲलिस्ट, नॅशनॅलिस्ट, कम्युनिस्ट, अहिंसावादी, दहशतवादी इत्यादि पक्ष निर्माण झाले. राष्ट्रीय सभेनें आज कौन्सिलप्रवेश, अधिकार-ग्रहण व दशहतवाद हीं धोरणें स्वीकारल्यामुळें, आणि काँग्रेसचें आजचें उद्देशपत्रक या सर्वांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सामावेश करणारें असल्या-मुळें, अजून अेका जागीं दोन राष्ट्रीय सभा झालेल्या नाहींत. तथापि वर सांगितल्याप्रमाणें तिच्यांतच अनेक पक्ष निर्माण झाले; पण तिला न सोडतां तींतच राहिले. १९०८ सालीं टिळकांचें म्हणणेंहि असेंच होतें कीं राष्ट्रीय सभा अेकच असावी, आणि तिच्यांत मतभददर्शक पक्ष असण्यास व त्यांनीं आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यासहि हरकत नसावी. अर्थात् राष्ट्रीय सभा ही अेकच व सर्व-मत प्रदर्शक राहावी. अमुक पक्ष राष्ट्रीय सभेंत नसावा असें ठरवूं नये. आणि त्या उद्देशानें निवडणुकींत केंद्रांच्या जागीं ठिकाठिकाणीं वेगवेगळ्या प्रकारचीं किंवा वेगवेगळ्या निमित्तानें कुलुपें घालूं नयेत.

## टिळकांनीं कल्पिलेले पांच पक्ष

राजकीय पक्षोपन्यास व्यवस्थित रीतीनें मांडतांना टिळकांनीं पांच पक्ष कल्पिले. ते असे :—(१) राजनिष्ठ, (२) टीकाकार, (३) स्वराज्यवादी, (४) स्वातंत्र्यवादी व (५) स्वातंत्र्यसैनिक. यांपैकीं क्रमांक एकचा पक्ष हा टिळकांनीं बाद ठरविला. तसेंच पांचवा पक्षहि तेव्हांच्या स्थितींत लाभण्यासारखा नसल्यामुळें त्यांनीं त्याची परिगणना केवळ विवेचनाच्या परिपूर्तिसाठीं केली. आणि त्याला प्रत्यक्ष नांव किंवा उपपद दिलें नाहीं. परंतु टिळकांच्या मनांत असलेलें ‘ स्वातंत्र्यसैनिक पक्ष ’ असें नांव आज आम्हीं नव्यानें प्रकट केलें आहे. क्रमांक १ च्या पक्षाच्या मतें इंग्रजी राज्यच या देशावर राहणें इष्ट व श्रेयस्कर होतें. अनुग्रह करून कृपेच्या सावलींत ठेवून तें सरकार देईल तेवढें घ्यावें, अधिक मागण्याकरितां भांडण करूं नये ! परंतु सन १८८० पूर्वींच हा पक्ष नामशेष झाला होता, म्हणून टिळकांनीं तो पुढील विवेचनांत लक्षांत घेतला नाहीं. तसेंच टिळक हेहि स्वतः त्यावेळीं ‘ पूर्ण स्वातंत्र्य’वादाचे शब्द तोंडांतून न काढणारे, व दह-शतवाद राष्ट्रीय सभेला न चिकटविणारे असे होते. म्हणून त्या पक्षाविषयीं देखील त्यांनीं अधिक कांहीं लिहिलें नाहीं. पण मध्यंतरी जे तीन पक्ष राहिले

ते बहुधा एकच मानण्यास हरएक नाहीं, त्यांनीं आपआपसांत द्वेष करण्याचें कारण नाहीं, आणि या तीन पक्षांप्रमाणें शेवटच्या म्हणजे संभवनीय स्वातंत्र्यसैनिक म्हणवणाऱ्यालाहि राष्ट्रीय सभेत स्थान असलें पाहिजे, असें त्यांनीं प्रतिपादिलें. मधल्या तीन पक्षांची नांवें:– ( १ ) इंग्रजशाहीचे टीकाकार किंवा दोषदर्शक, ( २ ) स्वराज्यवादी पण 'वादी' म्हणजे तोंडानें उघड बोलणारा इतकाच, ( ३ ) स्वातंत्र्यवादी पण तोहि वादी म्हणजे तोंडानें बोलणाराच. अर्थात् तोंडानें बोलणें इतकीच मर्यादा जोंपर्यंत मानली गेली तोंपर्यंत, टीकाकार, किंवा दोषदर्शक स्वराज्वादी, स्वातंत्र्यवादी, या सर्वांची एकजूट असण्यास हरकत नाहीं असें टिळकांचें म्हणणें होतें. "कारण या तिन्ही पक्षांनीं आपल्या मतप्रतिपादनांत शब्दयोजना करतांना सावधपणा किंवा स्पष्टपणा किंवा धीटपणा ठेवला तरी त्या तिघांचाहि हेतु एकच. म्हणून तिघांनाहि ब्रिटिश सरकार व अँग्लो-इंडियन पत्रें राजद्रोही हेंच विशेषण लावीत. मागणें जर तेंच तर रडून मागितलें काय, मुळमुळीतपणें मागितलें काय, संतापानें मागितलें काय, अथवा शिव्या देऊन मागितलें काय, सर्व एकच. तें ज्याच्या त्याच्यावर सोंपवावें. तो स्वभाव म्हणावा. त्याकरितां लोकांनीं बरेंवाईट म्हटलें तर, अथवा सरकारानें काहीं इलाज केला तर, तें ज्याचा तो सोसतोच आहे! आपल्या भाषेचे परिणाम आपणच भोगणार हें माहीत असल्यावर, व ते भोगण्याची त्याची तयारी असल्यावर, एकानें दुसऱ्याला 'तूं असें बोल, तसें बोलूं नको' असें म्हणण्याचा अधिकार नाहीं. आणि शेवटीं जी भाषा प्रत्यक्ष वापरून बहुमतानें राष्ट्रीय सभेचा ठराव होईल, राहील तेंच तिचें खरें मत असें समजावें. सरकारला वाघ म्हटलें तरी खातो, वाघोबा म्हटलें तरी खातो, वाघ्या-वाघज्या म्हटलें तरी खातो! अर्थात् स्वभाव व संस्कृति यांच्याप्रमाणें ज्याच्या तोंडीं सरकारासंबंधीं जो शब्द येईल तो त्यानें वापरावा.

## भाषेंतील अभिनिवेश एकीच्या आड येऊं नये

"याला प्रत्यंतर असें कीं, स्वतः इंग्रज राज्यकर्त्यांत तरी अशा भाषाभेदानेंच अनेक पक्ष आहेत कीं नाहीं ! एकाला वाटतें हिंदुस्थानांतील राज्याकारभारांतील दोष तेवढे जावे. दुसऱ्याला वाटतें कीं, दोष निघून

जाण्याशिवाय कांहीं थोडे अधिकार हिंदी प्रजेला मिळावे. तिसरे राजकीय तत्त्वज्ञानी. ते म्हणतात कीं, शेवटीं हिंदुस्थानाला स्वराज्याला पात्र करणें हें आमचें कर्तव्यच आहे. तथापि या सर्वांना हिंदुस्थान हें ब्रिटिश साम्राज्यांतच राहिलें पाहिजे असें वाटतें व तसा त्यांचा आग्रह आहे.

"तात्पर्य, पक्षभेददर्शक अभिनिवेश हा भाषेनें दिसून येतो, परंतु तो अभिनिवेश राज्यकर्त्यांच्या एकीला जसा आड येत नाहीं, तसाच तो प्रजेंतील एकीलाहि आड येऊं नये. अर्थात् राष्ट्रीय सभेंत कोणालाहि मज्जाव नसावा. स्वतंत्र व जिवंत राष्ट्रांतहि व्यक्ति तितक्या प्रकृति व मतें तितके पक्षभेद या गोष्टी विचार-स्वातंत्र्यदर्शक होतात; परंतु एकीच्या आड येत नाहींत. हें मर्म पटण्याला राजकीय शिक्षण लागतें, तें आपण अधिकाधिक मिळवावें. मतभेदाचा उपयोग, एकच कार्य पण तें अधिक सुलभ किंवा यशस्वी कसें होईल, याकडे करावा. मतभेद निर्मूळ करण्याचा प्रयत्न करूं नये. स्वराज्य आणि स्वातंत्र्य यांच्यातील अंतर आकाशांतील ताऱ्यांमधील अंतराइतकें मोठें आहे. स्वतः ताऱ्यांवरील लोकांना हें अंतर जाणवेल किंवा गणित करून तें मांडतां येईल. पण पृथ्वीवरच्या लोकांनीं ते तारे एकाला एक लागून आहेत असें म्हटलें तर त्यांत काय चूक? ट्रॅममध्यें बसण्याला खिशांत पैसे नाहींत, आणि भांडण मात्र चाललें आहे तें मोटार विकत घ्यावी कीं नाहीं याविषयीं! आत्म्याला सायुज्यमुक्ति आणि राष्ट्राला स्वातंत्र्य–हीं दोन्ही आत्मा व राष्ट्र यांचीं अंतिम साध्यें आहेत. पण मुक्ति मिळण्याला ज्याप्रमाणें कामक्रोधादि शत्रूंचा संमय करून समबुद्धित्व संपादन करण्याचें कर्म करावें लागतें, त्याप्रमाणें राष्ट्राला आपला अंतिम हेतु साधण्याकरितां राष्ट्रीय कर्माची अपेक्षा असते हें विसरतां कामा नये.

### सर्व इमारतीचा एकच पाया; तो एकदमच घाला

"म्हणून तूर्त राजकीय साध्याच्या शब्दयोजनेविषयीं अंतिम, उपांतिम, उप-उपांतिम, असले भेद काढीत बसूं नये. आंब्याचें झाड लावणाराला हें हवें असतें कीं, त्याला पुढें मोहोर येऊन आंबेफळ धरावें. परंतु माझें साध्य मोहोर कीं आम्रफल? या भ्रमांत पडून तो आंब्याची कोय रुजत घालण्याला, किंवा पुढें झाड उगवून आल्यावर त्याला पाणी घालण्याला,

विसरेल तर त्याच्या हातीं काय पडेल! स्वर्गप्राप्ति व मोक्ष, मोहोर व फळें, आणि स्वराज्य व स्वातंत्र्य—या तीन जोड्या अशाच आहेत. पैकीं पहिली दुकल वेदान्तांतली, दुसरी व्यवहारांतली, व तिसरी राजनीतींतली आहे. पण त्यांतील अंतिम उपांतिम हें ठरवीत बसण्यांत काय अर्थ! 'दारान् अपत्याय-रत्यर्थम् नव्हे' असें धर्मशास्त्र सांगतें. परंतु या वादांत शास्त्रकाराशीं अर्थनिर्णयाची लढाई करणारा लग्नच करण्याचें विसरेल, तर रति किंवा अपत्य यांपैकीं त्याला एकहि मिळणार नाहीं. सर्व इमारतीला एकच पाया म्हणून तो एकच एकदम घातला पाहिजे. तूं राहणार त्या दालनापुरता तूं घाल, मी राहणार त्या जागेपुरता मी घालीन, असें म्हणून चालणार नाहीं. तसेंच झाड लावतांना त्याची वाढ पुढें किती होईल या विवेचनेंत पडूं नये.

"साध्याच्या भांडणाइतकें साधनाचें भांडणहि निरर्थक होय. नेमस्त व राष्ट्रीय यांत कोणीहि स्वतःला वाटल्यास अधिक शहाणे किंवा शिरजोर असें खुशाल समजावें व ठरवावें. परंतु दोघांनीं मिळूनच, नवरा-बायकोच्या भांडणाप्रमाणें, राजकारणाचें भांडण इंग्रजांशीं चालवावें. म्हणजे, रागावलें पाहिजे पण थोडा लोभहि ठेवला पाहिजे. न फाटेल इतकें तरी मिळतें घ्यावें. आग्रह सोडूं नये पण हट्टहि धरूं नये. कोणत्या शब्दांनीं सरकार भिईल किंवा कोणत्यांनीं नमेल याविषयीं वाद घालूं नये. सरकार आज समर्थ आहे. धर्मभोळ्या बायकोऐवजीं शाळेंत शिकलेली बायको प्रथम जड वाटते. पण शेवटीं नवरा म्हणतो कीं, 'शिकलेली जरी झाली तरी बायकोच आहे.' हें जसें सरकार आपल्या मनाशीं म्हणतें तसेंच प्रजेनेंहि राजाशीं वागावें. ताक मागावयाचें तर भांडें कां लपवावें! स्वातंत्र्य हवें तर तें उघड कां मागूं नये! हेंच राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें. आणि तो पक्ष त्याकरितां स्वार्थत्यागाला तयार आहे, म्हणूनच राष्ट्रीय पक्षाची छाप जनतेवर अधिक पडते याबद्दल रागावण्यांत काय अर्थ! मवाळांनीं जहालांशीं एकी ठेवली तर सरकार फार तर रागावेल, पण आपापसांतील दुहीं तरी टळेल."

## अडचणीचा निर्वाह

सुरतेंत बिघाड झाल्यानंतर पाबना या ठिकाणीं बंगाली नेमस्त व राष्ट्रीय पक्षांनीं एकी केली तशीच महाराष्ट्रांतहि व्हावी हेंच टिळकांना या लेखांत प्रतिपादन करावयाचें होतें. अशा रीतीनें नेमस्त व राष्ट्रीय पक्ष यांच्या समेटाला कोणती अडचण मुख्यतः येते हें सांगून, शेवटच्या चौथ्या लेखांत या अडचणींचा निर्वाह कसा होईल हें टिळकांनीं सांगितलें आहे. ते म्हणतात, "या पक्षभेदांत साध्यभेदापेक्षां साधनभेद हाच खरा अडचणीचा असतो. जुन्या पक्षाला हें हवें कीं, सरकारास राग न येईल अशा बेतानें दोषदर्शन करून हक्क मागण्याकरितां सरकाराकडे हळूहळू जावें. उलट नव्या पक्षाला सरकाराच्या अडवणुकीचा मार्ग लोकांना शिकवून तयार करावयाचें आहे. या भेदामुळें सरकार नेमस्तांना जवळ करतें. पण तो पक्ष झाला तरी सरकारला प्रिय आहे म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय पक्ष हा त्यांना त्यांतल्या त्यांत अधिक अप्रिय आहे म्हणून ! शतमुखी रावणापेक्षां दशमुखी रावण व त्याहूनहि एकमुखी रावण अधिक बरा ! पण राष्ट्रीय पक्ष नामशेष झाला तर त्याच्यावर उगारण्याचें हत्यार सरकार नेमस्त पक्षावरहि उगारण्यास कमी करणार नाहीं, हें नेमस्तांनीं ध्यानांत ठेवावें. उलट राष्ट्रीय पक्षानेंहि हें समजावें कीं, जुन्या पक्षावरील प्रेम व त्यांतच नव्या पक्षावर राग प्रकट करण्याकरितां सरकारानें लोकांना जर कांहीं हक्क दिले तर ते इष्टच मानावें. फार काय पण नुसत्या वरिष्ठ नोकऱ्या या चळवळीमुळें सरकारानें देऊं केल्या व त्या नेमस्त पक्षाच्या पदरांत पडल्या तरी त्या इष्ट मानाव्या. झाड लावणारानें आपणाला फळ मिळण्याची अपेक्षा न ठेवतां तें दुसऱ्याला मिळालें तरी मलाच मिळालें असें मानावें. उलट फळ खाणारानेंहि मूळ झाड लावल्याचे श्रम करणाराला मूर्ख म्हणूं नये. कृतज्ञतेचा संबंध त्याच्याशीं तोडूं नये, व कृतघ्न बनूं नये. इंग्रज लोकांत उदार तत्त्वज्ञानी कांहीं आहेत; परंतु तें तत्त्वज्ञान त्यांच्या कृतींत उतरण्याला बाह्य उपाधि म्हणून असंतुष्ट आग्रही अडविणाऱ्या लोकांची चळवळ हवी. ज्याला ही चळवळ स्वतः करवणार नाहीं त्यानें ती करूं नये; पण ती करणाराला नांवें ठेवून त्याचे पाय मागें ओढूं नये.

## घर्षण नैमित्तिक पण एकजूट नित्य

कृतीकरितां नसलें तरी निदान भांडणापुरतें सर्व पक्षांनीं एक झालें पाहिजे. सुराज्य, स्वराज्य या स्वातंत्र्याच्याच पायऱ्या आहेत हें शहाणे इंग्रज ओळखतात. ते एवढेंच म्हणतात कीं, 'तुम्ही जर नेमस्त तर जहालांशीं संबंध कां ठेवतां?' तर त्याला हें उत्तर द्यावें कीं, 'आंब्याचें झाड मूळ लावण्यांत आम्हीं जहालांशींहि सहकार्य करणारच. मग त्याला नुसता मोहोर येवो किंवा फळ धरो. जहाल पक्षांशीं संगत सोबत ठेवण्यांत कित्येक मवाळांना जी भीति व मळमळ वाटते ती गेली म्हणजे मुख्य काम झालें. म्हणावें कीं, 'तो दुसरा वीर स्वातंत्र्यवादी आहे तर मी निदान स्वराज्य-वादी तर आहेंच.' ज्या पक्ष्याला जेथवर उंच उडतां येईल तेथवर त्याला उडण्याला दुर्बल पक्ष्यांनीं हरकत कां घ्यावी? किंबहुना गरम पक्ष उरावर आहे म्हणूनच नरम पक्षाला सरकार कांहीं किंमत देतें. पण दोन्ही पक्षांनीं आपणांत एकजूटच ठेविली पाहिजे. आपणाला लाभणारें नफानुकसान आपण घ्यावें, पण कार्यापुरतें एक राहण्याची बुद्धि ठेवावी. बैलगाडीला एक बैल तापट व एक मद्द असणें फायद्याचेंच असतें. मला तुझी अड-चण होते असें एकानें म्हणूं नये. व माझ्यामुळें तुझा फायदा होतो असें दुसऱ्यानें म्हणूं नये. गोरा अधिकारी हितशत्रु वाटत असतांहि त्याशीं संगत ठेवण्याला नेमस्त तयार होतात, तर जहाल हे हितमित्र आहेत म्हणून त्यांच्याशींहि संगति ठेवावी. जहाल पक्षाला आपल्या गळ्यांतील लोढणें मानूं नये. राष्ट्रीय पक्ष समजतो कीं, आज आपणाला राष्ट्रीय सभेंत बहुमत नाहीं, पण कांहीं दिवसांनीं बहुमत हें त्याच्या वांट्याला येईल या विश्वासावर तो राष्ट्रीय सभेशीं निष्ठेनें वागेल. बहुमत आज जसें एकाला मान्य तसेंच तें उद्यां दुसऱ्यालाहि मान्य व्हावें. मात्र बहुमताला न जुळणारीं अशीं आपलीं मतें प्रतिपादण्याला अल्पमतवाल्यांना निर्बंध नसावा. ही अडचण राष्ट्रीय सभेनें नेमस्त शब्दांनीं आपलें क्रीड म्हणजे अंतिम हेतुविधान म्हणून केल्यानें उत्पन्न होते, म्हणून नेमस्तांनीं जहालां-वर हा जुलूम करूं नये. प्रत्येक पक्षाला आपापलीं मतें आंत किंवा बाहेर उघडपणें प्रतिपादन करण्याला अवसर हवा. भारताचें राजकारण हा विषय

इतका प्रचंड आहे कीं, त्यांत एकाहून अधिक पक्ष होणारच. मतभेद म्हणजे घर्षण आलेंच. तें घर्षण जाळण्याइतकें असूं नये, तर कार्योपयोगी उष्णता उत्पन्न करण्यापुरतेंच असावें. घर्षण नैमित्तिक पण संगत, एकजूट हीं नित्य, असें प्रगतिपर व राष्ट्रबलवर्धक धोरण राष्ट्रीय सभेतील पक्षोपपक्षांनीं ठेवणें इष्ट आहे."

अशी शिकवण टिळकांनीं या चार लेखांत जनतेला दिली आणि आजहि ती राजकारणी पक्षोपपक्षांना मार्गदर्शक होईल.

[ १० ]

## राजकारणाचे मार्ग व अत्याचार

एके दिवशीं परदेशाहून आलेला पाहुणा टिळकांकडे उतरण्याला आला. गांवांत कोणाची ओळख नाहीं आणि टिळक सर्वांचा परामर्ष घेणारे म्हणून तो त्यांच्याचकडे जाऊन उतरला. पाहुणा घरीं आला तेव्हां यजमानाचें कर्तव्यच कीं त्याला उतरून घेऊन जेवायला घालावें. जेवणखाण झाल्यावर स्वस्थपणें टिळकांनीं 'तुम्ही कोण, कुठले ?' वगैरे अधिक विचारपूस केली. तेव्हां खालील संभाषण झालें.

पाहुणा—मी गेलां दोनतीन वर्षें युरोप-अमेरिकेंत गेलों होतों.

टिळक—कशाला गेलां होतांत ?

पाहुणा—कांहीं नवीन उद्योगधंदा किंवा विद्या शिकावी म्हणून.

टिळक—मग काय काय शिकलांत ?

पाहुणा—कांहीं थोडी यंत्रकला शिकलों, कांहीं रसायनशास्त्र शिकलों.

टिळक—मग आतां तुम्ही यापुढें काय करणार ?

पाहुणा—परत आपले गांवीं जाऊन किंवा इतर कोठें मिळविलेल्या विद्येचा उपयोग होतो का पाहून संसारयात्रा सुरू करणार.

टिळक—तुम्ही परदेशांत आपल्या खर्चानें गेलां होतांत ? किंवा तेथें उद्योग-धंदा शिकतांशिकतांच नोकरी वगैरे करून आपलें पोटहि भरलेंत ?

पाहुणा—केवळ स्वावलंबनाच्या तत्त्वावर मी विद्या शिकलों व उदरनिर्वाह केला.

टिळक—मग इतके दिवस तुम्ही परदेशांत हिंडलां फिरलां तेव्हां इकडच्या व तिकडच्या स्थितींत तुम्हांला काय अंतर दिसलें ?

पाहुणा—अंतर हेंच दिसलें कीं, आहे या स्थितींत आमच्या देशाला आणखी पांचशें वर्षें डोकें वर काढण्याची आशा नको.

टिळक—पण तुम्ही गेलांत ते देश आधींच स्वतंत्र व स्वराज्याचा उपभोग घेणारे असतील. हिंदुस्थानासारखे ते परकी लोकांच्या ताब्यांत नसतील. तेव्हां आम्हांला वर येण्याला कांहीं दिवस लागणारच.

पाहुणा—पण परकी देश झाले तरी ते पूर्वी केव्हां परतंत्र नव्हते असें नाहीं. त्यांना आज स्वातंत्र्य आहे तें त्यांनीं स्वतः मिळविलेलें आहे.

टिळक—तें कोणत्या उपायांनीं ?

पाहुणा—आपण असला प्रश्न कसा करतां ? परतंत्र स्थितींत असतां स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग एकच. तो अर्ज, विनंत्या हा नव्हे. तर स्वातंत्र्याकरितां प्राण देण्याला व प्राण घेण्याला तयार होणें हाच.

टिळक—तुम्ही स्वातंत्र्य म्हणतां तें व्यक्तीचें कीं देशाचें ?

पाहुणा—प्राण देऊन किंवा घेऊन व्यक्तिस्वातंत्र्य मिळविणें ही सोपी गोष्ट आहे. पण माझ्या म्हणण्याचा रोंख देशाच्या स्वातंत्र्याबद्दलच होता.

टिळक—तात्त्विकदृष्ट्या तुम्ही म्हणतां हें बरोबर आहे व निरानिराळ्या देशांचा इतिहास पाहिला म्हणजे त्यांत अशी एक पायरी कोठें तरी पायाला लागते ही गोष्ट खरी.

पाहुणा—म्हणूनच मी म्हणतों कीं तशी खटपट करून त्या पायरीपर्यंत मजल नेल्याशिवाय हिंदुस्थानचा तरणोपाय नाहीं.

टिळक—पण हिंदुस्थानच्या स्थितीसारखा देखावा तुम्हांला इतर कोणत्या देशांत आढळला काय ?

पाहुणा—खरेंच नाहीं. संख्येनें इतके पुष्कळ लोक इतक्या थोड्या लोकांकडून आपल्यावर राज्य करून घेतात असा दाखला इतर ठिकाणीं मिळणें शक्य नाहीं. आणि याच मुद्द्यावर तर जगांतले लोक आम्हाला हंसतात !

टिळक—पण ज्या राष्ट्रांनीं बंडें करून स्वातंत्र्य मिळविलें त्यांना इतर एखाद्या राष्ट्राची तरी सहानुभूति नव्हती काय ? व त्या सहानुभूतिपूर्ण

राष्ट्राकडून युद्धाचीं साधनें मिळालीं नव्हतीं काय ? उदाहरणार्थ इटलीला ऑस्ट्रियाविरुद्ध लढण्याच्या कामीं फ्रान्सची मदत झाली. आज युरोपखंडांत लहान सहान राष्ट्रें जिवंत आहेत तीं इतर मदतगार राष्ट्रांच्या बळावरच नाहींत काय ? आयर्लंडला पूर्वी फ्रान्सची मदत झाली व अलीकडे अमेरिकेची झाली आहे. दुर्दैवानें हिंदुस्थानला कोणत्याच राष्ट्राची आज तशी मदत नाहीं. म्हणून हिंदुस्थानच्या लोकांनीं बंड करण्याला तयार झालें तरी लढण्याचीं साधनें कोठून मिळणार ?

पाहुणा—साधनें मिळविण्याच्याच नादाला मनुष्य लागला म्हणजे त्याला तीं मिळतात. हें पाहा, माझ्या ट्रंकेंत मी सर्व अधिकाऱ्यांचा डोळा चुकवून एक पिस्तुल आणलेलें आहे.

टिळक—पण हें मिळविण्याला तुम्हाला परदेशांत जावें लागलें तेव्हां तेथून तुम्हीं तें आणलें. तुम्हांला परदेशीं जाऊन येण्याला खर्च किती लागला ?

पाहुणा—सुमारें तीन हजार रुपये.

टिळक—मग या पिस्तुलाची किंमत तीन हजार रुपये व शिवाय परदेशचा प्रवास हें ठरत नाहीं का ? असा खर्च करून प्रवास करणारे लोक हिंदुस्थानांत किती ?

पाहुणा—पण सर्वांना कांहीं असा खर्च आणि असा प्रवास करावा लागणार नाहीं. बंगाल्यांत दरोडेखोरांना पिस्तुलें कशीं मिळतात ? बंगाल्यांतील अराजक चळवळींत किती तरी पिस्तुलें बाहेर निघालीं होतीं !

टिळक—पण इतकीं पिस्तुलें बाहेर पडून परिणाम काय झाला ? हे पिस्तुलवाले घरच्या म्हातारीचे काळ ठरले कीं नाहीं ? बंगाल्यांतील दरोड्यांचीं वर्णनें वाचलीं म्हणजे त्यांत तरुण पिढीचें तेज चमकलें असा सकृद्दर्शनीं भास होतो. पण त्या दरोड्यांचीं वर्णनें वाचलीं म्हणजे निरपराधी धनिक लोकांवर झालेल्या क्रूर अत्याचारांचीहि आठवण होते. ती विसरून कसें चालेल ? इतकीं पिस्तुलें बाहेर पडलीं म्हणतां व जर्मनींतून युद्धाच्या वेळीं कदाचित् कमीज्यास्त आलींहि असतील; पण स्पष्टच बोलावयाचें तर ज्यांच्यापासून स्वातंत्र्य मिळवावयाचें असें म्हणतां अशा लोकांचे बळी किती घेतले गेले ? आमच्या इकडे एकदां १९०९ सालीं एक डझन पिस्तुलें

आलीं पण त्यांचा इतिहास काय झाला हें ऐकाल तर त्या पिस्तुलांनीं स्वातंत्र्य मिळण्याला एक रतिभरहि साहाय्य झालें नाहीं. उलट अशा एका अधिकाऱ्याचा खून झाला कीं ज्याच्या मरणानें हळहळ वाटली नाहीं असा मनुष्य विरळा. पूर्वी बंडखोरीच्या कल्पनेला जो तात्त्विक तजेला होता तोहि या निव्वळ खेदकारक खुनानें जाऊन अशा मार्गाविषयीं लोकांच्या मनांत खंतीच उत्पन्न झाली.

पाहुणा—मग अशा पिस्तुलांचा कांहींच उपयोग नाहीं असें म्हणतां का?

टिळक—मी तसें म्हणत नाहीं. स्वाभिमानाचें संरक्षण करण्याचे प्रसंग हिंदी प्रजेवर अनेक वेळां येतात. अशा वेळीं म्हणजे एखाद्या न्याय्य प्रसंगीं सर्वांना खरोखर जुलुमी वाटणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध, पण तेंहि प्रत्यक्ष जुलुमाच्या कृत्यांत प्रतिकार करतांना, जर एखाद्या पिस्तुलाचा उपयोग झाला तर तो लोकांना पटेल. आणि मग पिस्तुल कोणीं कसें मिळविलें याचा विचार लोक करणार नाहींत.

पाहुणा—पण पिस्तुलाचें एक असो. इकडे लोकांना बॉंबगोळे करतां येऊं लागले होते त्याला तर परदेशीं जाण्याचें कारण नाहीं ना?

टिळक—पण जो प्रश्न मीं पिस्तुलाबद्दल विचारला तोच मला या बॉंबसंबंधींहि विचारतां येईल. जनरल डायरसारख्यावर कोणीं तो फेकून दाखविला असता तर लोकांना त्याचें कांहीं कौतुक वाटलें असतें. उलट लॉर्ड हार्डिंज यांच्यासारख्या हिंदुस्थानाविषयीं खरी सहानभूति बाळगणाऱ्या व्हाइसरॉयवर तो टाकल्यानें अद्‍भुतरस आळविणारीं कांहीं वर्णनें लोकांना वर्तमानपत्रांत वाचावयाला सांपडलीं पण सूज्ञ जनतेच्या मनावर त्याचा काय परिणाम झाला? याची कांहीं कल्पना आहे काय? आणि मुझफरपूर-अत्याचारांत तर बिचाऱ्या दोन गोऱ्या बायाच मेल्या! माझ्या म्हणण्याचा मुद्दा हाच कीं ज्या लोकांच्या हातीं हीं साधनें जातात, त्या सर्वांचेंच शील चांगलें असतें असें नाहीं व शहाणपणा तर फार थोड्यांच्या ठिकाणीं असतो. म्हणून त्याचा परिणाम विपरीत होतो.

पाहुणा—म्हणून सुशिक्षित लोकांनींच या गोष्टी स्वतःच्या हातीं घेतल्या पाहिजेत.

टिळक—पण त्यांत अडचण ही कीं बंडाची कल्पना सुशिक्षिताला एक वेळ मानवते पण वैयक्तिक अत्याचार त्याला मानवत नाहींत. याला काय करणार ?

पाहुणा—पण पाण्यांत पडल्याशिवाय पोहतां तरी कसें येणार ? अंग भिजेल म्हणून पाण्यांत पडावयाचें नाहीं. आणि पाण्यांत पडल्याशिवाय पोहतां यावयाचें नाहीं. एकदम प्रथमच पाण्यांत पडलेला मनुष्य बुडतो. तो तेथें पोहायला शिकूं शकत नाहीं.

टिळक—हें खरें आहे. पण बंडें हीं तुम्हीं सांगितलेल्या देशांतहि आकस्मिक उद्भवलीं ! कीं पुढें केव्हां तरी बंड करावयाचें म्हणून रोज त्यांची थोडथोडी कोणी तयारी करीत होते ? १८५७ सालीं बंड झालें तें 'उद्भवलें' असेंच म्हणतात. तें आधीं तयारी करून कोणीं केलें नव्हतें. आणि जो नानासाहेब पेशवा गोरे लोकांना मेजवान्या देण्यांत व बॉलमध्यें नाचण्यांत दंग असे असें म्हणतात तोच प्रसंग पडल्याबरोबर बंडवाल्यांचा पुढारी झाला कीं नाहीं ? झांशीच्या राणीचाहि इतिहास पाहाल तर तिनें इंग्रज सरकारकडे अर्ज करण्याकरितां जितकी लेखणी झिजवली तितकी कांहीं धार येण्याकरितां १८५७ पर्यंत तरवार घांसली नव्हती. पण प्रसंग आला तेव्हां ती वीरा ठरली कीं नाहीं ? इतिहासांतील पुष्कळ बंडांचें असेंच असतें. तीं ' उद्भवतात '. तुम्हाला मी दैववादी असा वाटेन—पण त्यांना साधनेंहि तशींच आयत्या वेळीं तयार होतात. पाण्याचें बर्फ होतांना त्याची थंडी एकेक डिग्रीच्या क्रमानें कडेपर्यंत खालीं येत नाहीं. तर कांहीं एका मर्यादेला थंडपणा पोंचल्याबरोबर व धक्का लागल्याबरोबर 'क्रिस्टलायझेशन' होतें. ज्यांना तुम्ही बंडें म्हणतां त्यांचा प्रकार बहुधा असाच असतो.

पाहुणा—तर मग दैवावर हवाला ठेवून नुसती वाटच बघत बसावयाची काय ?

टिळक—मुळींच नाहीं. **प्रत्यक्ष बंडाच्या बाबतींत मी दैववादी असलों तरी त्याची मला जी तयारी म्हणून वाटते त्या बाबतींत मी पक्का उद्योगवादी आहें. माझ्या मतें हल्लींच्या स्थितींत कधीं काळीं जें बंड होईल किंवा न होईल त्याची तयारी म्हणजे आजच्या आज**

**पिस्तुलें आणवून तीं तरुण लोकांत वांटून देणें किंवा बाँबचे कार-खाने काढणें ही नव्हे. तर सार्वत्रिक व सामुदायिक असंतोष उत्पन्न करणें ही होय.** असंतोष हा शब्द सरकारला वाईट लागो पण तो सर्वथा न्याय्य आहे. देशाच्या आजच्या स्थितींत आम्हांला असंतोष वाटू नये तर काय संतोष वाटावा ? पण तो असंतोष आजच्या घटकेला तरी काडी ओढून पेटविण्यासारखा नसावा, तर पाणी तापवून हळूहळू तें अधिकाधिक उष्ण करण्यासारखा असावा. काडी पेटविल्यानें हात भाजेल व लागलीच तर कोठें थोडीशी आग लागेल. तिनें कदाचित् डोळे दिपले तरी काम होणार नाहीं. आग न लागतां, डोळे न दिपतां पाणी आधण येण्यापर्यंत तापवितां येतें. व त्यानेंच पाकनिष्पत्ति होते. आजच्या बंडाची माझी कल्पना इतकीच आहे कीं देशांतील शक्य तितक्या अधिक लोकांनीं सकारण रीतीनें असंतुष्ट बनावें, आणि जो लहानसहान स्वार्थत्याग करावा लागेल तो करण्याला शिकून ज्या ज्या ठिकाणीं परकी राज्याच्या देहाचा स्पर्श होईल तेथें येथें त्याच्या शक्तीचा प्रतिकार करावा. व्यक्तिपराक्रमानें व्यक्तिस्वभावाचें समाधान होतें. उलट देशांतील दहावीस लक्ष लोक लढाईला उभे राहण्याला एकदम सिद्ध होणार नाहींत व सिद्ध झाले तरी त्यांना साधनें एकदम मिळणार नाहींत. म्हणून पहिल्या पायऱ्या आपल्या स्वाधीन व शेवटची देवाच्या स्वाधीन असें समजून लोकांना असंतुष्ट, धीट, बाणेदार, स्वाभिमानी व स्वार्थत्यागी होण्याला शिकविलें पाहिजे. अशा गुणांनीं केलेल्या चळवळींत व्यक्तिपराक्रमाला जागा असते, संधि सांपडते व पराक्रमाचें चीजहि होतें. पण पुढें बंड करण्याकरितां आज अत्याचार शिकवावयाचे ही गोष्ट मला सयुक्तिक वाटत नाहीं. तुम्हीच सांगा कीं हें पिस्तुल, रसायनविद्या व यंत्रविद्या अशा तीन गोष्टी घेऊन तुम्ही आज आपल्या गांवीं परत चाललां आहांत. मग तुम्ही स्वतः त्यांचा उपयोग काय करणार आहांत ?

पाहुणा—प्रथम मी यंत्रकलेचा उपयोग करून पाहाणार. कारण कांहीं असलें तरी मला जगलें हें पाहिजे. आणि चरितार्थ चालवितां चालवितां इतर दोन विद्यांचा उपयोग मला किंवा लोकांना काय करून देतां येईल तो देईन.

टिळक—पण तुम्ही तरी ही बंडाची तयारी करतां आहांत असें मी

म्हणूं का ? पण मी हें आज कशाला बोलूं ? तुम्ही आज गांवीं जा. यांत्रिक कारखाना सुरू करा. संसाराच्या मागें लागा. आणि पांच वर्षांनीं पुनः भेटा, म्हणजे याच विषयावर बोलूं. असें मात्र समजूं नका कीं तुमच्या अंगांतील तेज व धाडसीपणा यांची किंमत मी करीत नाहीं. पण तुमचे विचार कृतींत उतरण्याला या देशांत किती मोठ्या मर्यादा आहेत, तुमचें पिस्तुल गंज खात कसें पडेल, आणि तुमच्या रसायनविद्येला लायक विद्यार्थी किती मिळतील हें तुमचें तुम्हालाच कळून येईल, हाच माझ्या बोलण्याचा अर्थ. आमच्या वेदांतांतलेंच उदाहरण तुम्हाला देतों. आत्मा हा शुद्ध, बुद्ध व चैतन्यात्मक आहे ही गोष्ट खरी. तथापि त्याला जड देहाचाच आश्रय करावा लागतो. त्याप्रमाणें बंडखोरीची बुद्धि हा स्वतंत्र्याचा आत्मा खरा. तरी पण त्याला नित्यस्वरूपाच्या राजकारणाच्या जडदेहाचाच आश्रय करावा लागतो. राजकारणाचें हें नित्यकर्म सहजच रूक्ष, नीरस, नाशवंत असें वाटतें. पण त्याचा आधार घेतल्याशिवाय बंडखोरी ही फळाला येत नाहीं. आतां मनुष्यात्मे तितके सगळे देहधारीच असले तरी मनुष्या-मनुष्यांत फरक असतोच. म्हणूनच अधम तो अधम व साधु तो साधु. त्या रीतीनें राजकारणांतहि सर्वच कांहीं एका माळेचे मणी असत नाहींत व असून चालणारहि नाहीं. मीं जन्मांत पिस्तुलाला किंवा बंदुकीला हातहि लावलेला नाहीं. तरी पण सात वर्षें तुरुंगांत जाऊन येऊन मीं एवढें तरी सिद्ध केलें असेल कीं अत्याचारीपणा नसतांहि राजकारण थोडें-बहुत तीव्र होऊं शकतें. मी हें अहंकारानें बोलत नाहीं. पण राजकारणाच्या नित्यकर्माला मी किती महत्त्व देतों हें दर्शविण्याकरतांच हें बोललों. खरोखर मनांत भीति न धरतां मी स्पष्टपणें प्रजेच्या न्यायनिष्ठ हक्कांसंबंधानें बोलत आलों यापेक्षां मीं वास्तविक अधिक पराक्रम तरी कोणता केला ? पण लोकांमध्यें अजून ही साधी गोष्टहि आली नाहीं. येवढ्याचकरितां ते मला मोठा म्हणतात. माझी इच्छा इतकीच कीं हा माझा मोठेपणा निघून जावा व मी करतों इतकें पुष्कळ लोकांनीं करावें. कारण माझ्याइतके व माझ्याहून अधिक बुद्धिमान् असे लोक या देशांत कितीतरी आहेत. मीहि तामसी वृत्तीचा आहें. नाहीं असें नाहीं. तुमच्यासारखें माझ्या हातीं पिस्तुल असलें आणि मीं कोठें न सोसवेल असा प्रत्यक्ष वैयक्तिक

जुलूम पाहिला तर माझा किंवा इतरांचा स्वाभिमान व अब्रू रक्षण करण्याकरितां मीहि हटकून त्याचा उपयोग करीन व अत्याचारी या नांवाला मात्र होईन. व तसा झालों तर त्याचें भूषणच मानीन. तुम्ही देखील अशा उपयोगाकरितां हें तुमचें पिस्तुल जरूर राखून ठेवा. पण तुम्ही बंडखोरीच्या ज्या कल्पना परदेशाहून घेऊन आलेले आहांत त्यांचा उपयोग आज देशांत नाहीं इतकें मात्र मी तुम्हाला म्हणेन. न्याय्य मार्गांत झालेल्या सशस्त्र प्रतिकाराला अत्याचार कोणीच म्हणत नाहीं. पण असे सशस्त्र सत्याग्रही यदृच्छेनें कोठें कोठें निर्माण झाले तरी त्याला मी बंडाची तयारी मात्र म्हणणार नाहीं.

अत्याचारी लोकांशीं टिळकांचा संबंध येत असे याविषयीं आणखी दोन शब्द सांगतों. कोणतीहि चळवळ करणारा कंपू घेतला असतां त्याला एकप्रकारें सैन्याचें स्वरूप असतें. म्हणजे सैन्यांत जशीं निरनिराळीं पोटदळें असतात तशींच चळवळ करणाऱ्या कंपूमध्येंहि असतात. आणि सैन्यातील प्रत्येक पोटदळाच्या वर्तनाची जबाबदारी सेनापतीवर असते त्याप्रमाणें चळवळी कंपूतील प्रत्येक भागाच्या वर्तनाची जबाबदारी पुढाऱ्यांवर असते ही गोष्ट तात्त्विक दृष्ट्या खरी आहे. दोहोंत फरक इतकाच कीं सैन्यामध्यें शिस्तीचे नियम अधिक कडक असतात, पण खाजगी पक्ष किंवा कंपू यांच्यामध्यें शिस्तीची आवश्यकता असली व ती त्यांतील लोकांनीं सामान्यतः मानली तरी लष्कराइतक्या परिणामकारक रीतीनें त्या शिस्तीचा अंमल होऊं शकत नाहीं. ऑलिव्हर क्रॉमवेल याच्या चळवळींत त्याच्या हाताखालील लोकांना कांहीं लष्कराचें व कांहीं राष्ट्रीय चळवळ करणाऱ्या खाजगी कंपूचें स्वरूप होतें. आणि त्याला वरील दोन्ही स्थितींतला अनुभव आला होता. त्यासंबंधानें त्यानें उद्गार काढले ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो, " हल्लींच्या परिस्थितींत मी जें कांहीं स्वतः करतों त्याची जबाबदारी मी घेतच आहें. पण ज्या गोष्टी मी स्वतः करीत नाहीं त्यांचीहि जबाबदारी मला घ्यावी लागत आहे. याचें कारण मी पुढारी बनलों आहें म्हणून. एखादे वेळीं पहावें तों असें घडतें कीं भावना अतिशय तीव्र वाढते, मूर्ख वेडे बनतात, आणि शहाण्यांना देखील असे

प्रसंग येतात कीं हे लोक बोलतांना व वागतांना शुद्धीवर तरी आहेत कीं नाहीं कोण जाणे !" क्रॉमवेल याचा चरित्रकार जॉन मोर्ले यानें या गोष्टीला उद्देशून असें म्हटलें आहे कीं, " पुष्कळदां अशा पुढाऱ्याचें काम म्हणजे अनुयायांनीं उत्पन्न केलेल्या परिस्थितीशीं झगडत बसणें हेंच होऊन बसतें. अनुयायांनीं कांहीं असें सुचवावें कीं तें याला प्रत्यक्ष मोडून तर काढतां येत नाहीं. पण फारच झालें तर तें लांबणीवर टाकणें, त्याला थोडी कलाटणी देणें, अंगावर घेतल्यासारखें दाखवून परतवणें, समजूत घालून मोडून काढणें, इतकेंच त्याला करतां येतें. यामुळें तो परिस्थितीचा कांहींसा दासच होऊन राहतो. पण ही अडचण खरी म्हणून जर तो पुढारी बनणार नाहीं, अनुयायांचा कंपू जुळवून तयार करणार नाहीं, तर त्याच्या हातून कोणतेंहि कार्य तरी कसें होईल ? अर्थात् अशा मनुष्यावर टीका करतांना टीकाकारांनीं थोडी सूक्ष्म दृष्टि चालवावी लागते व त्या दृष्टींत सहानुभूतीहि असावी लागते." कोणताहि सरकारी नोकर जी एखादी चूक करतो तिची तात्त्विक जबाबदारी सरकारावर असते तितकीच अनुयायांच्या कृत्याबद्दलची जबाबदारी पुढऱ्यावर आहे अगर नाहीं असें समजलें पाहिजे. म्हणजे तात्त्विक दृष्ट्या ती आहे खरी पण प्रत्यक्ष व्यवहारदृष्ट्या ती नाहीं. एखाद्या सैनिकाच्या अत्याचाराबद्दल जर सेनापतीला फांशीं देत नाहींत तर अनुयायांच्या अत्याचाराबद्दल पुढाऱ्याला फांशीं देण्याला कां काढावें ? कांहीं एका मर्यादेपलीकडे जबाबदारी ही प्रत्येक व्यक्तीच्या कृत्यावरूनच ठरवावी लागते. एरवीं समाजांत देखील लोक एकत्र राहातात त्याप्रमाणें राहतां येणें शक्य नाहीं. राजकीय पक्ष घेतले असतां त्यांच्या घटनेंत व कार्यांत फरक काय असतो हें वर दर्शविलेंच आहे. अर्थात् अशा पक्षांतील एखाद्यानें स्वतंत्र रीतीनें व आपल्या जबाबदारीवर जर एखादी गोष्ट केली आणि ती सामुदायिक उद्देशांत पडत नसली तर तिजकरतां पुढाऱ्याला जबाबदार धरणें किंवा दोष देणें हा अन्याय होय.

[ ११ ]

## लो० टिळकांचा तह-परिषदेस अर्ज

लो० टिळक चिरोल खटल्यासाठीं—व नंतर राजकीय चळवळीसाठीं—

विलायतेस असतांनाच ( ३० ऑक्टोबर १९१८ ते ६ नोव्हेंबर १९१९ ) दिल्लीच्या कॉंग्रेसमध्यें ( ३१ डिसेंबर १९१८ ) शांतता-परिषदेला शिष्ट-मंडळ धाडण्याचा १३ वा ठराव पुष्कळच बहुमतानें संमत झाला. त्या शिष्टमंडळांत 'मि. बाळ गंगाधर टिळक, मि. ओम. के. गांधी व मि. सय्यद हसन इमाम' यांची योजना केलेली होती. शांतता-परिषदेला कॉंग्रेसतर्फे जाण्याची अर्थात् टिळकांची इच्छा होती. पॅरिसला जाण्यासाठीं प्रवासपरवाना त्यांनीं ब्रिटिश सरकाराकडे मागितला. पण इंडिया ऑफिसनें २८ जानेवारीला ही मागणी नाकारली. प्रत्यक्ष जातां येत नाहीं तर शांतता-परिषदेपुढें हिंदुस्थानाचें म्हणणें अर्जरूपानें तरी मांडावें म्हणून टिळकांनीं ओक अर्ज तयार केला. तो अर्ज शांतता-परिषदेकडे पाठवावा अशी टिळकांनीं इंडिया ऑफिसला विनंती केली. पण दि. २९ एप्रिल १९१९ रोजीं याहि संबंधांत त्यांनीं 'आम्हांला अर्ज पाठवावयाचा नाहीं' असें कळविलें. यामुळें हा अर्ज प्रत्यक्षपणें परिषदेचे अध्यक्ष 'मॉसिअ जॉर्ज क्लेमेंसो' यांच्या हातीं सनदशीर पद्धतीनें जाणें अशक्यच झालें. तथापि एडगर वॉलेस नांवाच्या एका गृहस्थाकडून टिळकांनीं पॅरिसमध्यें खटपट करवून शांतता-परिषदेंतील काहीं प्रमुखांच्या हातीं आपलें वक्तव्य पडावें अशी व्यवस्था केली असावी. "क्लेमेन्सो यांना तुम्हीं पाठविलेलें पत्र त्यांना पोहोचलें इतकें मला पक्कें कळलें...पॅरिसमधील तुमच्या कांहीं स्नेह्यांनीं लॉयड् जॉर्ज यांची गांठ घेतली...प्रेसिडेंट विल्सन यांजकडे तुम्ही पत्रव्यवहार केला त्याचा कांहीं सुपरिणाम झाला..." असें हे गृहस्थ २३ मे १९१९ च्या पत्रांत टिळकांना लिहितात. १९१९ च्या प्रतिकूल परिस्थितींत तयार झालेला हा अर्ज प्रस्तुत परिस्थितींत, आणि विशेषतः युद्धाचा शेवट व आगामी तह-परिषद दृष्टिपथांत येत असतांना, लोकमान्य टिळकांचें राजकीय मतनिदर्शन म्हणून श्री. केळकरकृत लोकमान्यांच्या चरित्रांतून पुनर्मुद्रित केला आहे. ( खंड ३ रा; भाग ५, परिशिष्ट ( १ ), पृ. ९२-९६ ). अर्ज असा—

( १ ) तहपरिषदेनें प्रसिद्ध केलेल्या नियमांतील नियम नं. ११स अनुसरून आणि दिल्ली-कॉंग्रेसच्या पुढें दिलेल्या ठरावाच्या आधारें मी अशी विनंती करतों कीं, आपण हा अर्ज अनुकूल विचाराकरितां तहपरिषदेपुढें मांडावा.

( २ ) तहाच्या अटी ठरविण्याकरितां जमलेल्या परिषदेनें ' हिंदुस्थान हें एक विशिष्ट हितसंबंध असलेलें युद्धयमान राष्ट्र असून ब्रिटिश साम्राज्याच्या वतीनें जो प्रतिनिधिसमूह हजर राहील त्याच्याशिवाय हिंदुस्थानाच्या वतीनें दोन प्रतिनिधि तहपरिषदेंत हजर राहावे." असा ठराव केलेला ऐकून हिंदुस्थानास निर्भेळ आनंद झाला आहे. परंतु हल्लीं हिंदुस्थानांत जी अनियंत्रित राज्यपद्धति आहे त्या पद्धतीमुळें हिंदुस्थानाच्या वतीनें हिंदी राष्ट्राला जबाबदार असा मंत्री तहपरिषदेकरितां प्रतिनिधि म्हणून येऊं शकत नाहीं हें दुर्दैव होय. राजकीय दृष्ट्या हिंदुस्थानाचे एक ' ब्रिटिश इंडिया ' व दुसरा 'नेटिव्ह संस्थानें' असे दोन विभाग पडतात. यांतील नेटिव्ह संस्थानांच्या वतीनें हिंदुस्थान सरकारनेंच बिकानेरच्या महाराजांची निवडणुक केली आणि ब्रिटिश इंडियाच्या तर्फे सर सत्यप्रसन्न ( आतां लॉर्ड बनलेले ) सिंह यांची योजना केली. परंतु ही निवडणूक लोकमत न विचारतां व लोकांची संमतीहि न घेतां करण्यांत आली आहे. यासंबंधीं लोकमत काय आहे तें दिल्ली येथील काँग्रेसच्या अध्यक्षांच्या भाषणावरून दिसून येईल. अध्यक्ष म्हणाले, ' हिंदी लोकांचे जे प्रतिनिधि कौन्सिलांत आहेत त्यांच्या शिफारशीस अनुसरून हिंदुस्थान सरकारनें नेमलेला असा आमचा प्रतिनिधि तहपरिषदेंत नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.' हा दोष दूर करण्यासाठीं दिल्लीच्या काँग्रेसनें मि. गांधी, मि. सय्यद हुसेन व प्रस्तुत अर्जदार मि. टिळक या तिघांची प्रतिनिधि म्हणून निवडणूक केली.

तहपरिषदेंत हिंदुस्थानाच्या तर्फे वेगळा प्रतिनिधि घेण्याचा ठराव झालेला कळतांच मी इंग्लंडच्या प्रधानांस पत्रद्वारें अशी सूचना केली कीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संस्थांनीं मिळून एकंदर १२ प्रतिनिधि निवडावे आणि मग त्यांतून योग्य प्रतिनिधींची वेळोवेळीं निवड व्हावी. परंतु स्टेट सेक्रेटरींनीं ' या सूचनेस मला पाठिंबा देतां येत नाहीं ' असें उत्तर पाठविलें. सुधारणेच्या योजनेसंबंधीं सरकार व हिंदी प्रजा याच्यांत जो मतभेद उत्पन्न झाला आहे तो लक्षांत घेतां स्टेट सेक्रेटरींचा हा नकार शोचनीय आहे. अशा परिस्थितींत तहपरिषदेचा नियम नं. ११ यास अनुसरून मी पुढील विनंति-अर्ज परिषदेच्या विचाराकरितां पाठवीत आहें. या छोट्या अर्जांत

सुधारणेच्या योजनेविषयीं लोकमताची बाजू सविस्तर पुढें मांडणें शक्य नाहीं. परंतु माझी बाजू कोणत्याहि कमिटीपुढें मांडावयाला किंवा मला 'पासपोर्ट' मिळाल्यास तहपरिषदेपुढें समक्ष प्रतिपादन करण्याला मी तयार आहें. दिल्ली काँग्रेसचा माझ्या निवडणुकीचा ठराव होण्याच्या पूर्वीच 'वर्तमानपत्रकार' या नात्यानें मी तहपरिषदेस जाण्याविषयीं 'पासपोर्ट' मागितलें होतें. परंतु 'प्रेक्षक म्हणून परिषदेला हजर राहाण्याची तुमची इच्छा सफल होऊं शकणार नाहीं.' असें म्हणून ब्रिटिश सरकारनें मला पासपोर्ट देण्याचें नाकारलें.

( ३ ) जगांतील शांतता कायम राखणें आणि हिन्दी लोकांची प्रगति साधणें या उभय दृष्टींनीं हिंदुस्थानचा प्रश्न उत्तम रीतीनें सोडविणें किती अगत्याचें आहे हें कांहीं सांगावयास नको. हिंदुस्थान हा स्वतःपूर्ण देश आहे. त्याचा दुसऱ्या कोणत्या देशावर डोळा नाहीं आणि त्याच्या महत्त्वाकांक्षेचें क्षेत्रहि हिंदुस्थानच्या बाहेर कोठेंहि नाहीं. या देशाचा अफाट विस्तार, मोठी लोकसंख्या आणि विपुल साधनसंपत्ति यांच्या जोरावर हा देश जगांतील नाहीं तरी आशिया खंडांतील प्रमुख राष्ट्र होऊं शकेल. अर्थातच शांतताभंग करूं पाहणाऱ्या कोणत्याहि राष्ट्राविरुद्ध ब्रिटिश साम्राज्याची शाश्वती राखण्याला आणि पूर्व-गोलार्धांत शांतता राखण्याचें कार्य करण्याला हा देश राष्ट्रसंघाचा योग्य मुनीम होऊं शकेल. परंतु जोंपर्यंत हल्लींप्रमाणें हिंदुस्थान देश शृंखलाबद्ध आहे तोंपर्यंत त्याला राष्ट्रसंघांत योग्य स्थान मिळणें आणि जगांत शांतता राखण्याचें संघाचें कार्य करण्याची शक्ति त्यास येणें शक्य नाहीं. शिवाय हिंदुस्थान देश जर असा प्रबळ न होईल तर तो देश स्वतः युरोपियन राष्ट्रांच्या कलहाचें एक बीज होऊन राहील. आणि या कलहांत यापुढें आशियांतील व अमेरिकेंतील राष्ट्रांचीहि भर पडेल. या राष्ट्रांमध्यें हिंदुस्थान देश जिंकण्याविषयीं नसली तरी हिंदुस्थानांतील कच्च्या मालाविषयीं चढाओढ सुरू होईल आणि त्याचें पर्यवसान असूया व मत्सर यांत होऊन युद्धापर्यंतहि पाळी येईल. जोंपर्यंत हिंदुस्थानाला अंतर्गत कारभारांत आणि व्यापार-धोरणांत स्वराज्य मिळालें नाहीं आणि जोंपर्यंत व्हाइट हॉलमधून ( इंग्लंडकडून) हें धोरण ठरविलें जातें तोंपर्यंत त्या धोरणाविषयीं हिंदुस्थान, आशिया व युरोप यांमध्यें साशंक वृत्ति कायम राहणार. यास्तव जगाच्या शांततेच्या

दृष्टीनें आणि राष्ट्रसंघाचा पूर्व दिशेचा आधारस्तंभ या दृष्टीनेंहि हिंदुस्थानला अंतर्गत कारभारांत स्वराज्य मिळणें जरूर आहे.

( ४ ) कानडा, ऑस्ट्रेलिया, दक्षिण-आफ्रिका, इत्यादि वसाहतींप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यांत राहून हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याखेरीज जगाच्या एक-पंचमांश लोकवस्तीच्या या देशांत संतोष किंवा शांतता नांदणें शक्य नाहीं. स्वराज्याखेरीज खरी प्रगति होऊं शकत नाहीं. परकी अंमलाखालीं कल्पनाशक्तीस वाव मिळत नाहीं आणि आत्मप्रत्ययाला तर आधारच राहात नाहीं. अशाच शेंकडों अदृश्य मार्गांनीं परवशता ही राष्ट्राचें पौरुष खच्ची करते आणि त्याच्या नैतिक व भौतिक सुधारणेचीहि कुचंबणा होते.

जर्मनीच्या भीतिप्रद जुलुमांतून जगाची मुक्तता करून या महायुद्धानें ‘ नव्या युगा ’ स प्रारंभ केल्यानंतर आतां कोणत्याहि सुधारलेल्या देशावर त्याच्या इच्छेशिवाय दुसऱ्याचा अंमल, बाह्यतः त्याच्या कल्याणासाठीं म्हणून देखील, चालूं नये हें सांगावयाची आवश्यकता राहिली नाहीं. या देशांतील नानाविध घोटाळ्याचे प्रश्न सोडविण्याकरितां हिंदुस्थानाला ‘ स्व-संमतीचें’ तत्त्व लाविलें जावें, हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, अशी हिंदुस्थानाची मागणी आहे. हे प्रश्न परकी लोकांकडून सोडविले जाणार नाहींत. पाश्चात्य संस्कृतींत मुरलेले परकी सत्ताधारी कितीहि बुद्धिवान् व सद्बुद्धीचे असले तरी हिंदी संस्कृतीविषयीं त्यांना खरी सहानुभूति व कळकळ असल्याविना त्यांनीं हे भानगडीचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी घेऊं नये. याच दृष्टीनें हिंदुस्थानांतील राष्ट्रीय सभा व मॉस्लेम लीग या दोन प्रमुख संस्थांनीं दिल्लीच्या बैठकींत “ हिंदुस्थान देश हा सुधारलेला देश असून त्यास ‘ स्वसंमती ’ चें तत्त्व लागू करावें ” असा ठराव केला.

हिंदुस्थानाला स्वसंमतीचें तत्त्व लागू न करण्याला वास्तविक कोणतेंच कारण नाहीं. त्याला अडथळा होतो तो अज्ञानी किंवा वतनदार बनलेल्या लोकांकडून होतो. हिंदुस्थानाची संस्कृति रोमच्याहि व अथेन्सच्याहि पूर्वीची आहे आणि युरोप खंडानें रानटी दशेंतून डोकें वर काढलें नव्हतें त्याच्या पूर्वीपासून कित्येक शतकें हिंदुस्थान सुधारलेलें राष्ट्र म्हणून गाजत आहे. शिकंदराची स्वारी हिंदुस्थानावर होण्यापूर्वीं कित्येक शतकें या देशांत लोक-

सत्ताक राज्यपद्धतीचेहि नमुने ठिकठिकाणीं होते. अर्थातच हिंदी लोक हे लोकसत्ताक पद्धतीला नालायक आहेत, असल्या, राष्ट्राची बदनामी करणाऱ्या, विधानांचा सर्व सुशिक्षित हिंदी लोकांकडून निषेध केला जातो. हिंदुस्थानाचें दारिद्र्य, शारीरिक ऱ्हास, औद्योगिक पुनरुज्जीवन, आर्थिक उन्नति, औद्योगिक शिक्षण, जाति व रूढी यांसंबधीं नाजूक प्रश्न या सर्वांचा केवळ पाश्चात्य संस्कृतींत वाढलेल्या परकीयांकडून निकाल होऊं शकणार नाहीं; तर तो हिंदी लोकांकडूनच होईल. या संबंधांत दिल्ली येथें भरलेल्या कॉंग्रेसनें हिन्दी लोकांच्या लायकीविषयीं ठराव केला असून इंग्लंडांत नॉटिंगहॅम येथें भरलेल्या मजूरसंघाच्या परिषदेनें हिंदुस्थान देश कानडा वगैरे वसाहतींप्रमाणें होमरूलला पात्र आहे असा ठराव केला आहे.

( ६ ) आतां हिंदुस्थानाला जी नवी सुधारणेची योजना देण्यांत येणार आहे तिच्याविषयीं २५ कोटि लोकांत एकमत होणें अशक्य आहे. बेल्जम देशावर जेव्हां जर्मनीचा अंमल चालू होता त्या वेळीं जर्मनीचा ताबा कायम राहावा असें म्हणणारे कांहीं बेशरम इसम खुद्द बेल्जममध्यें देखील आढळले; मग हिंदुस्थानांत तरी तसे लोक आढळल्यास नवल काय ? तथापि या लोकांना देखील हिंदी लोक स्वराज्याला अपात्र वाटत नसून त्यांना, अधिकाऱ्यांचा कल पाहून मागणी केल्यास ती सुलभपणें साध्य होईल, असें वाटतें एवढेंच काय तें ! हिंदु-मुसलमानांची जी एकी १९१६ सालीं घडवून आणण्यांत आली तीवरून हिंदी लोकांची यासंबधीं पात्रता चांगली सिद्ध होते. सरकारी अधिकाऱ्यांचा विरोध दिसत असूनहि बहुजनसमाजानें स्वसंमतीचें तत्त्व लागू करण्याची मागणी केली असून " सुधारणेची सरकारी योजना निराशाजनक व असमाधानकारक आहे " असें मत दिलें आहे.

[ यानंतर सदरहू अर्जांत हिंदुस्थानांतील हल्लींची राज्यपद्धति कशी आहे आणि मॉंटेग्यु-चेम्सफर्ड योजनेनें तींत कोणते फरक केले जाणार आहेत त्यांचें विस्तृत विवेचन असून कॉंग्रेसच्या ठरावास अनुसरून त्या योजनेंतील दोषाविष्करण केलें आहे. आणि अखेरीस या अर्जाची पुढीलप्रमाणें परिसमाप्ति केली आहे. ]

( १४ ) वर जी सरकारी व बिन-सरकारी योजनांची तुलना केली त्यावरून हें दिसून येईल कीं, स्वातंत्र्य हें सर्व सुधारणेचें मूळ आहे, ही गोष्ट ब्रिटिश सरकारच्या ध्यानांत येत नाहीं. लोकसत्तेच्या तत्त्वावरच स्वतःची राज्यपद्धति ठरवून आपल्या अडचणींतून आपणच मार्ग काढण्याची देशास स्वतंत्रता पाहिजे. हल्लींच्या सुधारणेच्या युगांत कंटाळवाणी उमेदवारीची मुदत आणि दशवार्षिक कसोटी, या गोष्टी असह्य आहेत. लोकांना वरिष्ठ सरकाराच्या सभेंत भागीदारी पाहिजे आहे. ती मिळाल्यास स्वसंमतीच्या तत्त्वावर देशांत प्रांत किती असावे, त्यांच्या मर्यादा कोणत्या असाव्या, स्वराज्याचा पहिला हप्ता केवढा असल्यास तो पुरेसा होईल, आणि बाह्य मदत न घेतां अंतर्गत कारभारांत पूर्ण स्वातंत्र्य किती कालांत मिळावें, वगैरे प्रश्न सोडविण्यांत येतील. हिंदी लोकांना साम्राज्यांतून फुटून जावयाचें नाहीं अशी ब्रिटिशांची खात्री करण्याकरितां आम्ही लष्कर, आरमार, परराष्ट्रसंबंध, युद्ध व तह हीं खातीं आमच्याकडे मागत नाहीं. लष्करांत व आरमारांत हिंदी लोकांना युरोपियनांच्या जोडीनें कमिशनें मिळालीं म्हणजे बस्स आहे. मात्र पंधरा वर्षांनंतर स्वसत्ताक वसाहतींच्या जोडीनें त्यांच्याप्रमाणें आम्हांस सर्व बाबतींत सर्व हक्क मिळावे म्हणजे झालें.

( १५ ) अशा परिस्थितींत हिंदी राष्ट्रीय सभेनें निवडलेला हिंदुस्थानाचा प्रतिनिधि या नात्यानें माझी एवढीच मागणी आहे कीं, ब्रिटिश वसाहतींना राष्ट्रसंघांत प्रतिनिधि पाठविण्याचा जो हक्क आहे तसाच हक्क हिंदुस्थानालाहि मिळावा. हिंदी लोक स्वराज्य चालविण्यास पात्र असून हिंदुस्थान हें सुधारलेलें राष्ट्र असल्यानें त्याला स्वसंमतीचें तत्त्व लावण्यांत यावें आणि या संमतीच्या तत्त्वास अनुसरून त्यानें आपल्या परिस्थितीला योग्य अशा प्रकारची आणि लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या तत्त्वाला धरून असलेली अशी आपली राज्यपद्धति ठरवावी. सत्याचें शाश्वत तत्त्व आणि दंडुकेशाहीवर सत्याचा झालेला विजय लक्षांत घेतां हिंदुस्थानाविषयीं हें स्वसंमतीचें तत्त्व जाहीर करणें न्याय्य व जरूर आहे. असल्या जाहीर वचनानें हिंदुस्थानांतील ३१ कोटि प्रजेचीं अंतःकरणें अत्यंत उल्हासानें व कृतज्ञतेनें उचंबळून येतील हें तर खरेंच; पण याहून महत्त्वाची गोष्ट ही कीं, पार्लमेंटनें हिंदुस्थानासंबंधीं

स्वसंमतीच्या तत्त्वाचा पुकारा केल्यास जगांत शांतता नांदण्याची हमी देतां येईल, हिंदुस्थानाची भरभराट होईल, आणि आमच्या महान् हिंदी राष्ट्राशीं ब्रिटिश साम्राज्याचा कल्याणकारक संबंध होऊन तो कायम राहील.

[ १२ ]

## लो० टिळकांचें अमर राजकीय तत्त्वज्ञान

[ लो. टिळकांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त टिळक-स्मारक-मंदिरांत झालेलें श्री. न. चिं. केळकर यांचें भाषण. ]

### टिळकांचें व्यक्तिमत्त्व व धोरण

टिळकांचें व्यक्तिमत्त्व व त्यांचें राजकारणी धोरण यांविषयीं ९–१० मुद्दे मांडतां येतात. ते असे : टिळकांच्या ठिकाणीं देशभक्ति किती जाज्वल्य होती हें त्यांचा शत्रु व्हॅलंटाइन चिरोल यानें त्यांना 'हिंदी असंतोषाचे जनक' ही जी पदवी दिली, त्यावरून दिसून येईल. त्यांच्या देशाभिमानाचा अग्नी–आग हृदयांत होती, तोंडांत नव्हती. कांहीं लोक आपण असे पहातों कीं, त्यांची ही आग तोंडांत असते पण तोंडांतच विझते. ती खालीं हृदया-पर्यंत न पोचल्यामुळें त्यांच्या हातून देशभक्तीचें भरीव कार्य कांहींहि होत नाहीं. तोंडांत वाळलेली आंब्याची कोय धरून, तिच्या पोटात धुमसता कापूस ठेवून, तोंडच्या फुंकरानें बाहेर धूर व ज्वाळा प्रकट करणारे डोंबारी, बहुरूपी, गारुडी यांपैकीं कोणी तरी आपण पाहिले असतीलच. तोच प्रकार देशभक्त म्हणविणाऱ्या पण बेछूट अशा अनेक वक्त्यांचा असतो. गाईला तोंडांत धरणाऱ्या वाघापासून तिला सोडवितांना अहो वाघोबा, अरे वाघा, वाघऱ्या, वाघ्या, वाघड्या, वाघिर्ड्या कांहीं म्हटलें तरी अर्थ तोच. पण बोलणाराची वेगवेगळी संस्कृति दिसून येते.

### कायद्याशीं कुस्ती करणारे टिळक

याच्या उलट टिळक असा दावा सांगत कीं, मी जहाल बोलत नसतों व कायदा सोडूनहि बोलत नसतों त्यांच्या व्याख्यानी शब्दांत एक प्रकार-चा नेमस्तपणा, सावधपणा असे. पण त्याचें कारण त्यांची अंतर्बाह्य संस्कृति. यामुळें त्यांच्या शब्दांत ग्राम्य बेछूटपणा नसे; व त्यांच्यावर खटला करणाऱ्या सरकारलाहि ते कायदा सोडून बोलले हें शाबीत करणें फार कठीण जाई.

'मीं गुन्हा केला' असें म्हणण्याची नवी प्रथा कायदेभंगाच्या चळवळी-पासून सुरू झाली. त्यापूर्वीची प्रथा अशी कीं, आम्ही कायद्याचें उल्लंघन न करतां बोलूं, पण त्यांतच आमचा सर्व आशय जनतेच्या मनावर ठसवून देऊं. हा तारेवरचा नाच ही त्यावेळीं एक कलाच ठरे. टिळकांचा हा नेमस्तपणा इकडे त्या वेळीं आलेल्या नेव्हिनसन्सारख्या कित्येक युरोपियन वर्तमान-पत्रांच्या प्रतिनिधींना मोठा चमत्कारिक वाटला. त्यांनीं लिहिलें कीं, 'बाहेर तर कीर्ति ऐकतों कीं टिळक जहालांतले जहाल; पण प्रत्यक्ष टिळक बोल-तात त्या वेळीं त्यांच्या शब्दांत किंवा मागणींतहि जहालपणा असा दिसत नाहीं.' तात्पर्य, टिळकांचें धोरण कायद्याशीं कुस्ती खेळण्याचें होतें; कायद्या-वर अत्याचार करण्याचें नव्हतें; आणि अत्याचार व कुस्ती यांतील फरक आपण तेव्हांच ओळखाल.

## टिळकांनीं दहा आणे स्वातंत्र्य मागितलें

टिळकांच्या वेळीं राजकीय मागण्यांचें स्वरूप (काँग्रेसच्या मागण्यांचेंहि स्वरूप) एक एक पैसा मिळवून ६४ पैशांचा रुपाया करणें अशा स्वरूपाचें प्रथम होतें. पण पुढें सुमारें ४–५ आण्यांचे पैसे पदरांत पडल्यावर त्यांना व लोकांना दिसून आलें कीं, आतां दिडक्या न मागतां चवली, पावली, अधेली अशीं नाणीं मागावीं. पण टिळकांच्या वेळीं स्वातंत्र्य व स्वराज्य यांचा मिळून होणारा बंदा रुपया मागण्यांत आला नाहीं. त्यांनीं 'होमरूल' मागितलें म्हणजे फार तर दहा आणे स्वातंत्र्य मागितलें असें म्हणतां येईल. पण हा क्रम १९२९ पर्यंत स्वतः काँग्रेसनेंहि स्वीकारला होता. कारण त्या सालीं पं. मोतीलाल नेहरू यांनीं काँग्रेसपुढें जी राज्यघटना मांडली तींत वसाहतीचेंच स्वराज्य मागितलें होतें. संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी त्यानंतर सुरू झाली, व ती परवां ब्रिटिश प्रधान-मंडळानें जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यांत प्रथमच देऊं केली आहे. मात्र ती पदरांत केव्हां पडेल ती पाहूं.

## प्रतिसहकारितेची कुळकथा

होमरूलच्या स्वरूपाचें स्वराज्य मागण्याच्या वेळेपासून सरकारचें तोंड प्रजेकडे फिरून, तें प्रजेला प्रथमच विचारूं लागलें कीं, तुम्हाला काय हवें तें आपल्या तोंडानें सांगा. तें मानण्याला आम्ही तयार आहों. त्यापूर्वीचें

त्यांचें म्हणणें असें कीं, काय द्यावें हें आम्हांला कळतें. तें आमचें आम्ही देऊं. व तें घेऊन तुम्ही संतुष्ट राहावें. सरकारनें तोंड फिरवून वाटाघाटीच्या गोष्टी काढल्या तेव्हां टिळकांचें प्रतिसहकारितेचें धोरण पुढें आलें. त्यापूर्वी बहुतेक सर्व धोरण सहकारितेचें व क्वचित् अडवणुकीचें असें होतें. पण प्रति-सहकारितेंत सहकारिता व असहकारिता दोनहि जुळून बसतात. टिळकांच्या मृत्यूच्या वेळीं त्यांचें हेंच धोरण होतें. सर्वस्वी असहकारितेचें नव्हतें.

## टिळकांना क्रांतिकारक व मवाळ सारखाच

साधनांच्या बाबतींत टिळकांचें धोरण सर्वसमावेशक होतें, म्हणून राष्ट्रीय सभेसारख्या सभेंत अगदीं मवाळापासून क्रांतिकारकापर्यंत सर्वांना जागा व स्थान असावें असें त्यांचें प्रतिपादन असे. अमुक एक क्रांतिकारक म्हणून किंवा अमुक एक मवाळ म्हणून त्यांनीं त्याला कधीं दूर ठेवला नाहीं किंवा त्याचा विटाळ मानला नाहीं. हिंदुधर्माच्या व्याख्येंतल्याप्रमाणें देशभक्तीच्या व्याख्येंतहि ‘ साधनानां अनेकता ’ हें त्यांचें सूत्र होतें.

## न्यायाधिशाला डाफरलें

त्यानंतर निर्भयता. ही त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें दाखवून दिली. म्हणूनच सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा सांगणाऱ्या न्यायाधिशाच्या तोंडावर त्यांना सांगतां आलें कीं, ‘ मला शिक्षा दे, पण तुझा बाप वरचा न्यायाधीश सगळ्या जगाचा न्याय करणारा वर बसला आहे तो तुला पाहून घेईल आणि माझ्या कष्टांचें फल माझ्या देशाच्या पदरांत टाकील.’

## टिळकांच्या पाठीशीं धनिक नव्हता

स्वार्थत्याग हा गुणहि टिळकांनीं स्वतःच्या उदाहरणानें लोकांना शिकविला व आचरून दाखविला. एका केसरीच्या कायदेशीर उत्पन्नाव्यतिरिक्त त्यांना बहुतेक काळ राजकारणाला एक पैसाहि बाहेरून मिळाला नाहीं. आज काँग्रेसच्या राजकारणाला लक्षावधीच काय पण कोट्यवधि रुपये मिळाले आहेत; त्यामुळें तिच्या राजकारणाला तेज व जोर आला आहे. पण टिळकांची महात्मता हीच कीं, ‘ होमरूल लीग फंड ’ जमेपर्यंत तरी त्यांनीं स्वतःची चळवळ सर्वस्वी स्वतःच्या पैशांतूनच केली. त्यांच्या मागें एकहि धनिक उभा नव्हता.

## टिळकांचें लोकसंग्रहत्व गांधींनीं चालविलें

लोकसंग्रह करण्याचें वळण टिळकांनींच प्रथम जनतेपुढें ठेवलें. त्यांना ' तेल्यातांबोळ्यांचे पुढारी ' ही पदवी प्रतिष्ठित नेमस्त मवाळ पक्षानें दिली. परंतु ती त्यांना भूषणास्पद असून, शिवाय या पदवीनें त्यांनीं जनतेच्या घरांत शिरण्याला राजकारणाचा दरवाजा प्रथम उघडून दिला. मात्र हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे कीं, म० गांधींनीं या धोरणाचा उपयोग पुढें इतका केला कीं, त्यांना समाजांतील कोणत्या हलक्या थराचे पुढारी म्हणावें याचें वर्णन करण्याला शब्दच उरला नाहीं. डॉ. आंबेडकर हे गांधींना कांहीं एका विशेष धोरणानें शिव्या देवोत; तथापि गांधी मुंबईत, दिल्लींत भंगी लोकांच्या वस्तींत जाऊन राहिले ही एकच गोष्ट त्यांच्या लोकसंग्रहाची उत्तम द्योतक आहे. राजकारणांत ओढून आणण्याला समाजांतील कोणताहि वर्ग गांधींनीं आतां शिल्लक ठेवला नाहीं. पण याचें मूळ टिळकांनीं घालून दिलें हीहि गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं.

## टिळकांनीं काळाला कलाटणी दिली

असो. अशा सूत्रबद्ध रीतीनें टिळकांच्या व्यक्तीचें, देशभक्तीचें, आणि राजकारणाच्या धोरणाचें थोडक्यांत वर्णन करतां येईल. स्वतः टिळकांची राजकारणी भाषा सुसंस्कृत व तेजस्वी असली तरी शब्दमर्यादा ओळखणारी अशी होती. याच्या उलट आज रस्त्यांतलें एखादें टारगट शेंबडें पोरहि अत्यंत अचकट विचकट ग्राम्य शब्दांनीं इंग्रज साहेबाला, अधिकाऱ्याला, ' तूं या देशांतून चालता हो ! तुझ्या कुल्ल्यावर लाथ मारून तुला हाकून देऊं. ' असें उघड म्हणतें. परंतु त्याकरितां हें पोर टिळकांपेक्षां अधिक देशभक्त असें कोणी म्हणेल काय ! आजची भाषा हा काळाचा महिमा आहे; परंतु त्या काळाच्या चक्राला प्रथम कलाटणी दिली टिळकांनीं. म्हणूनच त्यांना ' असंतोषाचे जनक ' ही पदवी मिळाली. पण पहा ती किती सुसंस्कृत शब्दांनीं बनविलेली आहे.

## पराक्रमी कोण ? बाप कीं मुलगा ?

पुढची पिढी ही शब्दानें व कृतीनें मागच्या पेक्षां पुढें जाणार व तिला अधिक दूरचें दिसणार म्हणून ती अधिक दूरचें बोलणार. परंतु बापाच्या

खांद्यावर बसलेल्या मुलाला बापापेक्षां अधिक दूरचें दिसलें, म्हणून तें मूल कांहीं बापापेक्षां अधिक पराक्रमी ठरत नाहीं. उलट खांद्यावरील या मुलाला त्या बापानेंच निर्माण केला हा प्राथमिक पराक्रम जमेस धरावा लागतो.

## आकाशांत चढलेले पक्षोपपक्षांचे पतंग

असो. टिळकांचेंच राजकारण आज किती मुखांनीं, किती रूपांनीं, प्रकट झालें आहे हें विचारी माणसाच्या लक्षांत तेव्हांच येईल. आजच्या राजकारणांतील कोणतीहि गोष्ट घेतली तरी तिचें मूळ वर सांगितलेल्या टिळकवर्णनाच्या ९ सूत्रांतच बसलेलें दिसेल. मग नवीन पक्ष-उपपक्ष कितीहि निर्माण होवोत. हें पक्षवैचित्र्य जितकें मनोरंजक तितकेंच मनाला घोटाळा उत्पन्न करणारें आहे. त्या सर्वांत मिळून एकच कल्पना खेळत आहे. मात्र या पक्षोपपक्षांमध्यें जी एक प्रकारची स्पर्धा व चुरस दिसून येत आहे ती देशाला कदाचित् घातक ठरेल कीं काय अशी भीति मनाला वाटते. हल्लींच्या या पक्षोपपक्षांचें वर्णन मी खालील काव्यशब्दांनीं करूं इच्छितों. माझ्याच एका नाटकांत मीं स्त्री-स्वभावाचें वर्णन करतांना खालील कविता लिहिली होती.

गूढ मनोरथिं बांधुनि दोरा।
सूक्ष्म वृत्तिचा घालुनि वारा॥
उडविती पतंग विविध रंग॥

या शब्दांतील ‘सूक्ष्म’ याच्याऐवजीं ‘वीर’ एवढा शब्द घातला म्हणजे जें स्त्रीचारित्र्याचें तेंच मुत्सद्दीचारित्र्याचें वर्णन ठरतें. या प्रत्येक पक्षाचे हेतु म्हणजे मनोरथ अंतःकरणांत खोल जाऊन बसलेले आहेत, आणि त्यांचें यथार्थ दर्शन बाहेर जसें होतें तसें तें नाहीं.

## काटाकाटींत कोणता पतंग टिकतो पाहूं

या मनोरथाला चळवळीचा दोरा किंवा सडा बांधून त्याच्या टोंकाला लावलेला एक पतंग ( ज्याला राजकारणीं धोरण, मॅनिफेस्टो म्हणतां येईल ) वर आभाळांत उडत असतो. हिंदी राजकारणांतील निरनिराळ्या पक्षांनीं वर उडविलेल्या पतंगांच्या रंगारूपाचें मी थोडें वर्णन केलें तर तें विनोदी होऊं

शकेल. परंतु आतां डोक्यावर पाऊस पडूं लागला म्हणून मी हें सर्व आवरतें घेतों. पण हे पतंग हल्लींच्या संशयग्रस्त स्थितीच्या दाट धुक्यांत वर जाऊन केव्हां केव्हां अदृश्य होत असले तरी त्यांना बांधलेल्या दोऱ्याची, सञ्याची रग हाताला लागते म्हणून पतंग अजून हवेंत वर उडतो आहे हें निश्चित टरतें. पण यांतील कांहीं पतंगांच्या सञ्यांना कांचेचें पाणी लावलेलें असल्यामुळें कोणता पतंग कोणत्या पतंगाला तोडून खालीं पाडतो हें पाहावयाचें आहे. मात्र शेवटीं इतकेंच सांगतों कीं भविष्यकाळ हा आशाप्रद आहे, उमेद बाळगण्यासारखा आहे.

## परतंत्र देश पन्नास वर्षांत स्वतंत्र झाले

टिळकांना निवर्तल्याला आज २६ वर्षें झालीं. पण त्यापूर्वी २६ वर्षें नजर टाकून या देशांत काय राजकीय स्थिति होती हें लक्षांत घ्याल तर आपण पुष्कळच मजल गांठली आहे असें दिसून येईल. आणि पन्नास वर्षांचा काळ हा सर्व इतिहासांत अशीच प्रतिष्ठा पावलेला दिसतो. कारण अमेरिका, कॅनडा, दाक्षिण आफ्रिका, फ्रान्स, इटाली, आयर्लंड, फिलिपाईन, इतक्या देशांचा इतिहास पाहिला तर पारतंत्र्याच्या टोंकाला गेल्यानंतर स्वराज्य व स्वातंत्र्य यांची चळवळ खरी सुरू झाल्यापासून पन्नास वर्षांच्या अवधींत त्यांना स्वराज्य व स्वातंत्र्य या गोष्टी मिळाल्या असें साधार दाखवितां येईल. तसेंच हिंदुस्थानचें होणार आहे.

[ १३ ]

# विद्यार्थ्यांस उपदेश

[ १९२० सालीं टिळकांच्या चरित्रासंबंधीं श्री. केळकर यांनीं फर्ग्युसन कॉलेजांत व्याख्यान दिलें. त्यांतून पुढील उतारा घेतला आहे. ]

आतांपर्यंत टिळकांच्या गुणांची इतकी चर्चा झालेली आहे, कीं एकाद्याला सांगितलें कीं, आजपर्यंत कोणास न दिसलेला असा एकादा टिळकांचा गुण सांग, तुला हजार रुपये बक्षिस देतों, तरी तें त्याला शक्य होणार नाहीं. तेव्हां मी तुम्हाला टिळकांचा एकादा कोणास न दिसलेला गुण दाखविणार आहें असें नाहीं. टिळकांचे गुण तेच, पण ते मी वेगळ्या पद्धतीनें आपणापुढें मांडणार आहें.

विष्णुसहस्रनामाप्रमाणें त्यांचे गुण आपणांपुढें म्हणून दाखविले तर पहा त्याचा काय बोध होतो ? टिळक सद्वर्तनी होते, विद्वान् होते, स्वार्थत्यागी होते, देशभक्त होते, उद्योगी होते, पराक्रमी होते, धैर्यवान् होते. अर्थात् यानें आपणांस कांहींच बोध झाला नसेल. आतां हेच गुण पण ते एकमेकांवर कसे अवलंबून होते हें मी आपणांस दाखवितों. या सर्व परस्परावलंबी गुणांची मीं एक सांखळी तयार केली आहे, ती अशी : टिळक सद्वर्तनी होते म्हणून त्यांच्या विद्वत्तेचें बीज झालें. ते विद्वान् होते म्हणून त्यांच्या स्वार्थत्यागाचा उपयोग झाला. स्वार्थत्यागी होते म्हणून त्यांच्या देशभक्तीचें बीज झालें. देशभक्त होते म्हणून त्यांच्या उद्योगाचें बीज झालें. उद्योगी होते म्हणून पराक्रमाचें बीज झालें. पराक्रमामुळें धैर्याचें बीज झालें. व टिळक स्वतः धैर्यवान् होते म्हणून लोकांना उपदेश करण्याची त्यांना पात्रता आली.

विद्यार्थ्यांनीं देखील टिळकांच्या अंगचे कांहीं गुण घेण्यासारखे आहेत. विद्यार्थिदशेंत टिळक हे पुढें पुढें येणारे किंवा कांहींतरी उद्योग बगलेंत मारणारे विद्यार्थि नव्हते. चंदावरकरांनीं टिळकांचें असें वर्णन दिलें आहे कीं, " टिळक म्हणजे त्या वेळीं आमच्या वर्गांत एका कोपऱ्यांत बसणारा गरीब मुलगा होता. परंतु गणित व संस्कृत या विषयांत त्याचा हात धरणारा कोणी नाहीं हें सर्वांस पक्कें माहीत होतें. विद्यार्थिदशेंत त्याची देशभक्ति वाखाणण्यासारखी होती." नुसती देशभक्ति घेतली तर विद्यार्थिदशेंत प्रत्येकाच्या अंगांत देशभक्ति असते. फार काय पण विद्यार्थिदशेंत देशभक्त नाहीं असा मनुष्यच विरळा ! याचें कारण असें कीं, या वयांत मनाच्या भराऱ्या फार उंच असतात; भावी आयुष्याचें अत्यंत सुखमय व उज्ज्वल चित्र रेखाटावयाचा प्रयत्न प्रत्येक जण करतो. लाँगफेलो यानें " यूथ " म्हणून कविता लिहिली आहे. त्यांत त्यानें तारुण्याचें फार सुंदर चित्र काढलें आहे.

" How beautiful is youth, how bright it gleams,
With its illusions, aspirations, dreams.
Book of beginnings, story without end.
Each maid a heroine, each man a friend.
Alladin's lamp Fortunatus' purse

That holds the treasure of the universe;
All possibilities are within its hands.
No danger daunts it, no foe withstands;
In its sublime audacity of faith
Be thou removed, it to the mountain saith.
And with ambitious feet secure and proud
Ascends the ladder leaning on the cloud."

पहा बरें या कवितेंत तुमचें किती सुंदर चित्र काढलें आहे ! तुमचें वर्णन येईल तुम्हांला असें करिता? या कवितेचा अर्थ तुमच्या लक्षांत आला असेल. अशक्य हा शब्दच तारुण्यांत मनाला माहीत नसतो. अडचणींचा पर्वत जरी मार्गांत आडवा आला तरी तरुणपणीं इतका आत्मविश्वास विलक्षण वाटत असतो कीं, पर्वताला तो म्हणतो, 'चल तूं दूर हो ! मला पुढें जावयाचें आहे.' तसेंच तरुण मनुष्य आपल्या महत्त्वाकांक्षेची शिडीहि अशी लावतो कीं, त्याचें एक टोंक जमिनीवर तर दुसरें टोंक आकाशांत उंच असणाऱ्या ढगावर ! पहा कशास काय संबंध? पण विचार नसणें हेंच तरुणांचें लक्षण. पर्वत मार्गांत आडवा आला तर त्याला दरडावून दूर होण्यास सांगणें हाच तरुणपणा. पर्वत कसा दूर होईल, आपणांस बाजूनें गेलें पाहिजे, हा विचार त्याच्या मनांतच येत नाहीं. पण सगळी अडचण काय ती—ही धडाडी, हा जोम पुढील आयुष्यांत कायम ठेवणें यांतच आहे. वृद्ध लोक म्हणतात कीं, आम्ही आतां झालों. तरुण मुलेंच आतां राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. हें त्यांचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. तरुण असतांना आधार होते तसेच पुढेंहि आधारस्तंभ म्हणवून घेतां आलें पाहिजे. नाहींतर पूर्वी मानला जाणारा आधारस्तंभ पुढें चिपाडासारखा वाळून हलका झाला तर उपयोग काय? अमका चांगला, तमका वाईट, असले वादहि व्यर्थ होत. टिळक मोठे कीं गोखले मोठे, असा शुष्क वाद करणारांना नेहमीं मी हेंच सांगतों कीं, यांतून तुमच्या दृष्टीनें जो कमी असेल त्याच्याइतके तुम्ही स्वतः मोठे व्हा म्हणजे झालें ! नुसता वाद करून उपयोग काय? तुम्ही काय करितां? तुमचें कर्तव्य काय, याची तुम्हांस जाणीव पाहिजे. टिळकांचें विद्यार्थ्यांस नेहमीं हेंच सांगणें असे. टिळकांची तरुण मुलांवर भक्ति होती,

याचें कारण यांतून कर्तीं माणसें निघण्याची त्यांना आशा असे. ज्याप्रमाणें एकाद्या तरुण उपवर मुलीचा बाप जो जो तरुण भेटेल त्याच्याकडे पहात 'हा माझा जांवई होण्यास योग्य आहे काय?' असा प्रश्न स्वतःला विचारीत असतो, त्याप्रमाणें प्रत्येक तरुणाच्या चेहेऱ्याकडे टिळक नजर लावून मोठ्या आशेनें पहात असत. टिळकांकडे कोणीहि तरुण गेला तर याचा राष्ट्र-कार्याला काय उपयोग होईल याचा विचार ते करीत. ऑक्सफर्ड केंब्रिजला परवां आम्ही गेलों होतों, तेव्हां टिळकांनीं प्रत्येक विद्यार्थ्याला विचारलें कीं, "तूं पुढें काय करणार?" आपण पुढें काय करणार हें जरी आपण ठरविलें असलें तरी पुढेंहि तें तसेंच हटकून अंमलांत येतें असें नाहीं. अरविंद घोष हे सिव्हिल सर्विसची परीक्षा घोड्यावर न बसतां आल्याकारणानें नापास झाले व त्यांच्या आयुष्याची सर्व दिशा बदलली. गोखले हे इंजिनियरिंगची परीक्षा पास होते तर एक बडे ऑफिसर झाले असते! अर्थात् अशा गोष्टी क्वचित् होत असल्या तरी पण कांहींतरी निश्चित ध्येय प्रत्येकानें डोळ्यासमोर ठेवणें जरूर आहे. प्रत्येकानें राजकारणाचाच अभ्यास केला पाहिजे किंवा राजकारणांत प्रत्येकाचें डोकें चालेलच असें नाहीं. राजकारणाशिवाय दुसरे पुष्कळ विषय आहेत. देश हा त्यातल्या मोठ्या माणसांवरून ओळखला जातो. बंगाल म्हटला म्हणजे आज आपल्या डोळ्यांसमोर एकदम दहावीस थोर व्यक्ति उभ्या राहतात. ते सर्वच पुरुष काय राजकारणी आहेत? कोणी जगद्वंद्य कवि आहे, तर कोणी वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, यांत शोध लाविले आहेत. एकादा विषय आला नाहीं तरी चालेल. तेवढ्यानें निराश होऊं नका. दुसऱ्यांत तुमचें डोकें चालेल. कांहींतरी मोठें कार्य करण्याची इच्छा धरा. स्वभावभेदामुळें तें राजकीय नसलें तरी चालेल! तुमचें सध्यांचें कर्तव्य म्हणजे उत्तम तऱ्हेची विद्या संपादन करणें हें होय. अशी महत्त्वाकांक्षा तुम्हीं मनांत बाळगली पाहिजे कीं, येथील सर्वांत उच्च शिक्षण व सर्वांत उच्च पदवी मी मिळवीन व नंतर ही सामुग्री बरोबर घेऊन मी देशकार्य करण्यास झटेन."

---

★

## सुरुचि-साहित्य

या अभिनव प्रकाशनसंस्थेचें हें पहिलें
पुस्तक वाचकांच्या हातीं देतांना
आम्हाला आनंद होत आहे.
अल्प किंमतींत मौल्यवान्
साहित्य मराठी वाचकां-
पुढें सादर करण्याचा
आमचा मानस आहे.

सुरुचि-साहित्य, ३९१ नारायण, पुणें २.